फेब्रुवारी २०२०/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य



## मराठी

बोलतो मराठी, ऐकतो मराठी, जाणतो मराठी, मानतो मराठी

# मराठी भाषा
## गौरव दिन



**श्री.वि.वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रामध्ये महत्त्वाचे योगदान दिले. वि.स. खांडेकरांनंतर मराठी साहित्याला ज्ञानपीठ पुरस्कार मिळवून देणारे ते दुसरे महान साहित्यिक. त्यांच्या स्मृतीला अभिवादन म्हणून त्यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून शासनातर्फे साजरा करण्यात येतो.**

## विश्वास हवा मायभाषेच्या क्षमतेवर

भाषा बंदीखान्यात वाढत नाही. आजही जी मराठी प्रचलित आहे, तीही अनेक भाषांतील शब्दांचे आणि व्यावहारिक संज्ञाचे नजराणे घेऊनच संपन्न झाली आहे. कोणत्याही जिवंत समाजाची भाषा तळ्यासारखी साचीव नसते, तर कालमानानं निर्माण होणाऱ्या नव्या ज्ञानाचे, विचारांचे, जाणिवांचे पाझर आत्मसात करीत पुढे जाणाऱ्या नदीसारखी प्रवाही असते. इतर प्रगत भाषांशी संपर्क ठेवूनच ती प्रगती करू शकते. शुद्धतेच्या कर्मकांडात रुतलेल्या आणि त्यामुळेच प्रगतीला पराङ्‌मुख झालेल्या भाषा मृत या सदरात कशा जमा होतात, हे इतिहासानं दाखवलेलं आहे; हे भान मराठीनं आपल्या १५ शतकांच्या प्रवासात राखलेलं आहे आणि म्हणूनच नव्या युगाची आव्हानं पेलण्याच्या सामर्थ्यासंबंधी साशंक असलेली आम्ही तिची अपत्ये मात्र दुबळी आहोत. तेव्हा आमचं वैर कोणत्याही भाषेशी नाही. आणि मावशीच्या मायेनं आमचं पालन करणाऱ्या इंग्रजीशी तर नाहीच नाही. मावशीबाईनं आता आमच्या आईच्या घराचा कब्जा पुन्हा आईकडे द्यावा एवढीच आमची मागणी आहे. म्हणून आपल्यासमोर प्रश्न आहे तो इंग्रजीच्या बहिष्काराचा नाही, तर मराठीच्या संरक्षणाचा आणि संवर्धनाचा.

भाषा म्हणजे शब्दांचं संकलन नव्हे. समाजाचं वैचारिक आणि जाणिवात्मक संचित काळातून पुढे नेणारी आणि परिणामत: समाजाच्या बदलत्या जीवनाला अखंडता, आकार आणि आशय देणारी भाषा ही एक महाशक्ती असते. सूत्रात ओवलेल्या मण्यांप्रमाणे समाजजीवनाच्या साऱ्या धारणा आणि विकासाच्या प्रेरणा तिच्यात ओवलेल्या असतात. म्हणून मराठीवरील संकट हे तिच्या शब्दकोशावरील वा साहित्यावरील संकट नाही. ते महाराष्ट्राच्या अस्मितेवरील, मराठीपणावरील आणि येथील लोकांच्या भवितव्यावरही संकट आहे. समाजाची प्रगती वा क्रांती स्वभाषेच्या किनाऱ्यावरच पेरता येते असे क्रांतिकारकांच्या प्रणेत्यानं म्हटलेलं आहे. संस्कृत भाषा देवे केली! प्राकृत काय चोरपासून झाली? असा संतप्त प्रश्न संत एकनाथांनी विचारला होता. आज तोच प्रश्न इंग्रजीच्या संबंधात विचारता येईल. संस्कृतचं स्तोम माजवून तेव्हाच्या पुरोहित वर्गाची जागा इंग्रजीत पारंगत असलेल्या चार पाच टक्के लोकांनी घेतली आहे. या पाच टक्केवाल्यांच्या प्रस्थापित हितसंबंधासाठी आठ कोटी लोकांचं भवितव्य धोक्यात लोटायंच का, याचा विचार गंभीरपणानं व्हायला हवा.

अनेक विख्यात शास्त्रज्ञांनी आणि डॉक्टरांनी जरूर तेथे इंग्रजी परिभाषिक संज्ञांचा स्वीकार करून, सर्व विषय, सर्व स्तरावर मातृभाषेत शिकवणं श्रेयस्कर असतं असं वारंवार सांगितलं आहे. म्हणून स्वभाषारक्षणाचा प्रश्न मंत्रालयाचा व एखाद्या शासकीय विभागाचा नाही, तर तो सर्व समाजाचा प्रश्न आहे हे लक्षात घेऊन शासनानं सर्वांचं सहकार्य घेतलं तर या संकटावर मात करणं कठीण आहे, असं मला वाटत नाही. जगातील सर्व प्रगल्भ भाषांना जे साधलं ते मराठीलाही साधता येईल. फक्त आपला विश्वास हवा, अमृताशीही पैजा जिंकणाऱ्या आपल्या मायभाषेच्या क्षमतेवर.

**(१२,१३ ऑगस्ट १९८९ रोजी मुंबई येथे भरलेल्या जागतिक मराठी परिषदेतील कवी कुसुमाग्रज ऊर्फ श्री.वि.वा. शिरवाडकर यांच्या अध्यक्षीय भाषणातून)**




# अंतरंग

## अभिजात मराठी हे घ्या पुरावे... ६

थोर संशोधक श्री.व्यं.केतकर, राजारामशास्त्री भागवत, वि.का.राजवाडे, इरावती कर्वे, कृ.पां. कुलकर्णी, दत्तो वामन पोतदार, वि.ल.भावे, रा.भि. जोशी आदींच्या उपरोक्त संशोधनाच्या आधारे माहाराष्ट्री (मराठी) भाषा ही किमान अडीच हजार वर्षे जुनी असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. माहाराष्ट्री, मऱ्हाठी भाषेचा हा अडीच हजार वर्षांचा प्रवास साधार उलगडला म्हणजे मराठी भाषा ही अभिजात भाषा असल्याचे निर्विवादपणे सिद्ध होते.

## माझा महाराष्ट्र, तुमचा उद्योग, सर्वांची समृद्धी २०

राज्याच्या विकासात रोजगारनिर्मितीला सर्वात अधिक प्राधान्य मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले आहे. राज्य विकासाच्या मार्गावर न्यायचे असल्यास सर्वच क्षेत्राचा विकास होणे आवश्यक असून त्यासाठी राज्यातील सर्व घटकांना बरोबर घेऊन जाण्याचे सूत्र मुख्यमंत्र्यांनी स्वीकारले आहे. शेती, उद्योग आणि शिक्षणासारख्या क्षेत्रांचा विकास हा एकमेकांच्या साथीने होऊ शकतो यावर त्यांचा भर आहे.



## स्वच्छ पर्यावरण, समृद्ध पर्यटन २६



राज्याच्या विकासात पर्यटन महत्त्वाची भूमिका बजावू शकते. पर्यावरणाची स्वच्छता ही पर्यटन व्यवसाय वाढीसाठी उपयुक्त ठरते. त्यामुळे आपण सर्वांनी पर्यावरण स्वच्छतेसाठी आपुलकीने प्रयत्न करायला हवेत. असे सांगताहेत पर्यटन व पर्यावरण मंत्री श्री. आदित्य ठाकरे..

## छोटा देश, मोठी झेप ४६

इस्रायल हे अतिशय मोक्याच्या ठिकाणी, आफ्रिका व आशिया या दोन खंडांच्या मध्ये वसलेले आहे. त्यामुळेच नैसर्गिक सौंदर्य, विविध संस्कृतींचा संगम आणि अफलातून हवामान यांची देणगी इस्रायलला मिळालेली आहे. इस्रायलमध्ये अनेक पर्यटन स्थळं आहेत. त्यामुळेच देश-विदेशातील पर्यटकांचे लक्ष इस्रायलने कायमच वेधले आहे.





| | |
|---|---|
| अभिजात मराठी हे घ्या पुरावे... | ६ |
| आम्ही गातो मराठी... | ११ |
| मराठी हृदयातली, मनातली | १२ |
| महाजालात मराठी | १५ |
| मराठीचे संवर्धन मराठीचे श्रेष्ठत्व | १६ |
| मराठीच्या संवर्धनासाठी नवे उपक्रम | १९ |
| माझा महाराष्ट्र, तुमचा उद्योग, सर्वांची समृद्धी | २० |
| तुमची खुर्ची, तुमचा मान... | २३ |
| स्वच्छ पर्यावरण, समृद्ध पर्यटन | २६ |
| सरखेल... | ३० |
| आम्ही करणारच... | ३२ |
| दृष्टिक्षेप | ३५-३८ |
| मंत्रिमंडळात ठरले... | ३९-४३ |
| पाणी टंचाई संपली | ४४ |
| छोटा देश, मोठी झेप | ४६ |
| गडांचा राजा : राजगड | ४९ |
| शिखर गाठले... | ५१ |
| अभय मिळवा | ५३ |
| एसएमएसचा बॉम्बगोळा | ५४ |
| मंत्रिमंडळ | ५६-५७ |
| मराठी पाऊल पडते पुढे.... | ५८ |

वर्ष ७१ वे | अंक ८ | फेब्रुवारी २०२०

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — डॉ. दिलीप पांढरपट्टे
- प्रबंध संपादक — अजय अंबेकर
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — अनिल आलूरकर
- उपसंपादक — प्रवीण कुलकर्णी, गजानन पाटील, राजाराम देवकर
- वितरण अधिकारी — मंगेश वरकड
- वितरण साहाय्य — अश्विनी पुजारी
- साहाय्य — भारती वाघ
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — मे. मुद्रण प्रिंट एन पॅक प्रा.लि., कोपरखैरणे, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारण: ९३७२२३०३२०
(सकाळी १०.३० ते ५.३० कार्यालयीन कामकाजा दिवशी)

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमतच असेल असे नाही.

# माझ्या मराठी मातीचा...

माझ्या मराठी मातीचा,
लावा ललाटास टिळा,
हिच्या संगाने जागल्या,
दऱ्याखोऱ्यांतील शिळा.

हिच्या कुशीत जन्मले,
काळे कणखर हात,
ज्यांच्या दुर्दम धीराने,
केली मृत्यूवरी मात.

नाही पसरला कर,
कधी मागायास दान,
स्वर्णसिंहासनापुढे,
कधी लवली ना मान.



हिच्या गगनात घुमे,
आद्य स्वातंत्र्याची द्वाही,
हिच्या पुत्रांच्या बाहूत,
आहे समतेची ग्वाही.

माझ्या मराठी मातीचा,
लावा ललाटास टिळा,
हिच्या संगे जागतील,
मायदेशातील शिळा

– कुसुमाग्रज

# भाषांमध्ये मान थोरु । मराठीयेसी



**सुभाष देसाई**
उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री

*'आमुच्या मनामनात दंगते मराठी*
*आमुच्या रगारगात रंगते मराठी*
*आमुच्या उराउरात स्पंदते मराठी*
*आमुच्या नसानसात नाचते मराठी'*

कविवर्य सुरेश भटांच्या कवितेतील या ओळी आपल्या मराठी भाषेची थोरवी सार्थपणे व्यक्त करतात. मराठी आपला श्वास आहे आणि आपला अभिमान आहे. तुम्हा-आम्हास मराठी बोलता येते, ऐकता येते हे भाग्य मोठे आहे. ज्ञानेश्वरांनी मराठीला अमृताची उपमा दिली. अमृतासारखी किंवा त्याहूनही गोड असलेली माझी-तुमची मराठी, *ही तारांमध्ये बारा राशी । सप्तवारांमध्ये रवि-शशि । या दीपिंचेया भाषांमध्ये तैसी । बोली मराठीया ।।* अशी श्रेष्ठ आहे. हे श्रेष्ठत्व फादर स्टिफन्स यांनी या ओळींतून ठसठशीतरीत्या अधोरेखित केले आहे.

मराठी भाषेला दोन हजारांहून अधिक काळाचा वैभवशाली इतिहास आहे. त्याचे विविध पुरावे मिळाले आहेत. हे पुरावे आपल्या मराठीला अभिजात भाषेच्या परिघात नेऊन ठेवण्यास समर्थ आहेत. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठीचे आमचे प्रयत्न लवकरच फळाला येतील, याची मला खात्री आणि विश्वाससुद्धा आहे. डौलात रायगडावर फडकलेला भगवा आणि दिल्लीच्या तख्ताला हादरवून सोडणारे मराठी भाषेचे तेज व सत्त्व छत्रपती शिवाजी महाराजांच्या भवानी तलवारीसारखे तळपणारे आहे. त्यामुळे आमचे सरकार येताच सर्वप्रथम मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांनी देशाच्या प्रधानमंत्र्यांना विशेष पत्र लिहून मराठी भाषेला अभिजाततेचा मुकुट परिधान करावयास विलंब करू नका, असे आवाहन आणि विनंती केली आहे.

आमच्या उराउरांत मराठीची स्पंदने होत असल्याने मराठीचे वैभव वाढविण्यास आम्ही सर्वोच्च प्राधान्य देणार आहोत. यापुढे मंत्रालयातील सर्व नस्त्या (फाईल) वरील शेरे हे मराठीतच लिहिले जातील याचा दंडक आम्ही घालून दिला आहे. असे शेरे मराठीतून न आल्यास नस्त्या परत पाठवल्या जातील, कोणत्याही प्रकारे होणारी मराठीची गळचेपी आम्ही खपवून घेणार नाही.

मराठी भाषेच्या विकासासाठी मराठी भाषा विभाग अधिक सक्षम करण्याचे ठरवले आहे. त्यासाठी मराठीतील ज्येष्ठ-श्रेष्ठ साहित्यिक, अभ्यासक यांचे आम्ही साहाय्य घेणार आहोत. नुकतेच आम्ही ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक आणि इतर मान्यवरांना खास चर्चेसाठी बोलावून घेतले होते. मराठी प्रवाह आणखी चैतन्यदायी व्हावा यासाठी मराठीवर आस्था असणाऱ्या सर्वांच्या मौलिक सूचनांचा आम्ही विचार करू. मराठीला आणखी तेजोमय करण्यासाठी सर्वसमावेशक आराखडा तयार करू.

मराठी भाषा विभागांतर्गत कार्यरत असणाऱ्या भाषा संचालनालय, साहित्य आणि संस्कृती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था आणि विश्वकोश मंडळामार्फत विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात येतील. साहित्यनिर्मिती, भाषा संशोधन आणि मराठी भाषेचा आधुनिक तंत्र कौशल्य आणि ज्ञानाशी सांगड घालण्याचा आमचा प्रयत्न राहील. पुस्तकाचे गाव ते रंगवैखरी अशा मराठी भाषेच्या प्रोत्साहनासाठी सुरू झालेल्या उपक्रमांची गती वाढवू शिवाय देशातील सगळ्याच मराठी बांधवांनी यात सहभागी व्हावे, यासाठी सुसंगतीही आणू. मराठी भाषा भवनाचा प्रकल्प वेगवेळ्या कारणांनी खोळंबला होता. आता या प्रकल्पास आम्ही गती देणार आहोत. नजीकच्या काळात भव्य असे भाषा भवन मुंबईत डौलाने उभे राहील, याची मी ग्वाही देतो.

आमच्या नसानसांत नाचणाऱ्या मराठीची श्रीमंती तिच्या विविध बोलींमध्ये आहे. या बोलींना मुख्य प्रवाहात आणून मराठीचे अवकाश आणखी व्यापक करण्याचे आम्ही ठरवले आहे. मराठी केवळ साहित्यापुरतीच मर्यादित न राहता ती ज्ञान भाषा, आधुनिक तंत्राची भाषा, कौशल्य विकासाचीही भाषा व्हावी, यासाठी आम्ही विशेष प्रयत्न करणार आहोत. दहावीपर्यंत सर्व शाळांमध्ये मराठीची सक्ती करण्याचा आमचा मानस आहे. महाराष्ट्रात वास्तव्यास असणाऱ्या प्रत्येकास मराठी भाषा यायला हवी. त्यांनी मराठीतच व्यवहार करायला हवेत. मराठीचे हृदय विशाल आहे. ती कोणत्याही भाषेचा दु:स्वास करत नाही. आपली शुद्धता आणि पावित्र्य राखत मराठीने इतर भाषेतील अनेक शब्दांना मायेच्या ममतेने सामावून घेतले आहे. सर्वसमावेशकता हे मराठीचे वैशिष्ट्य आहे, ही बाब इतर भाषकांनीही लक्षात घेऊन मराठीला आपलेसे करायला हवे. आमची मराठी ही सर्वांना आनंद देणारी, मोहवून टाकणारी आहे. कवी गुरू ठाकुर म्हणतात, त्या प्रमाणे आपली मराठी



*अलवार कधी, तलवार कधी*
*पैठण सुबक नऊवार कधी*
*कधी कस्तुरीचा दरवळ दैवी*
*ती सप्तसुरांवर स्वार कधी,* अशी आहे. तिची प्रतिष्ठा वाढविण्याची, तिचा सन्मान राखण्याची जबाबदारी महाराष्ट्रातील प्रत्येकाची आहे. येणाऱ्या काळात ही जबाबदारी आपण सर्वांनी एकत्रितपणे निभवूया आणि मराठीचा ध्वज आणखी उंचावूया.


मराठी भाषा गौरव दिनानिमित्त महाराष्ट्रातील सर्व नागरिकांना आमच्या शुभेच्छा आणि ज्या कविश्रेष्ठ कुसमाग्रजांच्या जन्मदिनानिमित्त हा दिन साजरा केला जातो त्यांना विनम्र अभिवादन. यादिनानिमित्त प्रकाशित होणाऱ्या या अंकात आम्ही मराठी भाषेच्या अनुषंगाने काही लेख प्रकाशित केले आहेत. ते आपणास आवडतील, अशी आशा आहे.

शुभेच्छांसह..

**सुभाष देसाई**
(अतिथी संपादक)

**थोर संशोधक श्री.व्यं.केतकर, राजारामशास्त्री भागवत, वि.का.राजवाडे, इरावती कर्वे, कृ.पां. कुलकर्णी, दत्तो वामन पोतदार, वि.ल.भावे, रा.भि.जोशी आदींच्या संशोधनाच्या आधारे माहाराष्ट्री(मराठी) भाषा ही किमान अडीच हजार वर्षे जुनी असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. माहाराष्ट्री, मऱ्हाठी भाषेचा हा अडीच हजार वर्षांचा प्रवास साधार उलगडला म्हणजे मराठी भाषा ही अभिजात भाषा असल्याचे निर्विवादपणे सिद्ध होते.**

# अभिजात मराठी हे घ्या पुरावे...




**हरी नरके**

मराठी भाषा सल्लागार समितीच्या पहिल्या बैठकीमध्ये तत्कालीन मुख्यमंत्री यांनी मराठी भाषेला 'अभिजात भाषेचा दर्जा' मिळविण्याचा शासन प्रयत्न करणार असल्याची घोषणा केली. त्याबाबतच्या चर्चेत या संदर्भातील पुढील निकषांकडे लक्ष वेधले गेले. (High antiquity of its early texts / recorded history over a period of 1500-2000 years, - body of ancient literature / texts, which is considered a valuable heritage by generations of speakers. The literary tradition be original and not borrowed from another speech community. The classical language and literature being distinct from modern, there may be a discontinuity between the classical language and its later forms of its offshoots.) मराठी ही जगातील १० व्या क्रमाकांची भाषा असली तरी तिचा जन्म २००० वर्षांपूर्वीचा नसल्याने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळू शकत नसल्याचा मुद्दा पुढे आला.

मराठी भाषेचा जन्म नेमका केव्हा झाला याबाबत कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी, संचालक - मराठी संशोधन मंदिर, यांचा 'मराठी भाषा उद्‌गम व विकास' हा १९३३ साली प्रकाशित झालेला ग्रंथ अतिशय मोलाचा समजला जातो. त्यात ते म्हणतात, 'सर्व प्राकृत भाषा, अपभ्रंश व संस्कृत ह्या भाषांनी आपापल्या परीने मराठीस जन्माला आणण्यास हातभार लावलेला दिसतो. निरनिराळ्या प्राकृतभाषा बोलणारे निरनिराळे समाज, निरनिराळ्या काळी आर्यावर्तातून अनेक कारणांमुळे महाराष्ट्रात

उतरले आणि तेथे स्थायिक झाले. त्यांच्या संमिश्र बोलण्यानेच मराठी भाषा बनली. महाराष्ट्र देश ज्याप्रमाणे गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र, अश्मक, कुंतल, विदर्भ, कोकण इत्यादी लहान लहान देशविशेषांचा मिळून बनला व महाराष्ट्राची लोकवसाहत ज्याप्रमाणे निरनिराळ्या लोकघटकांनी मिळून झाली, त्याचप्रमाणे मराठी भाषा ही निरनिराळ्या प्राकृत भाषांच्या-विशेषत: माहाराष्ट्री व अपभ्रंश ह्यांच्या मिश्रणाने बनली. महाराष्ट्र देश, मराठा समाज व मराठी भाषा ह्यांची घटना वर दिलेल्या रीतीने ख्रिस्तोत्तर ६००-७०० च्या सुमारास झाली. (पृ.१६८)

## सांगोपांग वेध


कृ.पां.कुलकर्णी यांनी आपल्या ४९६ पृष्ठांच्या या शोधग्रंथात या विषयाचा सांगोपांग वेध घेतला आहे. विषयाचे सर्व पैलू मांडण्यासाठी त्यांनी या संदर्भातील तज्ज्ञांच्या ३२ मौलिक संदर्भ ग्रंथांचा वापर केला आहे. कुलकर्णींच्या मते मराठी भाषेचे वयोमान १३००-१४०० वर्षांचे ठरते. असे असेल तर मग मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळू शकणार नाही. याबाबत (१) डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर लिखित 'प्राचीन महाराष्ट्र' 'खंड १ व २', (२) हाल शातवाहनाची 'गाथा सप्तशती' - संपादक, स. आ. जोगळेकर, (३) गुणाढ्याचे 'बृहत्कथा' हे व राजारामशास्त्री भागवत, दुर्गा भागवत, इरावती कर्वे, वि.का. राजवाडे, वि.ल.भावे, रा.भि.जोशी आदींचे ग्रंथ तपासून काय चित्र समोर येते त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करू या.

'कथा सरित्सागर' या महाग्रंथाचे मराठी भाषांतर श्री.ह.अ.भावे यांनी केले असून, त्याच्या पाचही खंडांना ख्यातनाम विदुषी दुर्गा भागवत यांच्या पाच प्रदीर्घ आणि विवेचक प्रस्तावना आहेत. त्या प्रस्तावनेत म्हणतात, 'गुणाढ्याच्या बृहत्कथेची तुलना रामायण आणि महाभारताशी करण्यात येते.' प्राचीन भारतातल्या साहित्याचा एक विशेष असा आहे की, पुष्कळ ग्रंथ लुप्त झाले आहेत आणि असंख्य ग्रंथ केवळ खंडावस्थेतच आढळतात. अशा विलुप्त ग्रंथांत गुण्याढ्याच्या बृहत्कथेचा समावेश होतो. बृहत्कथेसंबंधी उल्लेख अनेक जुन्या ग्रंथात आढळून येतील. बृहत्कथेचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संबंध असलेले ग्रंथ संस्कृतात व प्राकृतात आहेत. हे ग्रंथ शैव व वैष्णव मतातून निघालेले आहेत आणि जैन मतातलाही ग्रंथ उपलब्ध आहे. तेव्हा भिन्न परंपरांना मान्य असलेला बृहत्कथा हा एक प्राचीन लोकप्रिय ग्रंथ होता यात संशय नाही.

बृहत्कथेशी प्रत्यक्ष संबंध असलेले ग्रंथ दोन आहेत. ते दोन्ही काश्मीरचे असून, अकराव्या शतकात उपलब्ध झालेले आहेत. दोहोंची भाषा संस्कृत व मते शैव आहेत. पहिला जागतिक ख्याती पावलेला ग्रंथ हा सोमदेवाचा 'कथा सरित्सागर' आणि दुसरा क्षेमेद्रांची 'बृहत्कथा मंजिरी' हे दोन्ही ग्रंथ श्लोकबद्ध असून, ते वृत्त अनुष्टुभ आहे. कथा सरित्सागरची भाषांतरे युरोपीय भाषांमध्ये उपलब्ध आहेत. परंतु, 'बृहत्कथा मंजिरी' चे इंग्रजीत एकच व तेही काही भागांचेच भाषांतर झाले आहे. ११व्या शतकात सोमदेव शर्मा या काश्मीरचा राजा अनंत याच्या पदरी असलेल्या कवी पंडिताने अनंत राजाची राणी सूर्यवती हिच्यासाठी पैशाची भाषेत त्या काळी उपलब्ध असलेल्या बृहत्कथेवरून संस्कृतात कथासरित्सागराची रचना केली. आपण हा ग्रंथ गुणाढ्याच्या बृहत्कथेवरून रचला आहे ही गोष्ट सोमदेवाने ग्रंथारंभी सांगून गुणाढ्याचे चरित्रही सांगितले आहे, असे दुर्गा भागवत म्हणतात.

## प्राचीन महाराष्ट्र

डॉ. श्री. व्यं. केतकर या ग्रंथाबाबत आपल्या 'प्राचीन महाराष्ट्र' या ग्रंथात म्हणतात, पैशाचीतील मुख्य विश्रुत ग्रंथ म्हटला म्हणजे बृहत्कथा होय. तो कुरू युद्धोत्तर इतिहासाचा संरक्षक आणि त्याचबरोबर इतिहास विपर्यासाचा संरक्षक आहे. त्यामुळे प्रस्तुत ग्रंथात बृहत्कथेपासून इतिहास निष्कर्षणाचा पद्धतशीर प्रयत्न केलेला आढळेल. ऐतिहासिक कथासूत्राच्या शोधाच्या अनुषंगाने अनेक प्रश्न विवेचनास घेतले गेले आहेत. त्यापैकी एक प्रश्न म्हटला म्हणजे बृहत्कथेच्या कालासंबंधीचा होय. बृहत्कथा अखिल भारतीय कथांचा संग्रह असल्यामुळे आणि त्यामध्ये प्रतिष्ठानकथा व दक्षिणापथकथा, कुंडीनपूर कथा येत असल्यामुळे महाराष्ट्राच्या इतिहासास त्या संग्रहाचा उपयोग करणे प्राप्त झाले. हा संग्रह तयार करण्यात वररुचीचा हात असल्यामुळे आणि वररुची हा महाराष्ट्राच्या भाषेचा आद्य वैयाकरण असल्यामुळे वररुचीविषयक अधिक विधाने करणे प्राप्त झाले. वररुचीची माहाराष्ट्री बुद्धपूर्व आहे आणि वररुचीचे व्याकरण पाली किंवा अर्धमागधी या भाषांच्या उदयापूर्वीचे आहे,



**श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वराच्या मूर्तीच्या पायथ्याशी मराठीत कोरलेला शिलालेख. 'श्रीचामुंडाराये करवियले गंगाराये सुत्ताले करवियेले' हा प्राचीन भारतातील सर्वात जुना मराठी शिलालेख म्हणून ओळखला जातो.**

असे आमचे मत आहे. पैशाची भाषेचे प्रामुख्य ज्या काळात होते, तो काळ वररुचीच्या व्याकरणाने दिग्दर्शित होत आहे.

वररूचीच्या काळापूर्वी काही पिढ्या पैशाची ही वाङ्मयाची भाषा होती. त्या काळात माहाराष्ट्री भाषा प्रगल्भ झाली होती. प्राकृत भाषांत तीच प्रमुख होती हे स्पष्ट आहे. या प्रगल्भतेचा काळ अर्थात वररुचीच्या पूर्वी दोनतीनशे वर्षे इतका तरी होता असे म्हणण्यास हरकत नाही. त्यावरून 'प्राकृत प्रकाशा' च्या उत्पत्तीच्या काळी चारही प्राकृत भाषांचे व्याकरण असणे आणि 'महाराष्ट्र ' हा शब्दही अस्तित्वात असणे हे पूर्ण संभवनीय वाटते. एवंच महाराष्ट्राच्या इतिहासाचा एक मोठा उजेडाचा कालविभाग म्हटला म्हणजे वररूचीचा व पाणिनीचा काल होय. या वररूचीचे अस्तित्व पाणिनीच्या कालाहून दूर नसावे आणि वररूची व पाणिनी हे दोघेही जवळजवळ समकालीन असल्यामुळे ते दोघेही एका गुरूचेच शिष्य होते ही कल्पना उद्‌धृत होऊन आणि विद्वान वर्गाच्या आख्यायिका संग्रहात शिरून ती कथापीठ लंबकात समाविष्ट झाली असावी. कथापीठलंबक रचनेचा काल मौर्य राज्याच्या प्रारंभाचा असावा, असे आमचे मत आहे. (पृ.११,१२)

ते पुढे म्हणतात, 'महाराष्ट्र हा शब्द व भाषा वररुचीच्या काळी होती आणि वररुचीच्या काळी ही भाषा संवर्धित झाली. वररुचीचा काल ख्रिस्तपूर्व ८०० पासून ६०० पर्यंत केव्हातरी असा धरला तर महाराष्ट्राची स्वतंत्र भाषा अगोदर दोनतीनशे वर्षे तरी विकसित होत असली पाहिजे म्हणजे ख्रिस्तपूर्व पाहिल्या सहस्रकांच्या पूर्वीच म्हणजे ख्रिस्तपूर्व दुसऱ्या सहस्रकात महाराष्ट्राचा आद्यविकासाचा काल जातो.' या भाषेच्या नावास कारण झालेले जे महा आणि रठ्ठ यांचे एकराष्ट्रीकरण जे ख्रिस्तपूर्व दुसऱ्या सहस्रकात झाले असावे असे दिसते. अश्मक राजा कुरू युद्धात पडला आणि कुरू युद्धापासून अश्मकांचे सातत्य आहे तर महा आणि रठ्ठ यांचे एकराष्ट्रीकरण आणि अश्मक राजाचे सातत्य याची संगती लावण्याचा प्रयत्न अवश्य होतो. अश्मक राज्य सुरू होण्यापूर्वीच रठ्ठांचा प्रसार होऊन महाराष्ट्र बनले असावे आणि त्यांच्या संयुक्त जनतेत अश्मक राजकुल उत्पन्न झाले असावे असाच इतिहास असावा, असे दिसते. (पृ.१३)

## हालांची सप्तशती

डॉ.केतकर हालांच्या सप्तशतीबद्दल म्हणतात, महाराष्ट्रातील अत्यंत प्राचीन वाङ्मय म्हणजे हालांची सप्तशती होय. तीवरून असे दिसते की, त्या वेळेस प्रमुख जानपद हलिक होते. गोदातट आणि विंध्य पर्वत हे दोन्ही प्रदेश वाङ्मयात येत होते. भाषेला नाव प्राकृत हेच अधिक प्रिय होते. (पृ.२९) केतकरांचे अनुमान आहे की, शातवाहनांच्या काळात अपभ्रंश भाषेचा उदय झाला असेल, कारण शातवाहनांच्या काळी अपभ्रंशाचे अस्तित्व होते अशी साक्ष बृहत्कथा देते.

'राजारामशास्त्री भागवत यांचे निवडक



**नेवास येथील खांब – या ठिकाणी ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली.**

साहित्य' दुर्गा भागवत यांनी संपादित केले असून, त्याचा पहिला खंड मऱ्हाठ्यासंबंधाने चार उद्‌गार हा या विषयावर महत्त्वाचा प्रकाशझोत टाकतो. राजारामशास्त्री भागवत म्हणतात, 'महाराष्ट्र हा शब्द बराच जुनाट आहे. नंदाचे राज्य मगध देशावर असता म्हणजे शालिवाहन शकाचे पूर्वी सुमारे सव्वा चारशे वर्षे, वररुची नावाचा विद्वान झाला. त्याने 'प्राकृत प्रकाश' नावाचे प्राकृत भाषेचे म्हणजे संस्कृत नाटकातील बालभाषेचे व्याकरण केले आहे. त्या व्याकरणाचे अगदी शेवटचे सूत्र 'शेषं माहाराष्ट्रीवत्' हे होय. अशोकाने महाराष्ट्र देशात धर्मोपदेश करण्यासाठी काही, बौद्ध भिक्षुंस पाठविले, अशी बौद्ध लोकांतही दंतकथा आहे.

**नंदाच्या नंतर चंद्रगुप्ताने राज्य केले. चंद्रगुप्ताच्या पाठीमागे त्याचा मुलगा बिंदुसार गादीवर बसला व बिंदुसाराच्या मागून त्याचा मुलगा प्रियदर्शी किंवा अशोक यांस गादी मिळाली. तेव्हा चांगला बावीसशे वर्षांचा 'मरहठ्ठ' किंवा 'महाराष्ट्र' शब्द आहे असे म्हणण्यास हरकत नाही.** (पृ.७ व ८) ते पुढे म्हणतात, बाकी सर्व मऱ्हाठी भाषेप्रमाणे शौरसेनी भाषेचे नियम आहेत असे समजावे. या सूत्राचा अर्थ ज्यास आपण बालभाषा म्हणतो त्यात पूर्वीच्या काळी शौरसेनीही होती. शूरसेना म्हणजे मथुरामंडळ या प्रांताची जी पूर्वीची भाषा ती शौरसेनी. उंच जातीच्या व कुलीन बायका जी भाषा प्राचीन काळी नाटकात बोलत ती हीच, 'शौरसेनी' नाटक म्हटले म्हणजे लोकस्थितीचे हुबेहूब चित्र होय. तेव्हा संस्कृतात नाटके ज्या वेळी होऊ लागली त्यावेळी कुलीन व वरिष्ठ जातींच्या बायकांची भाषा 'शौरसेनी' होती, याविषयी काही संशय नको. या 'शौरसेनी' भाषेची एक प्रकृती जशी संस्कृत तशीच दुसरी प्रकृती माहाराष्ट्री ऊर्फ अतिप्राचीन मऱ्हाठी, असे कात्यायन म्हणतो. शौरसेनीपासून मागधी व पैशाची नावाच्या बालभाषा निघाल्या.

मगध म्हणजे गयेच्या व पाटणाच्या आसपासचा मुलूख. या देशाची जी पूर्वीची भाषा ती मागधी. पंजाब वगैरे प्रांतातील राहणाऱ्या लोकांचे 'पिशाच' हे प्राचीन नाव दिसते. बाल्हिक म्हणजे बल्क, बुखारा व समरकंद वगैरे ठिकाणाचे लोक सर्व पिशाचांची संतती, असे कर्णपर्वात लिहिले

आहे. या लोकांची पूर्वीची भाषा पैशाची. शौरसेनीपासून मागधी व पैशाची निघाल्या व शौरसेनेची प्रकृती जशी संस्कृत तशीच मऱ्हाठी असे कात्यायन म्हणतो. तर मग सर्व बालभाषांचे मूळ प्राचीन मराठी असा सिद्धान्त केल्यास काहीच प्रत्यवाय नाही. 'गाथांची भाषा महाराष्ट्री' असे अलंकारिक म्हणतात. गाथा शब्द आलेला 'गै' धातूपासून. 'गाथा' शब्दाने प्राय: आर्या किंवा गीति संस्कृतात समजली जाते. या अलंकारिकांच्या नियमावरून गाण्याची भाषा प्राचीन काळी 'माहाराष्ट्रीय' च होती असे म्हणावे लागते. तेव्हा सर्व बालभाषांची प्रकृती व गाणी प्राचीन काळची ज्या भाषेत, अशी एक प्राचीन 'मऱ्हाठी' भाषा होय... शौरसेनीची प्रकृती संस्कृत हे तर कात्यायनाने प्रकरणाच्या आरंभीच सांगितले आहे, असे असता अखेरीस 'शेषं महाराष्ट्रीवत्' असे कात्यायन पुन: म्हणतो, त्यापक्षी 'महाराष्ट्री' व संस्कृत या दोहोंची परस्परनिरपेक्षता त्यास इष्ट होती असे दिसते. मूळचा शब्द पाहू गेले असता 'पाअड' होय. 'पाअड' शब्दाच्या जवळजवळ संस्कृतात 'प्रकट' हा शब्द येतो. 'पाअड' भाषा=प्रकट भाषा. म्हणजे अर्थात सर्व लोकांचा व्यवहार व दळण-वळण जीत चालते ती. संस्कृत भाषा पडली धर्माची, अर्थात धर्म प्रसार करणे ज्यांच्या हातात असल्या ब्राह्मणांची. अर्थात ती काही सर्वसाधारण भाषा नव्हती. पण पाअड भाषा पडली  वाहत्या पाण्याप्रमाणे. ते सर्वांचे जीवन तेव्हा सर्वांचाच संबंध तिच्याबरोबर. सहजच तीस 'पाअड' म्हणजे सर्वांस समजण्यासारखी असे अन्वर्थक नाव मिळाले, व धर्मभाषेचे 'संस्कृत' म्हणजे थोड्याशा विद्वान ब्राह्मणांनी मिळून आपल्या बुद्धीप्रभावाने 'तकतकी आणलेली' असे ब्राह्मणांनीच नाव पाडले. काही काळाने 'संस्कृत' या शब्दाबरोबर मेळ दिसावा म्हणून 'पाअड' शब्दाचे प्रकट रूप न करता 'प्राकृत' असे रूपांतर केलेले दिसते. त्यामुळे प्राकृत हा शब्द संस्कृतात दररोज पाहण्यात येणारे, अर्थात 'क्षुल्लक' या अर्थाचा वाचक झाला. 'शिक्षा' म्हणून वेदाचे एक अंग आहे. त्यात 'प्राकृते संस्कृते चापि' (प्राकृत भाषेत व संस्कृत भाषेत) असा लेख आला आहे. त्यापक्षी प्राचीन काळीही 'प्राकृत ' ही स्वतंत्र भाषा समजण्याचा संप्रदाय पुष्कळ दिवसापासून होता हे उघड होय. तेव्हा 'माहाराष्ट्री', शौरसेनी, मागधी व पैशाची यासर्व जितक्या 'पाअड' भाषा होत्या तितक्या 'प्राकृत' झाल्या व या प्राकृत भाषांचे 'प्राकृतप्रकाश' नावाचे सूत्रमय व्याकरण कात्यायनाने पहिल्याने लिहिले. वर लिहिलेल्या पाचही भाषा 'पाअड' भाषा इतकेच की सर्वात प्राचीन व सर्वांची प्रकृती 'माहाराष्ट्री' ऊर्फ प्राचीन मऱ्हाठी. महाराष्ट्रीपासून निघाली शौरसेनी व शौरसेनीपासून कालांतराने मागधी व पैशाची या दोन भाषा निघाल्या. तेव्हा मागधी व पैशाची ही दोन्ही प्राचीन मराठीची नातवंडे होत. शौरसेनीची खरी आई म्हटले म्हणजे एकटी प्राचीन मऱ्हाठी भाषा. (पृ.१२,१३)



## महत्त्वाचा पुरावा

प्राचीन मराठीतील १) गाथा सप्तशती, २) प्रवरसेनाचे सेतुकाव्य , ३) गौडवध, ४) राजशेखराची कर्पुरमंजिरी हे ग्रंथ आणि गुणाढ्याचे पैशाची भाषेतील बृहत्कथा ग्रंथ हे फारच महत्त्वाचा पुरावा होत. नंदाच्या वेळच्या शालिवाहनाचा गुणाढ्य हा प्रधान होता. त्या ग्रंथाची हल्ली संस्कृतात दोन श्लोकमय भाषांतरे विद्यमान आहेत. श्रीलंकेतील महावंश या पाली भाषेतील सिंहली लिपीतील ग्रंथात अशोकाने बौद्ध भिक्षू महाराष्ट्रात पाठवल्याचा उल्लेख आहे. भवभूतीच्यानंतर दोनशे वर्षांनी राजशेखर झाला. तो महेंद्रपाल राजाकडे आश्रयाला होता. तो स्वत:ला महाराष्ट्र चुडामणी म्हणवून घेत असे.


इरावती कर्वे आपल्या 'मराठी लोकांची संस्कृती' या ग्रंथात म्हणतात, पश्चिमेकडील शक व महाराष्ट्रातील शातवाहन येण्याच्या आधी महाराष्ट्राच्या भूमित संस्कृत वा संस्कृतोद्‌भव भाषा दृढमूल झाली होती व म्हणून बाहेरून आलेल्या राजांनी द्राविड भाषा न उचलता महाराष्ट्री (संस्कृत प्राकृत अवतार), आत्मसात केली.(पृ.२०३) त्या पुढे म्हणतात, सर्व भारताची संस्कृती ज्या काव्यामध्ये साकारली ते वैदर्भी रीतीत होते, म्हणजे विदर्भाचे संस्कृत परंपरेमधील स्थान लक्षात येते. जसा अपरान्त त्याचप्रमाणे विदर्भ ही अती प्राचीन आर्य (संस्कृत बोलणाऱ्यांची) वसाहत होती. दोन्हीही वसाहती वन्यांच्या प्रदेशात झाल्या. संस्कृत द्राविडांशी लढा करून नव्हे. पहिल्या प्रख्यात वैदर्भीचे नाव लोपामुद्रा आहे. हे नाव आर्य नव्हे. ते लोपामुंडा ह्याचे तर रुप नव्हे ना? मुंड लोकांची राजकन्या लोपा असा त्याचा अर्थ होईल. मुंडांचा नागांशी संबंध होता, त्याबद्दल बौद्ध वाङ्‌मयात पुरावा सापडतो. कोसलाचा राजा पसेनदी याचे मनात गौतम बौद्धाच्या घराण्यात लग्न करून बुद्धाचे नातेवाईक व्हावे असे होते.

वासभखत्तिया यांच्या विवाहातून जन्मलेल्या विडुडभ याने सर्व शाक्य कुळाचा नाश केला. ही कथा पाली वाड्:मयात सांगितली आहे. इ.स. पूर्व ५०० ते ६०० वर्षांची ती कथा आहे. म्हणजे त्या वेळी नाग व मुंड एक असावेत असे दिसते. (पृ.२१३ व १४). इरावती कर्वे यांनी पुढे या संदर्भात अधिक माहिती देताना म्हटले आहे की, महाराष्ट्राचे राजे शातवाहन यांनी प्रतिष्ठान ऊर्फ पैठण येथे राज्य केले. प्राकृत भाषेला उत्तेजन दिले व पर्यायाने मराठीच्या जन्माला मदत केली. महाराष्ट्रातील बहुतेक सर्व संतकवींचा जन्म मध्य महाराष्ट्रात झाला व हल्लीच्या मराठीचे स्वरूप त्यांनी निश्चित केले. या प्रदेशाला जुने नाव अश्मक आहे. अश्मकाचे सर्वात प्रसिद्ध राजे म्हणजे प्रतिष्ठानचे शातवाहन. त्यांच्या आधी प्रतिष्ठानला नरसिंह नावाचा राजा होता, असा उल्लेख सोमस्वामीच्या कथा सरित्सागरात सापडतो. त्या कथेबद्दल कै. श्री.व्यं. केतकरांनी प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासात लिहिले आहे. शातवाहनांना संस्कृत माहीत नव्हते, त्यांनी प्राकृताला आश्रय दिला, महारठी नावाच्या मांडलिक राजांशी लग्नसंबंध जोडला असे दंतकथा व शिलालेखांवरून दिसते. शातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट व यादव या घराण्यांनी महाराष्ट्रावर एकामागून एक राज्य केले. महराष्ट्रातील बुद्ध लेणी शातवाहनांच्या व वाकाटक आणि चालुक्यांच्या कारकिर्दीतील आहेत. त्यातील सर्व लेख प्राकृतातील आहेत.

लिलावती या अपभ्रंश भाषेत लिहिलेल्या काव्यात सुप्रसिद्ध बौद्ध पंडित नागार्जुन हा हालाचा मित्र व हितोपदेशक होता असे म्हटले आहे. त्यांच्या संबंधी रठ्ठ आणि महारठ यांची नावे शिलालेखात येतात. यांचे प्रमुख शिलालेख पश्चिम महाराष्ट्रात आहेत. आंध्र व कर्नाटक अशा दोन संस्कृतिसंपन्न राष्ट्रांशी बरोबरी करून मराठीने आपल्या दक्षिण सीमा पक्क्या केल्या; एवढेच नाही, तर मराठी भाषा कर्नाटकाच्या गाभ्यापर्यंत पोहोचली, याला अनेक सांस्कृतिक कारणे आहेत. प्रख्यात सूत्रकार बौद्धायन व आपस्तंभ दाक्षिणात्य होते. बृहत्कथेत अपाणिनीय अशा ऐन्द्रादी व्याकरणांचा उल्लेख येतो ती दक्षिणात्यांनी रचिलेली होती असे दिसते.

चालुक्य व राष्ट्रकूट दोघेही जैनानुयायी होते, व त्यांच्या आश्रयाखाली पुष्कळ महत्त्वाचे जैन ग्रंथ महाराष्ट्रात लिहिले गेले. पुष्पदंताचे हरिवंशपुराण राष्ट्रकूट राजांच्या अमदानीत मान्यखेड (मालखेड) येथे रचले गेले. कर्नाटकाच्या गाभ्यात महाराष्ट्री भाषेत ग्रंथनिष्पती राजाश्रयाने होत होती असे स्पष्ट दिसते.






श्रवणबेळगोळचा हा शिलालेख मराठ्यांच्या आक्रमक राजसत्तेचे प्रतीक नसून जैनांच्या धर्मप्रसाराचे आहे. मध्ययुगात भाषेच्या बाबतीत मराठीची आई जी महाराष्ट्री, तिचे वर्चस्व दक्षिणेत होते व तीत उत्तम ग्रंथांची उत्पत्ती होत होती. कोऊहल कवीने रचलेल्या लिलावती काव्यात तो स्वत:चे काव्य मरहट्ठ देशी लिहिल्याचे सांगतो. काव्याचा काळ सुमारे ख्रिस्ताब्द ८०० असावा असे तज्ज्ञांचे मत आहे. शातवाहन हे राजाचे नाव ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकापासून तो थेट सप्तशती हालापर्यंत आढळते. यातील एक शातवाहनाची (ख्रिस्तपूर्वीच्या शातवाहनाची) राणी पंडिता होती. ती राजाजवळ विनोदाने जे संस्कृत बोलली ते राजाला कळले नाही. म्हणून ती हसली व राजा अपमानित होऊन निघून गेला. राजाने सहा महिन्यांत भाषा शिकण्याचा निश्चय केला व तो जी भाषा शिकला ती प्राकृत, हा कथाभाग बृहत्कथेच्या आरंभी येतो व त्यात वररुचीचे नाव प्रामुख्याने येते. मराठी वाड्:मयाच्या प्रौढत्वाची, स्वयंसिद्धतेची बीजे ही या प्राकृत वाड्:मयात आहेत. बृहत्कथेला जगातील कथा वाड्:मयात तोड नाही. हालाच्या सप्तशतीतील काव्य लोकवाड्:मय आहे. कुठल्यातरी राजाच्या राजकवीने केलेले ते काव्य नसून महाराष्ट्रात प्रचलीत असलेल्या लोकप्रिय काव्याचे ते संकलन आहे. त्यात राज्यांच्या दरबाराचे चित्रण नसून गावगाडयाचे, पाटलाचे, पाटलाच्या सुनेचे म्हणजेच महाराष्ट्राच्या साध्या ग्रामीण जीवनाचे चित्र पाहावयास सापडते. लिलावती ही अद्‌भुतरम्य कथा हाल राजाबद्दल आहे. त्यातही महाराष्ट्राचा प्राण जे प्रतिष्ठान नगर व तेथील गोला ऊर्फ गोदावरी नदी व तीत नहाणाऱ्या, अंगाला हळद फासणाऱ्या महाराष्ट्र सुंदरीचे वर्णन आढळते. हा कवी आपल्या भाषेला मरहठ्ठ देसी भाषा असे नाव देतो. (पृ.२२३-२६)

दुर्गा भागवतांनी राजारामशास्त्री भागवतांच्या संशोधनाचा निष्कर्ष सांगताना म्हटले आहे की, जुनी महाराष्ट्री संस्कृतपेक्षा जुनी व खरी जिवंत भाषा आहे हे त्यांनी दाखवले आहे. (पृ.२)

थोर संशोधक श्री.व्यं.केतकर, राजारामशास्त्री भागवत, वि.का.राजवाडे, इरावती कर्वे, कृ.पां. कुलकर्णी, दत्तो वामन पोतदार, वि.ल.भावे, रा.भि.जोशी आदींच्या उपरोक्त संधोधनाच्या आधारे माहाराष्ट्री(मराठी) भाषा ही किमान अडीच हजार वर्षे जुनी असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. माहाराष्ट्री, मऱ्हाठी भाषेचा हा अडीच हजार वर्षांचा प्रवास साधार उलगडला म्हणजे मराठी भाषा ही अभिजात भाषा असल्याचे निर्विवादपणे सिद्ध होते.

लोकराज्य जानेवारी-फेब्रुवारी २०१२ मधून पुनर्मुद्रित

जागतिकीकरणाच्या वादळात मराठी भाषा आपली पताका घेऊन ठामपणे उभी आहे. २७ फेब्रुवारी हा मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त मराठी भाषेबद्दल कवींनी व्यक्त केलेल्या काही कविता.....

# आम्ही गातो मराठी...



माझा मऱ्हाठाचि बोलू कौतुकें।
परी अमृतातेंहि पैजां जिंके।
ऐसीं अक्षरें रसिकें। मेळवीन।।
-संत ज्ञानेश्वर

## रक्तात मराठी बाणा

अलवार कधी, तलवार कधी
पैठण सुबक नऊवार कधी
कधी कस्तुरीचा दरवळ दैवी
ती सप्तसुरांवर स्वार कधी
डोलात फडकते रायगडी
नाचते कधी भीमेकाठी
ही माझी माय मराठी
ही माझी माय मराठी
श्वासातली झिंग मराठी
जगण्याचा थाट मराठी
या संस्कृतीच्या पदराचा
जरतारी काठ मराठी
भिडतो आवेश मराठी
जडतो संस्कार मराठी
मातीच्या अभिमानासाठी
लढतो झुंजार मराठी
मऱ्हाठीचा मळवट माथी
मऱ्हाठी बाज शब्दांना
हा रंगढंग मऱ्हाठी माझ्या
रक्तात मराठी बाणा
- गुरु ठाकुर

## मराठी अभिमान गीत

– कवी : सुरेश भट

लाभले अम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी

आमुच्या मनामनात दंगते मराठी
आमुच्या रगारगात रंगते मराठी
आमुच्या उराउरात स्पंदते मराठी
आमुच्या नसानसात नाचते मराठी

आमुच्या पिलापिलात जन्मते मराठी
आमुच्या लहानग्यात रांगते मराठी
आमुच्या मुलामुलीत खेळते मराठी
आमुच्या घराघरात वाढते मराठी

आमुच्या कुलाकुलात नांदते मराठी
येथल्या फुलाफुलात हासते मराठी
येथल्या दिशादिशात दाटते मराठी
येथल्या नगानगात गर्जते मराठी

येथल्या दरीदरीत हिंडते मराठी
येथल्या वनावनात गुंजते मराठी
येथल्या तरूलतात साजते मराठी
येथल्या कळीकळीत लाजते मराठी

येथल्या नभामधून वर्षते मराठी
येथल्या पिकांमधून डोलते मराठी
येथल्या नद्यांमधून वाहते मराठी
येथल्या चराचरात राहते मराठी

## परिमळांमाजी कस्तुरी

जैसे हरळांमाजी रत्नकिळा ।
कि रत्नांमाजी हिरा निळा ।
तैसी भाषांमाजी चोखळा ।
भाषा मराठी ।।
जैसी पुष्पांमाजी पुष्प मोगरी ।
परिमळांमाजी कस्तुरी ।
तैसी भाषांमाजी साजिरी ।
भाषा मराठी ।।
पखियांमध्ये मयोरु ।
रुखियांमध्ये कल्पतरु ।
भाषांमध्ये मान थोरु ।
मराठीयेसी ।।
तारांमध्ये बारा राशी ।
सप्तवारांमध्ये रवि-शशि ।
या दीपिंचेया भाषांमध्ये तैसी ।
बोली मराठीया ।।
- फादर स्टिफन्स

## मराठीपण

माझं मराठीपण मी शोधलं
सह्याद्रीच्या डोंगरात
संतांच्या शब्दात
इतिहासाच्या पानात
तेव्हा हसून
सारीजण म्हणतील
आम्ही शोधलं
आमचं मराठीपण
या भूमीवरील
माणसांच्या मनात
त्यांच्या जखमात
त्यांच्या रक्तात
त्यातून उसवतात सूर्याची किरणे
मराठीपण ओलांडून
साऱ्या आकाशाला
गवसणी घालणारे..
- कुसुमाग्रज

# मराठी हृदयातली, मनातली

**जागतिकीकरणामुळे मानवी जीवनात आमूलाग्र बदल होत आहे. या पार्श्वभूमीवर मराठीतील बोलीभाषांच्या संदर्भाने विचार केला तर त्या भाषा दिवसेंदिवस अडचणीत येत असल्याचे चित्र जाणवते. महाराष्ट्रात राजकीय कालखंडानुसार समाजजीवनात कमालीचे बदल होत गेल्याला इतिहास साक्ष आहे. वर्तमानात आपण 'ग्लोबलकाळ' अनुभवत आहोत. जागतिकीकरणाच्या व्यापक प्रक्रियेमुळे व जग जवळ आल्यामुळे समाज, व्यक्ती आणि भाषा यांच्यातील परस्परसंबंध नवी वळणे घेत असल्याचे जाणवते. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक बोलीभाषा झपाट्याने लुप्त होत आहेत.**



**डॉ. वैजनाथ अनमुलवाड**

आजच्या काळात 'इंग्रजी' सारख्या ज्ञानभाषांना केंद्रवर्ती ठेवून प्रामुख्याने व्यवहार केले जात आहेत. जागतिक स्तरावर इंग्रजी भाषा आणि तिचे प्रभुत्व किती व्याप्त आहे याविषयी जगातल्या अनेक भाषाभ्यासकांनी वेगवेगळ्या अंगांनी मीमांसा केली आहे. त्यापैकीच डॉ. प्रकाश परब म्हणतात- एकीकडे 'इंग्रजी'सारखी भाषा साम्राज्यवादी इतिहास, तसेच विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग आदी क्षेत्रांतील आंतरराष्ट्रीय व्यवहार यांमुळे जागतिक संपर्क भाषा म्हणून वेगाने वाढत आहे, तर दुसरीकडे शेकडो भाषा किंवा बोलीभाषा नामशेष होणाच्या मार्गावर आहेत. बदलत्या आर्थिक धोरणांमुळे व जीवनसंघर्षामुळे समाजाच्या भाषा निवडीवर व भाषावृत्तीवरही परिणाम होताना दिसत आहे. यावरून असे लक्षात येते की, मायबोली ही केवळ संप्रेषणाचे, भौतिक प्रगतीचे साधन नसून त्यापलीकडेही तिला एक सामाजिक, सांस्कृतिक भूमिका असते. समाजाची 'ओळख' पृथगात्मक असते, बोलीभाषांचे वास्तव रेखाटणारे असे अनेक विचार पुढे येत आहेत.

एकूणच भारतीय भाषा किंवा बोलींच्या संदर्भाने विचार करत असताना डॉ. गणेश देवी यांच्या भाषा संदर्भातील कार्याचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. ते 'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण' या ग्रंथामध्ये म्हणतात की, १९५१च्या जनगणनेनुसार भारतात एकूण ७८२ भाषा व बोली नोंदवण्यात आल्या, तर ही संख्या १९६१ मध्ये १६५२ पर्यंत वाढलेली होती. त्याहीपूर्वी सर जॉर्ज ग्रीअर्सनच्या 'लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया' (१९०३-१९२३) ने १९व्या शतकाच्या शेवटच्या दशकात भारतातील जी माहिती गोळा केली त्यानुसार भारतात त्या काळात १७९ भाषा आणि ५४४ बोली अस्तित्वात होत्या. १९२१ जनगणनेनुसार तेव्हाच्या भारतात १८८ भाषा अन् ४९० बोली अस्तित्वात होत्या. एखाद्या देशातील भाषिक व्यवहार किती गुंतागुंतीचा असतो हे वरील उदाहरणावरून लक्षात येते. जगातील भाषिक संचित नष्ट झाले तर त्या भाषेत हजारो वर्षांपासून अभिव्यक्त होणारी लोकसंस्कृती नष्ट होते. विपुल ज्ञान संपुष्टात येते.

## बदलता काळ आणि बोलीभाषा

आजच्या बदलत्या काळामध्ये अनेक क्षेत्रांत जे आमूलाग्र बदल होत आहेत, त्याच स्वरूपाचे बदल भाषेतही होत आहेत. बोलीभाषेच्या संदर्भाने हा बदल अतिवेगात होत असल्याचे निदर्शनास येते. 'सध्या जगात अस्तित्वात असलेल्या सुमारे सहा हजार भाषांपैकी तीन हजार भाषा या चालू शतकाच्या अखेरपर्यंत संपलेल्या असतील अशी सार्वत्रिक चर्चा आहे. भाषेची आजची स्थिती पाहिल्यास तिच्या मृत्यूचा वेग दर दोन आठवड्यांना एक भाषा असा आहे. सध्या जगात केवळ १०० पेक्षा कमी भाषक असलेल्या ५०० भाषा आहेत, १,५०० भाषांमध्ये केवळ १,००० भाषक आहेत व ३,००० भाषा अशा आहेत की, ज्यांना प्रत्येकी फक्त १०,००० भाषक उरले आहेत.'

बोलीभाषा नष्ट होण्याची ही आजची वास्तवता किती भीषण आहे हे वरील उदाहरणावरून आपल्या लक्षात येते. भविष्यात भाषा नष्ट होण्याचे चित्र अधिक गडद होण्याची शक्यता नाकारता येत नाही. बदलत्या काळात बोलीभाषेचे अस्तित्व टिकवायचे असेल तर ती भाषा बोलणारे लोक जगवले पाहिजेत, भाषा जिवंत ठेवण्यासाठी माणसे जिवंत ठेवायला लागतात. कारण,

पिढीगत संस्कृतीच्या विभिन्न अंगांचे दर्शन बोलीभाषेच्या माध्यमातून घडत असते, पण बोलींचा अभ्यास मात्र क्वचित केला जातो. उलटपक्षी, लिपिबद्ध भाषेचा अभ्यास अधिक केला जातो. पण हेही लक्षात घेतले पाहिजे की, बोलीच्या विकासाला किंवा ऱ्हासाला संबंधित भाषक जबाबदार असतात. एखादी प्रगत भाषा सामाजिक उपेक्षेमुळे मागे पडू शकते, त्याचप्रमाणे उपेक्षित भाषा नियोजनाच्या योग्य मार्गाने प्रगतिप्रथावरही आणता येते. उदा. हिब्रू, कोंकणी इ. थोडक्यात असे म्हणता येईल की भाषेच्या मृत्यूला जशी आर्थिक, नैसर्गिक आपत्ती कारणीभूत असते तशाच सामाजिक आणि मानसशास्त्रीय बाबीदेखील जबाबदार असतात. आज उपलब्ध असलेल्या अनेक भाषांपैकी केवळ ८७ भाषांमध्ये वर्तमानपत्रे प्रसिद्ध होतात. ७१ भाषांतून रेडिओचे कार्यक्रम प्रसारित होतात आणि १५ भाषांमध्ये चित्रपट निर्माण होतात, ही आजच्या भारतीयांची भाषिक स्थिती आहे. यात भर पडणे ही काळाची गरज आहे.

## महाराष्ट्रातील बोलीभाषा

महाराष्ट्रात भौगोलिक रचनेनुसार बदलत गेलेली भाषेची अनेक रूपे आढळून येतात. उदा. अहिराणी, आगर, कोहळी, खानदेशी लेवा, संदगडी, झाडी, तावडी, पोवारी, मालवणी, वाढवळी, सामदेवी आणि संगमेश्वरी त्याशिवाय आदिवासी जमातींच्या जवळपास २३ बोलीभाषा, भटक्या विमुक्तांच्या १९, त्याशिवाय भौगोलिक क्षेत्र स्पष्ट करणाऱ्या नागपुरी, नागरी, कोल्हापुरी, सातारी, मराठवाडी, चंदगडी, कोंकणी इत्यादी भाषा आहेत.

बदलत्या काळाच्या पार्श्वभूमीवर स्थानिक भाषकांच्या गुंतागुंतीच्या संकल्पना त्यांच्याच भाषेतून व्यक्त करण्याची क्षमता दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. बोलीभाषेतील शब्दवैभव, पारंपरिक ज्ञान, शाब्दिक कलांची गुंफण, अवीट माधुर्य ही वैशिष्ट्ये केवळ बोलीभाषेतच सापडतात. त्याची सर प्रमाण भाषेला कशी येईल? बोलीभाषेची ही वैशिष्ट्ये मान्य करूनही माणसाला वेगवेगळ्या कारणांमुळे अन्य भाषा शिकाव्या लागतात. एकापेक्षा अधिक भाषा शिकण्याचे बौद्धिक सामर्थ्य निसर्गत:च त्यास प्राप्त झाले असते. पण स्वभाषा सोडून परभाषेमुळे आपले फार कल्याण होईल असा समज समाजात सर्वत्र पसरला आहे. त्यामुळे स्वभाषा आणि बोलीभाषांची स्थिती अत्यंत खालावत चालली आहे.

'भाषा' आणि 'बोली'त आपण नेहमीच फरक करतो. म्हणजेच 'प्रमाणभाषा' आणि 'बोलीभाषा' यांत एक भेदरेषा आहे असे गृहीत धरून ती रेषा अधिक गडद करून टाकतो. अशा टोकाच्या भूमिकेमुळे 'प्रादेशिक बोलीभाषां'ची स्थिती अधिक गंभीर बनत चालली आहे. सामाजिक भेदरेषेच्या विषमतेमुळेदेखील बोलीभाषेच्या



गतीमध्ये प्रगती होत नसल्याचे चित्र स्पष्टपणे जाणवत आहे. या संदर्भातील गणेश देवी यांचे एक उदाहरण पाहू. 'जेव्हा एखाद्या समाजालाच असं वाटायला लागतं की, त्याला उदरनिर्वाहासाठी दुसऱ्या भाषेत शिक्षण घेणं गरजेचं आहे, तेव्हा तो समाज नवीन भाषिक परिस्थिती स्वीकारायचा निर्णय घेतो. म्हणूनच सध्याच्या जगातल्या भाषिक वारशाचा ऱ्हास होत आहे? ही प्रक्रियाच भाषिक संहाराला चालना देते का? याचा विचार आताच करणे प्रसंगोचित ठरेल. तसे असेल तर मानवी भाषांचे भवितव्य संकटात आहे हे मान्य करावे लागेल. सांस्कृतिक पातळीवर जे समाज घटक आधीच अल्पसंख्य आहेत, स्थानिक तसेच राष्ट्रीय पातळीवर जे समाज दुर्बल ठरले आहेत, ज्या समाजाचा आवाज आधीच क्षीण झाला आहे, ते भाषा-संहाराला सगळ्यात आधी बळी पडणार हे उघड आहे.' यावरून आजची बोली आणि बोली-भाषकांची स्थिती लक्षात येते. प्रमाण भाषेचा उदय अखेर बोलीभाषेतूनच होत असतो. प्रमाणभाषेवर विश्वास असणाऱ्यांनी बोलीभाषेला उपेक्षित ठेऊ नये. त्याचे योग्य संवर्धन आणि जतन केले तर प्रमाणभाषा अधिक समृद्ध होईल, यात शंका नाही.

महाराष्ट्रात 'भाषिक जाती' निर्माण होण्याची जुनी परंपरा आहे. जागतिकीकरणाचा स्वीकार केल्यापासून एक नवीन 'इंग्रजी' बोलणारा वर्ग तयार झाला. वरिष्ठ नोकऱ्यांची त्याने मक्तेदारी घेतली. या वर्गाला बोलीभाषेचा, संस्कृतीचा किंवा मराठीचा कधीच अभिमान नसतो. त्यांची मुले इंग्रजी माध्यमात शिक्षण घेतात. बोलीभाषा किंवा मातृभाषा बोलणाऱ्यांची मुले मात्र मराठी माध्यमातूनच शिक्षण घेतात. यामध्ये गरीब मजूर, शेतकरी, कामगार यांच्या मुलांचा समावेश अधिक प्रमाणावर असतो.

'इंग्रजी भाषेचा पुरस्कार आणि मराठी भाषेची हकालपट्टी ही गोष्ट गरिबांच्या फायद्याची नाही. लोकशाहीत लोकभाषेला महत्त्व की परकीय भाषेला? पण आपली मक्तेदारी टिकवण्यासाठी लोकशाहीचा, लोकभाषेचा बळी देणारी माणसे बरीच तयार झाली आहेत. यांची ही मक्तेदारी संपुष्टात आणली पाहिजे.'

भाषा टिकवणे किंवा जतन करणे हे काम काही पुरातन अवशेष टिकवण्यासारखे नाही. दैनंदिन व्यवहारात तिचा अधिकाधिक वापर करणे, ती अधिक गुणवत्तापूर्ण व्हावी यासाठी भाषाविकास प्रक्रिया गतिमान करणे, योग्य नियोजन करणे हे आपले आद्यकर्तव्य असले पाहिजे. आज राज्य शासनाने भाषा विकासासाठी पाऊल उचलले आहे. ही बाब मराठी भाषाविकासासाठी महत्त्वाची आहे असे म्हणता येईल. स्वतंत्र मराठी भाषा विभाग, भाषा संचालनालय, राज्य मराठी विकाससंस्था, विश्वकोश निर्मिती मंडळ, साहित्य आणि संस्कृती मंडळ इत्यादी

## वातावरण आणि बोलीभाषा

भौगोलिक परिस्थिती, वातावरणानुसार बोलीभाषेची रूपे बदलत असतात. उदा. समुद्राटावरील लोकांची भाषा लांब पट्ट्यातली असते. डोंगराळ भागातील लोक कडक बोलतात, तर थंड हवेच्या ठिकाणचे लोक मुलायम आणि मधुर भाषा बोलतात. ‘दहा कोसावर भाषा बदलते असे आपण म्हणतो; पण केवळ भाषाच बदलते असे नाही; तेथील दगड, डोंगर, माळ, जमीन, हवा, पाणी, पिके, अन्न व धान्याच्या चवी ह्या सगळ्यात काही वेगळेपण दिसत असते. त्याचा परिणाम भाषेवर नकळत होत असतो.’

वर्तमानातील विविध चित्रपट, नाटक किंवा दूरदर्शनवरील विविध कार्यक्रमांद्वारा भाषेची मोठ्या प्रमाणावर मोडतोड होताना दिसत आहे. एका चित्रवाणीवरील खाद्यपदार्थ कार्यक्रमातील मराठी भाषेच्या संदर्भातील एक उदाहरण पाहू. ‘चिप्स मीडियम फ्राय करून लाइट रेड कलर आला की त्यात ग्रीन चिलीचे बारीक पिसेस मिक्स करायचे, कोरियांडर किंवा दुसऱ्या कोणत्याही ग्रीन व्हेजिटेबलचे टेंडर लीव्ज टॉपवर डेकोरेशनसाठी जेन्टली स्प्रेड करायचे आणि थोडा म्हणजे हाफ स्पूनफुल लाइम ज्यूस स्प्रिंकल करून सर्विंग बाऊलमधून सर्व करायचे...’ ही आजच्या मराठी भाषेची स्थिती आहे. एखाद्या भाषेचे रूपसौंदर्य बदलले की, त्या भाषेची काय अवस्था होते हे वरील उदाहरणावरून आपल्या लक्षात आलेच असेल. स्वभाषेत इतर भाषेतील शब्द आलेच पाहिजेत. त्यामुळे ‘भाषा’ प्रवाही बनते. पण त्या शब्दांचा इतकाही भरणा नको की, जेणेकरून मूळ भाषेचे अस्तित्वच शिल्लक राहणार नाही.

ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान आदी क्षेत्रांत इंग्रजी भाषेचे प्राबल्य अधिक आहे. इंटरनेट, मोबाइल इत्यादींवरील व्यवहार बहुतांश इंग्रजी भाषेतूनच चालतात. त्या भाषेचा तिरस्कार न करता आपण आपली मातृभाषा जतन करावी, तिचा पुरस्कार करावा. व्यवहार, व्यापार शिक्षण मातृभाषेतूनच अधिक व्हावे. भावी पिढीस बोलीभाषांचे महत्त्व पटवून सांगावे. प्रत्येकाने बोलीभाषेचे संवर्धन, संकलन व जतन करण्यासाठी सामूहिक पातळीवर प्रयत्न करावा. एक व्यापक अशी भाषा चळवळ उभी करून जागोजागी ‘लोकभाषा संवाद केंद्रा’ची उभारणी करावी, तरच बोलीभाषा नष्ट होण्याचे दुष्टचक्र संपुष्टात येईल.

बदलत्या काळात स्वभाषा किंवा बोलीभाषांपुढे कितीही मोठी डोंगराएवढी आव्हाने असली तरीही त्यावर उपाय शोधता येतात. त्यापैकीच एक ठोस उपाय म्हणजे स्वभाषाभिमान होय.



उपक्रमांद्वारे भाषेला आणखी समृद्ध करण्याचे ठोस प्रयत्न केले जात आहेत. परिचय ग्रंथ, बोली अकादमी याशिवाय विविध साहित्यप्रकारांच्या माध्यमांतूनही मराठीचे किंवा प्रादेशिक बोलीभाषेचे आविष्करण होत आहे.

मध्ययुगीन काळातील कीर्तन, भारूड, अभंग, दशावतारी, शाहिरी वाङ्मय, स्फुट रचना वगैरेंच्या माध्यमांतून ‘बोली’चे विविध प्रयोगशील आविष्कार झाल्याचे दिसते. तसेच दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी इत्यादी वाङ्मयप्रवाहांच्या माध्यमातून विविध बोलीभाषांद्वारे साहित्यनिर्मिती मोठ्या प्रमाणावर होत आहे. पथनाट्य, वगनाट्य, चित्रपट, दूरदर्शन, आकाशवाणी, वर्तमानपत्रे यांतूनही बोलीचे उपयोजन होत आहे. अशा प्रकाराच्या विविध प्रयोगांतून बोलीभाषेचे नियोजनबद्ध उपक्रम राबवले तर ती अस्तित्वात राहील. ‘लोकसाहित्यातील परंपरागत वस्तू, चित्रमाला, पोषाख, विधिनाट्य किंवा वासुदेव, पोतराज, इत्यादी व्यक्तिविशेषांचे त्यांच्या त्यांच्या भाषाशैलीसह उपयोजन करून विद्यमान आशयसूत्रांचा आविष्कार करणे म्हणजे भाषा प्रवाही ठेवणे होय.’ अशा प्रकारे विविध पातळ्यांवर भाषा अखंडित किंवा प्रवाहमय ठेवण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न केले तर तिचे गुणवत्तापूर्ण अस्तित्व टिकून राहू शकते.

**संदर्भसूची** : १) डॉ. प्रकाश परब, पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागातील उदबोधन वर्गात दि. १७/ १२/ २००४ ते ०६/०१/ २००५ या कालावधीत दिलेले व्याख्यान. २) डॉ. गणेश देवी, भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण, संपा. अरुण जाखडे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे २०१२. ३) डॉ. वैजनाथ अनमुलवाड, संपा. इसाप प्रकाशन, नांदेड. ४) अरुण साधू, लोकराज्य, फेब्रु. २०१४. ५) गणेश देवी, लोकसत्ता, दि. २२ सप्टें. २०१३

**सहायक प्राध्यापक, मराठी भाषा विभाग,**
**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

**मराठीच्या संवर्धनासाठी शासकीय पातळीबरोबरच खासगी संस्था आणि व्यक्ती विशेष प्रयत्न करत आहेत. त्यामुळेच एकेकाळी महाजालाच्या अर्थात इंटरनेटच्या जाळ्यात मराठी हरवून बसेल असे वाटत असताना महाजालावरही मराठी आपले स्थान बळकट करीत आहे. महाजालावर मराठी अधिकाधिक पोहोचवण्यात मराठी तरुणाईने घेतलेला पुढाकार निश्चितच उत्साह वाढवणारा आहे.**

# महाजालात मराठी

**किशोरी महाबळे**

मराठी भाषेवरील वाढत्या अतिक्रमणाबाबतची चर्चा महाजालाच्या आगमनानंतर अधिक तीव्र झाली. बहुतेक कामे संगणकावर होत असल्याने आणि संगणकाची भाषा (येथे संगणकाच्या माध्यमातून संपर्कासाठी वापरली जाणारी) मुख्यत्वे इंग्रजी असल्याने मराठी भाषेची काळजी करणाऱ्यांसमोर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. ९० च्या दशकात वाटणारी ही चिंता २००० च्या दशकांत कमी झाली आणि २०१० नंतर तर मराठी ही आता विश्वाच्या अन्य भाषांच्या रांगेत पहिल्या दहामध्ये येण्यास सिद्ध झाली आहे. युनिकोडचा शोध हा या सर्वात महत्त्वाचा घटक म्हटला पाहिजे. त्यासोबतच मराठी वृत्तपत्रांनी सुरू केलेली संकेतस्थळे आणि विकिपिडीयापासून समाजमाध्यमांत मराठीचा आग्रह धरणारा नवा तरुण, यामुळे मराठी भाषा अभिव्यक्तीचे सशक्त माध्यम ठरत आहे.

## इतिहास वाहक

जगभरात बारा कोटींहून अधिक लोकांची मराठी ही मातृभाषा आहे. मराठी केवळ भाषा नाही तर ती महाराष्ट्राची इतिहास आणि संस्कृतिवाहक आहे. त्यामुळे नव्या बदलत्या माध्यमातून ती मागे पडते की काय, अशी चिंता होती, परंतु अनेक आक्रमणांना पचवणाऱ्या मराठीने संगणक आक्रमणात स्वत्व टिकवलेच नाही तर आज ती जगभर आपल्या पताका मोठ्या दिमाखात मिरवते आहे. यामागे देवनागरी लिपिचा जास्तीत जास्त वापर करणाऱ्या आणि तो करण्यासाठी आग्रही राहणाऱ्या तरुणांचा वाटा महत्त्वाचा आहे. माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाने आयोजित समाज माध्यम संमेलनातही तरुणांनी हाच मुद्दा मांडला. समाज माध्यमांतून सर्जनशील




काम करत लाखो मराठी चाहत्यांपर्यंत पोहोचलेल्या तरुणांनी येथे आपले विचार मांडले. ट्विटरवरील मराठी प्रसाराची गरज ओळखून ट्विटर संमेलन आयोजित करणारे स्वप्निल शिंगोटे यांनी ट्विटर साहित्य संमेलनाविषयी माहिती दिली. देश-विदेशात कामानिमित्त पसरलेल्या मराठी बांधवांना या संमेलनात सहभागी होता यावे, यासाठी ही कल्पना सुचल्याचे त्यांनी सांगितले. ट्विटरसारख्या माध्यमावर जास्तीत जास्त नेटकऱ्यांनी मराठीमध्ये लिहावे आणि त्या माध्यमातून मराठीचा प्रसार व्हावा या उद्देशाने ट्विटरसंमेलन या अनोख्या मोहिमेचा जन्म झाला आहे. या ऑनलाइन संमेलनामध्ये 'ट्विटर संमेलन' हा हॅशटॅग वापरून ट्विपल्सला सहभागी होता येते. या हॅशटॅगबरोबरच ट्विपल्स त्यांनी लिहिलेल्या साहित्यासाठी देण्यात आलेला विशेष हॅशटॅगही वापरू शकतात. यामध्ये एकूण बारा हॅशटॅग देण्यात आले असून त्यात कविता, ब्लॉग, कथा, शाळा, खमंग अशा वेगवेगळ्या विषयांवरील हॅशटॅग देण्यात आले आहेत. याला मराठी नेटकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत असून केवळ महाराष्ट्र आणि भारतातीलच नव्हे तर जगभरामधील नेटकरी या संमेलनाच्या माध्यमातून आपल्या लिखाणाने सहभागी होतात. एका अर्थाने हे नवकवी, नवलेखकांसाठी व्यासपीठ निर्माण झाले आहे.

आपल्या भाषेच्या मायेची ऊब शब्दात वर्णन करता येत नाही. म्हणूनच कोल्हापूर-सांगली येथे आलेल्या महापुराचा सामना करण्यासाठी मराठीतून आर्त हाक देताच तरुणांनी पुढाकार घेत रातोरात लाखोंची मदत उभी केल्याची माहिती संमेलनात आमंत्रित एका तरुणाने दिली.

केवळ साहित्य संमेलने आयोजित करून किंवा दिन साजरे करून भाषेचा वापर वाढणार नाही तर प्रत्यक्षात संभाषणात, लेखनात सातत्याने वापरत राहिल्याने मराठी भाषा पुढच्या पिढ्यांकडे हस्तांतरित होणार आहे. समाज माध्यमे हे त्यासाठीचे उत्तम साधन आहे.

**आंतरवासिता,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**



भाषावार प्रांतरचनेनुसार दिनांक १ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यापासून स्वतंत्र राज्याचा प्रशासनिक कारभार मराठी भाषेतून करण्याकरिता 'महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४' अन्वये मराठी भाषा ही राजभाषा म्हणून अमलात आली. मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये २२ जुलै, २०१० मध्ये मराठी विभागाची स्थापना करण्यात आली आहे. मराठी भाषेचा प्रचार व प्रसार हे या विभागाचे मुख्य धोरण आहे. या धोरणाची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी मराठी भाषा विभागांतर्गत राज्य मराठी विकास संस्था, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, हे विभाग कार्यरत आहेत.

# मराठीचे संवर्धन मराठीचे श्रेष्ठत्व

**अजय भोसले**

आजच्या मराठीच्या स्वरूपाचा पाया इ. स. पू.२०० च्या कालावधीतील शातवाहन घराण्यात दिसून येतो. त्यानंतरच्या काळात संस्कृत किंवा कन्नड भाषेला राजाश्रय लाभल्याने मराठी भाषेचा विकास मंदावला. त्यानंतर यादवांच्या काळात या भाषेला पुन्हा उभारी मिळाली. दरम्यानच्या काळात मोगलांच्या आक्रमणाने पर्शियन भाषेचा वापर वाढू लागला, अशा स्थितीत वारकरी संप्रदायाने मराठी भाषा जिवंत ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य केले. ब्रिटिश राजवटीत इंग्रजीला मिळालेल्या राजाश्रयामुळे सर्वच प्रादेशिक भाषांवर एक प्रकारचे संकट निर्माण झाले होते. मात्र देश स्वतंत्र झाला आणि भाषावार प्रांतरचना निर्माण झाल्याने प्रत्येक प्रदेशात आपल्या स्थानिक भाषेला, संस्कृतीला उत्तेजन मिळत गेले. महाराष्ट्रात शासनाने मराठी भाषा आणि महाराष्ट्राची संस्कृती यांचे संरक्षण, संगोपन आणि संवर्धन करण्यासाठी १ मे १९९२ रोजी राज्य मराठी विकास संस्थेची स्थापना केली. मराठीच्या संवर्धनासाठी मराठी साहित्य संस्कृती मंडळ, मराठी भाषेच्या शब्दकोश समृद्धीसाठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांची स्थापना करण्यात आली. विविध खासगी संस्था स्वयंस्फूर्तीने मराठीच्या प्रसारासाठी काम करत आहेत.

मराठीच्या प्रसारासाठी शासन स्तरावर अनेक उपक्रम राबवण्यात येतात. मराठी भाषेचे प्राचिनत्व विचारात घेऊन मराठीला अभिजात दर्जा प्राप्त करून घेण्यासाठी समिती नेमण्यात आली. समितीने भाषेची प्राचिनता, मौलिकता व सलगता, प्राचीन भाषा व तिचे आधुनिक रूप यात असलेले नाते विचारात घेऊन आपला अहवाल शासनास सादर केला होता. हा अहवाल केंद्र शासनाकडे पाठवण्यात आला आहे. मराठीच्या सर्वांगीण विकासासाठी पुढील २५ वर्षांची स्थिती विचारात घेऊन सर्वंकष मराठी भाषा धोरण तयार करण्याचे काम सुरू आहे. प्रशासनाच्या अंतर्गत असलेली विविध क्षेत्रीय कार्यालये विखुरलेली असल्यामुळे सर्व कार्यालयांना एकाच ठिकाणी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मुंबई येथे मराठी भाषा भवन निर्माण करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा, मराठी भाषा गौरव दिन, वाचन प्रेरणा दिन इत्यादी माध्यमातून मराठीची ज्योत तेवत ठेवण्याचे कार्य जोमाने सुरू आहे. सर्व विषयातील शब्द मराठी भाषेत उपलब्ध असण्याच्या दृष्टीने विश्वकोश मंडळाच्या



उपक्रमांतर्गत आतापर्यंत २० खंड प्रसिद्ध करण्यात आले आहेत. हे विश्वकोश भ्रमणध्वनी उपयोजकावरही (मोबाइल ॲप) उपलब्ध आहेत.

शासन व न्याय व्यवहारात मराठीचा वापर प्रभावीपणे होण्यासाठी अनेक परिभाषा कोश निर्माण करण्यात येत आहेत. असा कोश आता भ्रमणध्वनी उपयोजकावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. भाषा संचालनालयाने विविध विषयांचे २९ परिभाषा कोश प्रसिद्ध केले आहेत. १० परिभाषा कोशाचे काम हाती घेण्यात आले असून नवीन ३० परिभाषा कोश प्रस्तावित आहेत. राज्य मराठी विकास संस्था मराठीचा वापर अधिक गुणवत्तापूर्व होण्यासाठी चर्चासत्र, प्रकाशने या माध्यमातून मराठी भाषेच्या संवर्धनाचे काम पार पाडत आहे.

राज्य मराठी विकास संस्थेमार्फत इतर राज्यातील मराठी भाषिक विद्यार्थ्यांना मदत, महाराष्ट्राबाहेर काम करणाऱ्या संस्थांना मदत, पुस्तक प्रदर्शन, मोडी हस्तलिखितांचा अभ्यास, अमराठी भाषिकांसाठी उपक्रम, मराठी दुर्मीळ ग्रंथांचे संगणीकरण, संस्थेच्या प्रकरणात प्रकाशनाचे ई-पुस्तक स्वरूपात रूपांतर करणे असे महत्त्वाचे उपक्रम राबवण्यात येतात.

**भाषा सल्लागार समिती** : राज्याचे साधारणपणे पुढील २५ वर्षातील मराठी भाषेचे धोरण ठरविणे, भाषा अभिवृद्धीसाठी नवनवे उपाय व कार्यक्रम सुचवणे व या अनुषंगाने शासनाला मार्गदर्शन करणे, यासाठी भाषा संचालनालयांतर्गत भाषा सल्लागार समिती स्थापना केली आहे.

**अभिजात भाषेचा दर्जा** : एखाद्या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याची कार्यवाही केंद्र शासनाकडून केली जाते. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासंदर्भात अहवाल सादर करण्यासाठी शासनाने ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा तज्ज्ञ संशोधकाची समिती गठित केली होती. या समितीचा अहवाल केंद्राकडे पाठवला असून या संदर्भात केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे



**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा** : मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी, तिचे संवर्धन व भरभराट होण्यासाठी प्रतिवर्षी (१ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीत) मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येतो.

**उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा** : भारतीय घटनेच्या कलम ३४८ (२) अंतर्गत उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा मराठी करण्यासंदर्भात विधि व न्याय विभागाकडून कार्यवाही सुरू आहे.

**परिभाषा कोश शब्दकोश** : भाषा संचालनालयाने आतापर्यंत विविध विषयांचे व ज्ञान शाखांचे परिभाषा कोश, शासन व्यवहार उपयोगी शब्दकोश व शासन व्यवहार उपयोगी मार्गदर्शक पुस्तिका प्रसिद्ध केल्या आहेत. यामध्ये शासन व्यवहार उपयोगी शब्दकोश-६, शासन व्यवहार उपयोगी मार्गदर्शक पुस्तिका-९, परिभाषा कोश-२९, पारिभाषिक शब्दावल्या-४ यांसह ५० प्रकाशने प्रसिद्ध केली आहेत.


**राज्य कायदे मराठीत** : संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या राज्य अधिनियमांची संख्या ६०२ इतकी असून त्यापैकी अद्ययावत करून पुस्तक स्वरूपात प्रसिद्ध केलेल्या राज्य अधिनियमांची संख्या ३२९ आहे.

**मराठी विश्वकोश** : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना १९६० साली करण्यात आली. तदनंतर या मंडळाचे विभाजन होऊन स्वतंत्ररीत्या महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची स्थापना १९८० मध्ये करण्यात आली. मंडळाच्या स्थापनेनंतर मराठी विश्वकोशाचे १ ते २० (संहिता खंड) व खंड २१ (सूचिखंड) प्रकाशित करण्याची योजना होती. त्यानुसार मराठी विश्वकोशाचा पहिला खंड १९७६ मध्ये प्रकाशित करण्यात आला. शेवटचा खंड २० (उत्तरार्ध) हा जून २०१५ मध्ये प्रकाशित करण्यात आला. २०१९ मध्ये २१ सूचिखंड प्रकाशित करण्यात आले. त्याचबरोबर कुमार विश्वकोशाच्या खंड २ जीवसृष्टी आणि पर्यावरण भाग १ (अंकुरण ते ग्लुकोज) भाग २ (घटसर्प ते पॅरामेशियम) मुद्रित स्वरूपात व दृकश्राव्य माध्यमात तसेच ब्रेल लिपीमध्ये प्रकाशित करण्यात आले आहेत. भाग ३ (पांगारा ते लैंगिक पारेषित संक्रमण) या तीनही खंडाच्या मिळून ८५० नोंदी संकेतस्थळावर उपलब्ध करून दिल्या आहेत.

**ज्ञानमंडळे** : मराठी विश्वकोशाच्या अद्ययावतीकरणासाठी ज्ञानमंडळे स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार मराठी विश्वकोश निर्मिती मंडळामार्फत महाराष्ट्रातील वेगवेगळे विद्यापीठे, शैक्षणिक व संशोधन संस्थांमध्ये विषयनिहाय ६० ज्ञानमंडळे स्थापन करण्याचा मंडळाचा मानस आहे. त्यापैकी सद्य:स्थितीत ४५ ज्ञानमंडळे कार्यरत आहे.

**पुस्तकांचे गाव** : महाबळेश्वरजवळील भिलार या गावी कार्यान्वित करण्यात आले आहे. भिलार गावात सार्वजनिक ठिकाणच्या २५ जागा निवडण्यात आल्या असून पर्यटकांना तेथे सहजपणे पुस्तके वाचता येतील अशी योजना आहे.

**रंगवैखरी** : मराठी साहित्यातील मान्यवर लेखकांच्या साहित्यकृतींचा विविध कलांच्या आधारे नाट्याविष्कार सादर करायला लावणाऱ्या रंगवैखरी या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.



**वाचनयात्रा** : वाचनप्रेरणा दिनाच्या दिवशी डेक्कन क्वीन व पंचवटी या गाड्यांच्या पासधारकांच्या डब्यात फिरत्या ग्रंथालयाची वाचनसेवा सुरू करण्यात आली.

**पुस्तक प्रकाशन योजना** : खासगी प्रकाशकांमार्फत साधारणतः जी पुस्तके प्रकाशित करण्यास नकार दिला जातो, अशी पुस्तके जिज्ञासू, चोखंदळ तसेच सामान्य वाचकांस कमी किमतीत उपलब्ध


करून देण्याची ही योजना आहे. या योजनेमध्ये शास्त्रीय (विज्ञान) ग्रंथमाला, उत्कृष्ट ग्रंथांचे भाषांतर, महाराष्ट्राच्या इतिहासाशी संबंधित ऐतिहासिक कागदपत्रांचे संपादन व प्रकाशन, वैचारिक, समीक्षात्मक, चरित्रात्मक (महाराष्ट्राचे शिल्पकार) इत्यादी विषयावरील ग्रंथ प्रकाशित केले जातात. तसेच पुनर्मुद्रणही केले जाते. या योजनेनुसार साहित्य आणि सांस्कृतिक मंडळाने आतापर्यंत ५४९ पुस्तके प्रकाशित केली.

**ललित पुस्तक प्रकाशनार्थ योजना** : या योजनेंतर्गत मराठीतील वैचारिक व शास्त्रीय विषयावरील ग्रंथांची उणीव लक्षात घेऊन लिहिलेल्या शास्त्रीय व तांत्रिक विषयावरील संशोधन व वैशिष्ट्यपूर्ण अशा उच्च दर्जाच्या लेखनाचा विचार अनुदानासाठी केला जातो. पुस्तकाच्या प्रकाशनार्थ अनुदानासाठी व्यक्ती अथवा संस्थांकडून प्राप्त होणाऱ्या पुस्तकाच्या प्रकाशन खर्चाच्या ७५ टक्के इतके एकरकमी परंतु जास्तीत जास्त ३०,००० रुपयांच्या मर्यादेत अर्थसाहाय्य केले जाते.

**नवलेखक उत्तेजनार्थ अनुदान योजना** : या योजनेंतर्गत ज्यांचे एकही पुस्तक प्रकाशित झाले नाही, अशा नवलेखकांना कथा, कादंबरी, ललितगद्य, काव्य, नाटक (एकांकिका), बालवाङ्मय या लेखनाच्या प्रकाशनासाठी मंडळाकडून अनुदान दिले जाते. प्रकाशकांनी नवलेखकांची पुस्तके विहित पद्धतीने मंडळास छापून दिल्यानंतर निर्मिती खर्चाच्या ७५ टक्के अनुदान दिले जाते. या योजनेंतर्गत आतापर्यंत २१९७ नवलेखकांची पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

**कार्यशाळांना अनुदान** : नवलेखकांना ज्येष्ठ साहित्यिकांचे मार्गदर्शन व्हावे, त्यांच्या लेखनात सुधारणा व्हावी, म्हणून महाराष्ट्रात विविध ठिकाणी नवलेखकांची चर्चासत्रे / कार्यशाळा आयोजित केल्या जातात. या योजनेंतर्गत दरवर्षी नवलेखकांच्या ७ कार्यशाळांच्या आयोजनासाठी प्रत्येकी पन्नास हजार रूपये याप्रमाणे एकूण ३ लाख पन्नास हजार अनुदान वितरित केले जाते.

**साहित्य संस्थांना अनुदान** : या योजनेंतर्गत अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, विदर्भ साहित्य संघ, नागपूर, मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, मराठी साहित्य संघ, मुंबई, कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी व दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर अशा एकूण ७ साहित्य संस्थांना विविध वाङ्मयीन उपक्रमांद्वारे मराठी भाषा आणि साहित्याच्या विकासाचे कार्य करण्यासाठी दरवर्षी प्रत्येकी १० लाख रुपये अनुदान देण्यात येते.




**मराठी साहित्य संमेलनास अनुदान** : अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाकडून दरवर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित केले जाते. या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी ५० लाख रुपये अनुदान देण्यात येते. मुख्य साहित्य संमेलनाप्रमाणेच वेगळ्या प्रवाहातील जनसमूहांच्या आणि उपेक्षित वर्गाच्या अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान देण्यात यावे, या महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण - २०१० मधील सूचनेनुसार दरवर्षी २ लाख रुपये याप्रमाणे एकूण रक्कम ३० लाख अनुदान देण्यात येते. गेल्या वर्षापासून हे अनुदान ६० लाख रुपये करण्यात आले.

**नियतकालिकांना अनुदान** : या योजनेंतर्गत विविध विषयांवरील मराठी भाषेत प्रसिद्ध होणाऱ्या ५५ नियतकालिकांना प्रतिवर्षी अनुदान दिले जाते.

**राज्य वाङ्मय पुरस्कार योजना** : या योजनेंतर्गत अ) प्रौढ वाङ्मय विभागात २२ वाङ्मय पुरस्कार, ब) बालवाङ्मय विभागात ६ पुरस्कार, क) प्रथम प्रकाशन विभागात ६ पुरस्कार व ड) सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार १ असे एकूण ३५ राज्य वाङ्मय पुरस्कार प्रदान केले जातात.

**जीवन गौरव पुरस्कार योजना** : मराठी साहित्य / वाड्.मय क्षेत्रात भरीव व मोलाची कामगिरी करणाऱ्या ज्येष्ठ साहित्यिकास ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ साहित्यिक कै.विंदा करंदीकर यांच्या नावे जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येतो. या पुरस्काराचे स्वरूप पाच लाख रुपये रोख, मानचिन्ह व मानपत्र असे आहे.

**श्री.पु.भागवत पुरस्कार योजना** : साहित्य निर्मिती क्षेत्रात लक्षणीय व उत्कृष्ट कार्य करणाऱ्या प्रकाशन संस्थेस प्रकाशन व्यवसायात मोलाचे कार्य करणारे श्री.पु. भागवत यांच्या नावे दरवर्षी पुरस्कार देण्यात येतो. या पुरस्काराचे स्वरूप ३ लाख रुपये रोख, मानचिन्ह व मानपत्र असे आहे.

**बृहद् प्रकल्प योजना** : महाराष्ट्राचे साहित्य, संस्कृती आणि इतिहास हे विषय तसेच विज्ञान, आधुनिक तंत्रज्ञान, समाजविद्या यांच्या कक्षेत येणाऱ्या विषयांवर मराठीमध्ये ग्रंथनिर्मिती करणे हे या मंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या उद्दिष्टानुसार या योजनेंतर्गत साहित्य, संस्कृती, कला, इतिहास, विज्ञान, तंत्रज्ञान, वैचारिक, सामाजिक, समीक्षात्मक, चरित्रात्मक, शास्त्रीय, वाङ्मयीन संशोधन या विषयांवरील वैविध्यपूर्ण, नावीन्यपूर्ण व दुर्मीळ स्वरूपाचे बृहद्ग्रंथ प्रकल्प हाती घेण्यात येऊन ते प्रकाशित केले जातात.

मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्यासंबंधीचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे प्रलंबित आहे. राज्य शासनाकडून त्याचा वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे. यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवरांची देखील मदत घेण्याचा विचार सुरू आहे.

# मराठीच्या संवर्धनासाठी नवे उपक्रम

**डॉ. विश्वजीत कदम,** राज्यमंत्री, मराठी भाषा



मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. राज्याच्या सीमाभागात मराठी भाषेचा प्रचार व प्रसारासाठी उपक्रम राबवण्याचा आमचा प्रयत्न आहे. यासाठी मराठी भाषा विभागांतर्गत असलेल्या राज्य मराठी विकास संस्था, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आदी विविध उपक्रमांचा आढावा घेऊन पुढील दिशा ठरवण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल टाकण्यात येत आहे.

मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्यासंबंधीचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे प्रलंबित आहे. राज्य शासनाकडून त्याचा पाठपुरावा करण्यात येत आहे. यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवरांची देखील मदत घेण्याचा विचार सुरू आहे. तरुण पिढीला मराठी भाषेची गोडी लागावी, यासाठी युवा साहित्यिकांना पुरस्कार सारखे इतर विविध उपक्रम सुरू करण्याचा आमचा मानस आहे. मराठी चित्रपटसृष्टीचेही मराठी भाषेमध्ये मोठे योगदान आहे. त्यामुळे चित्रपट क्षेत्रातील गीतकार, पटकथाकार यांना तसेच संकेतस्थळावर विविध माध्यमातून मराठीचा प्रसार करणाऱ्यांना पुरस्कार देण्यासंबंधीही विचार करत आहोत. मराठी भाषा जागतिक पातळीवर नव्या पिढीपर्यंत पोहोचावी, यासाठी यूट्यूबवर बालगीते, कथा यांच्या छोट्या छोट्या चित्रफिती तयार करण्याचाही आमचा प्रयत्न आहे.

## भाषा संवर्धन

मराठी भाषेचा विकास व संवर्धनासाठी मराठी साहित्यिकांनी केलेल्या सर्व सूचनांचा सन्मान केला जाईल. इंग्रजी माध्यमांच्या शालेय अभ्यासक्रमात मराठी भाषा विषय सक्तीचा करण्याबाबत राज्य शासन लवकरच कायदा करणार आहे. त्यासाठी विधी व न्याय विभाग, शालेय शिक्षण विभाग, मराठी भाषा विभागाची नुकतीच बैठक घेण्यात आली. त्यांच्या सर्व सूचनांचा विचार करून हा कायदा करण्यात येईल. कायदा करताना काही उपसूचना घेतल्या जातील. कर्नाटक व इतर राज्यात असलेल्या कायद्याचा अभ्यास करून मराठी भाषा अधिनियम तयार करण्यात येईल.

महापालिका शाळांमधील मराठी शिक्षणाचा विकास व्हावा, यासाठी मराठी भाषा विभाग प्रयत्न करत आहे. मराठी वर्णमालेसंबंधातील शासन आदेशासाठी विशेष बैठक घेऊन संबंधितांना सूचना दिल्या जातील.

**शब्दांकन : नंदकुमार वाघमारे,** विभागीय संपर्क अधिकारी

## माझ्या मराठीची गोडी

माझ्या मराठीची गोडी
मला वाटते अवीट,
माझ्या मराठीचा छंद
मना नित्य मोहवित.

ज्ञानोबांची तुकयाची
मुक्तेशाची जनाईची,
माझी मराठी गोडी
रामदास शिवाजीची.

'या रे, या रे अवघे जण,
हाक मायमराठीची,
बंध खळाळा गळाले
साक्ष भीमेच्या पाण्याची.

डफ तुणतुणे घेऊन
उभी शाहीर मंडळी,
मुजऱ्याची मानकरी
वीरांची ही मायबोली.

नांगराचा चाले फाळ
अभंगाच्या तालावर,
कोवळीक विसावली
पहाटेच्या जात्यावर.

हिचे स्वरूप देखणे
हिची चाल तडफेची,
हिच्या नेत्री प्रभा दाटे
सात्विकाची, कांचनाची.

कृष्णा गोदा सिंधुजळ
हिची वाढवती कांती,
आचार्यांचे आशिर्वाद
हिच्या मुखी वेद होती.

माझ्या मराठीची थोरी
नित्य नवे रूप दावी,
अवनत होई माथा
मुखी उमटते ओवी.

**कवी - वि. म. कुलकर्णी**



१




२




३

१) मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटा.
२) मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उद्योगपती मुकेश अंबानी आणि आनंद महिंद्रा.
३) सह्याद्री अतिथिगृह येथे महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाबाबत चर्चा.

# माझा महाराष्ट्र, तुमचा उद्योग, सर्वांची समृद्धी

राज्याच्या विकासात रोजगारनिर्मितीला सर्वाधिक प्राधान्य मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले आहे. राज्यातील गुंतवणूक वाढली पाहिजे, त्यासोबतच सध्या जे उद्योग कार्यरत आहेत त्यांच्या अडचणी दूर झाल्या पाहिजेत यासाठी उद्योजक आणि शासन यांच्यातील संवाद अधिक वाढावा यासाठी श्री. ठाकरे यांनी मान्यवर उद्योजकांसमवेत बैठक घेऊन; त्यांच्यासमोरच्या अडी-अडचणी समजावून घेतल्या. राज्य विकासाच्या मार्गावर न्यायचे असल्यास सर्वच क्षेत्राचा विकास होणे आवश्यक असून त्यासाठी राज्यातील सर्व घटकांना बरोबर घेऊन जाण्याचे सूत्र मुख्यमंत्र्यांनी स्वीकारले आहे. शेती, उद्योग आणि शिक्षणासारख्या क्षेत्रांचा विकास हा एकमेकांच्या साथीने होऊ शकतो यावर त्यांचा विश्वास असून त्यादृष्टीने ते निर्णायक पावले टाकत आहेत.

## शेती, शिक्षण, रोजगारासाठी योगदान

राज्यातील विकास कामे गतिने पूर्ण करून त्याद्वारे जनतेचे जीवनमान उंचावण्यावर शासनाचा भर आहे. जे प्रकल्प राज्याच्या हिताचे आहेत, ज्याद्वारे राज्य विकासाच्या वाटेवर अग्रेसर होत आहे त्यांच्यासमोरचे सगळे अडथळे दूर करण्यात येतील, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी उद्योजकांना दिले. हे राज्य केवळ एका घटकाचे नसून सर्व घटकांना ते आपलेसे वाटले पाहिजे त्यासाठी उद्योगांनीही राज्याच्या सर्वांगीण विकासात आपला वाटा उचलला पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

## पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा

गेल्या काही वर्षांमध्ये काही कारणांमुळे काही उद्योग राज्याबाहेर गेले परंतु आता एकही उद्योग बाहेर जाणार नाही याची काळजी शासनाद्वारे घेतली जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

याचप्रमाणे अन्य राज्यांमधील चांगले उद्योगदेखील महाराष्ट्रामध्ये कसे सुरू होतील, यासाठी त्यांना आकृष्ट करण्यात येईल. जमिनीची किंमत, वीज दर, रस्त्यांची तसेच इतर पायाभूत सुविधांची परिस्थिती आणि विविध परवानग्या गतीने मिळणे या संदर्भात उद्योग विभागाला तसेच संबंधित कार्यान्वयीन यंत्रणांना निर्देश देण्यात आले असून उद्योगासमोरच्या अडचणी दूर करण्यात येतील.

## शहरांना ओळख

राज्याच्या विकासात उद्योगांबरोबरच पर्यटन विकासालाही महत्त्व आहे. विशेषतः जर राज्यातील विविध शहरांतील वैशिष्ट्यांना पर्यटनाच्या नकाशावर आणले तर त्यातून पर्यटन वाढेलच त्यासोबतच शहरे विकासाच्या नव्या वाटेवर येतील. त्यासाठी शहरांची ओळख जगभर होईल अशा स्वरूपात या क्षेत्राचा विकास केला जाईल.

## पालिका शाळांचा विकास

शिक्षण क्षेत्रात दर्जेदार बदल घडवण्यासाठी शासनामार्फत पालिकांच्या शाळांमध्ये उत्तम आणि तंत्रज्ञानयुक्त शिक्षण सहज सोप्या पद्धतीने मिळावे, टेलिमेडिसिनसारख्या यंत्रणेच्या उपयोगातून दुर्गम भागामध्ये चांगली वैद्यकीय सेवा देण्यासाठी उद्योजकांची मदत घेतली जाईल.

## उद्योग आणि शिक्षण यांची सांगड

उद्योगांना प्रोत्साहन देण्याचे शासनाचे धोरण असून यामध्ये लघू आणि मध्यम उद्योगांचा विचार करण्यात आला आहे. उद्योगांच्या विकासातून राज्यात रोजगार निर्मिती होण्यावर भर दिला असून उद्योग आणि शिक्षण यांची सांगड घालण्यात येत आहे. यामुळे उद्योगविस्तार, कौशल्याधारित शिक्षण आणि रोजगारनिर्मिती या तीनही बाबी साध्य करता येतील.

## उद्योजकांनी व्यक्त केल्या अपेक्षा

उद्योगांना विविध परवानग्या गतिने मिळाव्यात, वीज दरामध्ये अधिक सवलत मिळावी, उद्योगांच्या वाढीसाठी अधिक धाडसी निर्णय घ्यावेत, तंत्रज्ञानाचा सुयोग्य उपयोग करून घ्यावा, मुंबईला आर्थिक केंद्र व्हावे, मोठ्या उद्योगांबरोबर छोट्या उद्योग व्यवसायांचा विकास व्हावा, परवडणारी घरे योजना योग्य पद्धतीने राबवावी, कृषी क्षेत्राचा विकास करताना पशुसंवर्धन उद्योग वाढीस लावावा, नवीन औद्योगिक वसाहती निर्माण कराव्यात, विशेष आर्थिक क्षेत्रे स्थापन करावीत, विशेष प्रकल्प वहनाद्वारे प्रकल्पांना गती द्यावी, पर्यटन उद्योग वाढीस लावावा अशा विविध सूचना केल्या.

या वेळी रतन टाटा, मुकेश अंबानी, उदय कोटक, आनंद महिंद्रा, आदी गोदरेज, हर्ष गोयंका, मानसी किर्लोस्कर, राजेश शाह, आनंद पिरामल, अशोक हिंदुजा, निरंजन हिरानंदानी, वरुण बेरी, महेंद्र तुराखिया, रवी रहेजा बाबा कल्याणी, गोपिचंद हिंदुजा, सज्जन जिंदाल, गौतम सिंघानिया, दीपक पारेख, उदय कोटक, पिरोजशा गोदरेज, भविन तुराखिया या मान्यवर उद्योजकांनी आपल्या अपेक्षा व्यक्त केल्या तसेच नवीन शासनाला उद्योगांच्या भरभराटीसाठी सूचनाही केल्या.

## मुंबईचा विकास गतीने

देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईच्या विकासाशिवाय राज्याचा विकास पूर्ण होत नाही. त्यामुळे मुंबईच्या पायाभूत विकासाकडे विशेषत्वाने लक्ष देण्यात येत आहे. मुंबईत परदेशी पर्यटक येण्याचे प्रमाण खूप असून पर्यटन व्यवसाय गतिने व्हावा यासाठी मुंबईतील रस्ते, पदपथ यांची अवस्था सुधारून त्यांचे सौंदर्यीकरण करण्यात येत असल्याची माहिती पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे यांनी दिली. हा विकास करताना मुंबईच्या नागरिकांना मोकळा श्वास घेता यावा, यासाठी अर्बन फॉरेस्ट ही संकल्पना शहरात राबवण्यात येणार असून ६६ हरित ठिकाणे विकसित करण्यात येणार आहे. यामुळे शहरातील कार्बन फूटप्रिंट कमी होण्यास मदत होईल. घनकचरा व्यवस्थापनावर भर देण्यात येत असून सोशल मीडियाच्या माध्यमातून नागरी सुविधांविषयक तक्रारींची तातडीने दखल घेण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

वाहतूक व्यवस्थापनाला डोळ्यासमोर ठेवून एकूणच शहरांमधील रचना असेल असे नियोजन असल्याचे ते म्हणाले. त्याचबरोबर मुंबई २४ तास धोरण, पर्यावरण, इलेक्ट्रिक वाहने आदी विविध विषयांवर प्राधान्याने काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## १८ हजार कर्ज प्रकरणे

राज्य शासनाने रोजगार व स्वयंरोजगार निर्मितीसाठी सुरू केलेल्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी दिले आहेत. या कार्यक्रमांतर्गत डिसेंबरअखेर २३ हजार अर्ज प्राप्त झाले असून १८ हजार अर्ज पात्र ठरले. आतापर्यंत कर्ज मंजुरीसाठी ११ हजार ४२२ प्रकरणे बँकांकडे पाठवण्यात आली आहेत. बँकांकडून मंजुरीची प्रक्रिया सुरू आहे.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमास




महाराष्ट्र शासन आणि कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'चर्चा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याशी' या कार्यक्रमात उपस्थित मान्यवर उद्योगपती. या वेळी उद्योगमंत्री सुभाष देसाई आणि पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे उपस्थित होते.

मोठा प्रतिसाद मिळत आहे. विशेष म्हणजे महिला अर्जदारांचे प्रमाण ४१ टक्के इतके आहे. या योजनेतून सुमारे १० हजार लाभार्थींना लाभ देण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. सेवा क्षेत्रासाठी दहा लाख तर मध्यम व मोठ्या उद्योगासाठी ५० लाखांपर्यंत आर्थिक साहाय्य दिले जात असून मार्चपर्यंत हे उद्दिष्ट पूर्ण केले जाईल.

## अन्न प्रक्रिया केंद्र

राज्याच्या औद्योगिक विकासाद्वारे उद्योजक आणि शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणाला शासनाने प्राधान्य दिले आहे. त्या पार्श्वभूमीवर औरंगाबाद (बिडकीन) येथे पाचशे एकर जमिनीवर 'अन्न प्रक्रिया केंद्र' उभारण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली आहे.

शेतकरी आणि उद्योजक यांच्या कष्टाला, दुर्दम्य इच्छाशक्तीला शासनाच्या कृतिशील प्रयत्नांची भक्कम साथ देण्याचा शासनाचा मानस आहे. शेतकऱ्याला कर्जमुक्त करत असतानाच, आता शेतकरी हा चिंतामुक्त करण्याची शासनाची भूमिका आहे. उद्योग विकासाद्वारे येथील शेतकरी व भूमिपुत्रांना रोजगार संधी देण्यास, उद्योजकांना सक्षम करण्यास शासनाचे प्रथम प्राधान्य आहे. उद्योग आणि कृषी या दोन विभागांच्या समन्वयातून अन्न प्रक्रिया, तेलबिया प्रक्रिया यासारख्या शेतमालाशी निगडित अन्नधान्य प्रक्रिया उद्योगांना मोठ्या प्रमाणात चालना देण्यात येणार आहे.

बिडकीन येथील पाचशे एकर जमिनीवरील अन्न प्रक्रिया केंद्राचे लवकरच भूमिपूजन करून गतिने केंद्र उभारणीचे काम पूर्ण केले जाईल. तसेच या ठिकाणी १०० एकर जमीन ही महिला उद्योजकांसाठी राखीव असेल.

मराठवाड्यात उद्योगक्षेत्रात मोठ्या प्रमाणात काम होत असून उद्योग विकासासाठी सर्व सहकार्य शासन स्तरावरून उपलब्ध करून दिले जाईल.

## कौशल्य विकास संकुल

राज्यात नवनवीन उद्योग समूह, व्यवसाय संधी विस्तारणार आहे. त्यासाठी तयार मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी लवकरच शेंद्रा येथे कौशल्य विकास संकुल उभारले जाणार आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्वत:ची स्वतंत्र ओळख निर्माण करण्याची क्षमता महाराष्ट्रातील मराठवाड्यातील औद्योगिक क्षेत्रात आहे.

पारंपरिक उद्योग व्यवसायाच्या पुढे जात वेगळा आधुनिक प्रयोग करून जगाला 'मेड इन इंडियाची' ओळख आपण करून देऊ शकतो हा विश्वास देणारे काम मराठवाड्यात होत आहे.

## अतिरिक्त औद्योगिक वसाहत

औरंगाबाद येथे अतिरिक्त शेंद्रा औद्योगिक वसाहत १ हजार हेक्टर क्षेत्रावर सुरू करण्यात येणार आहे. जालना, उस्मानाबाद आणि नांदेड येथील उद्योग विस्तारासाठीच्या पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याच्या कामालाही गतिमान करण्यात येईल. कापसावर आधारित उद्योग व्यवसाय विस्तारण्यासाठी कापसाची दरवाढ करणार असून उस्मानाबाद येथे टेक्निकल हब सुरू करण्यात येईल. मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात नवीन उद्योग येणार आहे. त्या माध्यमातून ८ हजार ३६० कोटी रुपयांची नवीन गुंतवणूक येणार आहे. उद्योजकांना सेवाशुल्काचा भार वाटणार नाही या पद्धतीने तो कमी केला आहे.

**अनिरुद्ध अष्टपुत्रे**

प्रशासनातील प्रत्येक व्यक्ती मग ती कोणत्याही पदावर असो, त्याला योग्य सन्मान आणि आदर दिला पाहिजे यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आग्रही असतात.

सांगली जिल्ह्यातील इस्लामपूरमधील वाळवा तहसील कार्यालयाच्या नव्या, देखण्या वास्तूच्या उद्‌घाटनप्रसंगी मुख्यमंत्र्यांनी हा आदर्श वस्तुपाठ घालून दिला आहे.

इस्लामपूरमधील वाळवा तहसील कार्यालयाचे उद्‌घाटन मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांच्याहस्ते झाले. उद्‌घाटनानंतर मुख्यमंत्री व सर्व मान्यवर या इमारतीतील दालनांची पाहणी करू लागले. वरच्या मजल्यावरचे सभागृह पाहून मुख्यमंत्री सर्वात शेवटी खालच्या मजल्यावरील तहसीलदारांच्या दालनापाशी आले. इमारतीतील हे प्रमुख कार्यालय असल्याने आतमध्ये येऊन त्यांनी कार्यालयाची रचना पाहिली.

**मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी प्रशासन लोकाभिमुख आणि संवेदनशील असले पाहिजे यासाठी स्वतः उदाहरण घालून दिले आहे, शेतकरी असो वा विद्यार्थी अथवा प्रशासनातील अधिकारी त्याला त्याचा हक्क मिळाला पाहिजे यासाठी ते कमालीचे आग्रही आहेत. सर्वसामान्य जनतेला आपल्या कामासाठी मुंबईच्या चकरा माराव्या लागू नयेत यासाठी विभागीय स्तरावर मुख्यमंत्री सचिवालय सुरू करण्याचा निर्णय घोषितच केला नाही तर तो तातडीने कार्यान्वितही केला.**

# तुमची खुर्ची, तुमचा मान...



मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी वाळवा तहसील कार्यालयाचे उद्‌घाटन केल्यानंतर तहसीलदारांना त्यांच्या खुर्चीवर विराजमान होण्यास सांगितले. सोबत खासदार धैर्यशील माने

समोर तहसीलदारांची खुर्ची होती. त्यावर थोडा वेळ बसून अचानक ते उठले आणि थोड्या दूरवर उभे असलेले तहसीलदार रवींद्र सबनीस यांच्या हाताला पकडून खुर्चीपाशी आणले आणि काही कळायच्या आत त्यांना फर्मावले तुम्ही तहसीलदार ना? मग ही खुर्ची तुमची आहे...बसा इथे खुद्द मुख्यमंत्री प्रेमळ शब्दांत आदेश देत आहेत, तिथे जिल्हाधिकारी अभिजित चौधरी, मंत्री, राज्यमंत्री उपस्थित आहेत त्यामुळे साहजिकच गांगरलेल्या सबनीस यांनी मुख्यमंत्र्यांना नम्रपणे मी बसू शकत नाही असे सांगितले. पण मुख्यमंत्र्यांनी ठरवलेच होते. ही तुमची इमारत आहे, या ठिकाणी तुम्ही प्रमुख म्हणून काम पाहणार आहात, ही तुमची खुर्ची आहे. या खुर्चीवर माझ्या हस्ते तुम्हाला स्थानापन्न करायचे आहे असे मुख्यमंत्र्यांनी आग्रहाने सांगितल्यावर मग सबनीस यांचा नाइलाज झाला आणि ते त्या खुर्चीवर बसले. या महत्त्वाच्या पदावर तुम्ही आहात. तुम्हाला मी स्वतः बसवले आहे. त्यामुळे काम पण चोखपणेच करा असे सांगून मुख्यमंत्र्यांनी सबनीस यांची पाठ थोपटली.

या इमारतीच्या बाहेर एक फार जुने कडूनिंबाचे झाड होते. या झाडाला वाळव्यातील नागरिक स्वातंत्र्यसंग्रामाचा साक्षीदार मानत, त्याला त्यांनी तोडूही दिले नव्हते, मात्र नंतर त्याचे दुसरीकडे पुनर्रोपण करण्यात आले. मुख्यमंत्र्यांना या झाडाविषयी अगोदरच माहिती देण्यात आली होती. त्या झाडाच्या जागेपाशी काही काळ थांबून मुख्यमंत्री सोबतच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या लवाजम्याला म्हणाले कडुनिंबाच्या या झाडाप्रमाणे वागा, खूप सावली द्या, आणि या झाडासारखे प्रेम मिळवा. सर्वात महत्त्वाचे म्हणजे तुमच्याकडे येणाऱ्या लोकांना समजून घ्या.

मुख्यमंत्री उद्‌घाटन करून तिथून निघूनही गेले, पण तेव्हापासून जेव्हा जेव्हा या नवीन दालनातल्या माझ्या खुर्चीवर बसतो, त्या वेळी आपणास शेजारी राज्याचे मुख्यमंत्री खुद्द उभे आहेत असा भास होतो, अशी भावना रवींद्र सबनीस यांनी व्यक्त केली आहे.

## सर्वसामान्यांना दिलासा

प्रशासकीय कामात लोकाभिमुखता, पारदर्शकता आणि गतिमानता आणण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयात 'मुख्यमंत्री सचिवालय कक्ष' स्थापन करण्याचा निर्णय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनादरम्यान घेतला होता. त्यानंतर अवघ्या काही दिवसांमध्ये सर्व विभागीय महसूल आयुक्त कार्यालयात मुख्यमंत्री सचिवालय कक्ष सुरू करण्यात आला.

**अर्जांवर कार्यवाही**: या कक्षात आलेले अर्ज, निवेदने संबंधित क्षेत्रीय स्तरावरील यंत्रणेकडे योग्य कार्यवाहीसाठी त्वरित पाठवले जाणार असून, लोकशाही दिनाच्या दिवशी या अर्ज आणि निवेदनांवर नेमकी काय कार्यवाही झाली याचा आढावा घेण्यात येईल.

**पोच मिळणार - आढावा होणार** : अर्ज, निवेदने घेऊन आलेल्या व्यक्तीने या कक्षात आपला अर्ज/ निवेदन सादर केल्यानंतर त्यांना पोचपावती देण्यात येईल. क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही अपेक्षित असलेले अर्ज विभागीय आयुक्त यांच्या नियंत्रणाखाली संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्याकडे त्वरित पाठवण्यात येतील. ज्या अर्जांवर शासनस्तरावर कार्यवाही अपेक्षित आहे, जे विषय धोरणात्मक बाबींशी संबंधित आहेत अशा महत्त्वाच्या प्रकरणांशी संबंधित अर्ज किंवा निवेदने मुख्यमंत्री सचिवालयातील प्रधान सचिवांकडे सादर करण्यात येतील. हे अर्ज, त्यावर झालेली कार्यवाही, प्रलंबित अर्ज याची माहिती मुख्यमंत्री सचिवालय कक्षात दर महिन्याच्या ५ तारखेपूर्वी सादर करण्यात येईल.

## शेतकरी सुखावला...

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शपथविधीनंतर मोठ्या व्यग्र दैनंदिनीत एका शेतकऱ्याच्या व्यथेची दखल घेतली होती. जीवन संपवण्याच्या तयारीने मुंबईत दाखल झालेले नांदेड जिल्ह्यातील धनाजी जाधव मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांच्या शब्दांमुळे नवी उमेद घेऊन परतले होते.

मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी आत्मीयतेने दखल घेतलेल्या या शेतकऱ्याची गेल्या कित्येक वर्षांपासून प्रलंबित मागणी अखेर पूर्ण झाली आहे. जमिनीच्या सातबारावर नोंदी अद्ययावत झाल्यामुळे त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. जमिनीवरील कर्ज नोंदीमुळे फेरफार न झाल्याने श्री. जाधव यांचा मोठा व्यवहार अडला होता. त्यावर त्यांनी मुंबईत येऊन आपली व्यथा मांडण्याचा प्रयत्न केला. यात त्यांना मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांना भेटण्याची संधी मिळाली. श्री. जाधव यांनी आपल्या जमिनीचा व्यवहार आणि कर्ज याबाबत माहिती दिली. श्री. जाधव यांनी निराश होऊ नये, त्यांना सर्वतोपरी मदत केली जाईल असे श्री. ठाकरे यांनी आश्वस्त केले. तसेच त्यांनी संबंधित यंत्रणांना निर्देश दिले. त्यानुसार नांदेडचे जिल्हाधिकारी अरुण डोंगरे यांनी महसूल यंत्रणेसह, श्री. जाधव व संबंधित बँक अधिकारी यांच्याशी



शेतकऱ्याची व्यथा जाणून घेताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

समन्वय साधला. श्री. जाधव यांच्या प्रकरणातील वस्तुनिष्ठता तपासून जमीन विक्री प्रकरणात फेरफार नोंदी करण्याचे निर्देश दिले. या फेरफारीमुळे श्री. जाधव यांना यापुढे कर्जफेडीसह शेतीविषयक कामांचा मार्ग मोकळा झाला आहे.

मुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी

## संतोषला मुख्यमंत्र्यांचा दिलासा

मुंबईत चणे-फुटाणे विकून शिक्षण घेणाऱ्या राजेवाडी (जि. सातारा, ता. माण)च्या संतोष साबळेला मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी 'प्रामाणिक प्रयत्न कर, तुला लागेल ती मदत केली जाईल' असा दिलासा दिला. संतोष साबळे रात्री दहा ते पहाटे पाच या वेळेत चौपाटीवर चणे-फुटाणे विकून राज्यशास्त्राचा अभ्यास करतो. त्याचे स्पर्धा परीक्षेतून प्रशासकीय अधिकारी होण्याचे स्वप्न आहे. साताऱ्यामधून मुंबईत येऊन स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या संतोष साबळेची बातमी वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्याबरोबर मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी संतोषशी संपर्क साधण्याचे निर्देश दिले.



मुंबईत चणे-फुटाणे विकून शिक्षण घेणाऱ्या राजेवाडी (जि. सातारा, ता. माण)च्या संतोष साबळे यांच्याशी चर्चा करताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

त्यानुसार आपला रात्रीचा नित्यक्रम संपवून विद्यापीठात जाणाऱ्या संतोषला मंत्रालयात येण्यासाठी संदेश देण्यात आला. मंत्रालयात मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी संतोषची आस्थेने चौकशी केली. त्याची माहिती घेतानाच शिक्षणाच्या धडपडीचे कौतुक केले. त्यासोबतच संतोषला कोणत्या प्रकारे मदत करता येईल याची माहिती घेऊन, त्याला अभ्यासासाठी तातडीने सर्वतोपरी मदत करावी असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी सामाजिक न्याय विभागाला दिले. भारावलेल्या संतोषने मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी स्वत: दखल घेऊन आपली आस्थेने चौकशी केल्याबद्दल आभार मानले. यातून प्रेरणा घेऊन आणखी जोमाने शिक्षणासाठी प्रयत्न करण्याचा मनोदय व्यक्त केला.

# गनिमी कावा



राजेंद्र पाटील-यड्रावकर

**बेळगावसह** संपूर्ण सीमाभाग कर्नाटकमध्ये डांबल्याच्या निषेधार्थ झालेल्या आंदोलनातील हुतात्म्यांना दरवर्षी १७ जानेवारीला अभिवादन केले जाते. यंदा राज्यमंत्री राजेंद्र पाटील-यड्रावकर बेळगाव येथे अभिवादनासाठी कशा प्रकारे गेले, याचा अनुभव त्यांच्याच शब्दात...

हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठी आणि राज्य शासन सीमाबांधवांच्या पाठीशी असल्याचा संदेश घेऊन शुक्रवार दिनांक १७ जानेवारीला बेळगाव गाठले. मात्र बेळगावला पोहोचण्यासाठी आम्हाला गनिमी कावा करावा लागला. त्यात आम्ही यशस्वी झालो.

शुक्रवारी सकाळी मी कोल्हापूरला आलो. बेळगावकडे जात असताना कर्नाटक पोलिसांकडून कोगनोळी टोलनाक्यावर महाराष्ट्रातील वाहनांची कसून तपासणी सुरू असल्याचे समजले. त्यामुळे बेळगावला तर जायचे असा निर्धार केला असल्याने खासगी वाहनाने न जाता महाराष्ट्र परिवहन महामंडळाच्या बसने आम्ही निघालो.

आमची बस संकेश्वर बस स्थानकात पोहोचली. बसमध्ये बरेचसे कर्नाटक पोलीसदेखील चढले. ते तपासणी करू लागले. पोलिसांना संशय येऊ नये म्हणून मी जॅकेट आणि कानटोपी घातली आणि बरे वाटत नसल्याचे सोंग घेतले. त्यामुळे कर्नाटक पोलीस मला ओळखू शकले नाही. कार्यकर्त्यांसोबत मी तेथेच उतरलो. तेथून बेळगावपर्यंतचा प्रवास कर्नाटक महामंडळाच्या बसमधून केला. बेळगाव मध्यवर्ती बसस्थानकावर न उतरता केएलई रुग्णालयाजवळ उतरण्याचा निर्णय घेतला. सकाळी साडेअकराच्या सुमारास तेथे उतरलो.

तिथून पुढे रिक्षातून प्रवास करीत सीबीटीमार्गे हुतात्मा चौकात पोहोचलो. दुपारचे बारा वाजले होते. पोलीस होतेच. हुताम्यांना अभिवादन करीत असतानाच त्यांनी मला ताब्यात घेतले. मात्र सीमाबांधवांच्या पाठीशी महाराष्ट्र असल्याचा संदेश देण्यात आम्ही यशस्वी ठरलो. त्यासाठी गनिमी काव्याचा वापर करीत कर्नाटक पोलिसांना चकवा देण्यात यशस्वी ठरलो.

माझ्यासोबत असलेले मंगेश चिवटे यांनी महाराष्ट्र शासनाने समन्वयक म्हणून नेमलेल्या राज्याचे मंत्री एकनाथ शिंदे यांचा सीमाबांधवांसाठीचा संदेश या वेळी वाचून दाखविला. बेळगाव आणि सीमाभागासह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, यासाठी आपण कटिबद्ध असल्याची ग्वाही श्री.शिंदे यांनी आपल्या संदेशातून दिली. बेळगाव पोलिसांनी नंतर आम्हाला महाराष्ट्राच्या हद्दीत सोडून दिले.

**शब्दांकन: अजय जाधव,** विभागीय संपर्क अधिकारी

# प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार

**कला** व संस्कृती क्षेत्रातील योगदानासाठी अथर्व लोहार तर गणितातील सृजनात्मक कार्यासाठी देवेश भईया या महाराष्ट्रातील दोन बालकांना राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते 'प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले.





केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालयाच्या वतीने राष्ट्रपती भवनाच्या दरबार हॉलमध्ये आयोजित कार्यक्रमात 'प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२०' प्रदान करण्यात आले. केंद्रीय महिला व बाल विकासमंत्री स्मृती इराणी, राज्यमंत्री देबाश्री चौधरी आणि सचिव रबिंद्र पंवार यावेळी उपस्थित होते. गेल्या वर्षीपासूनच केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालयाने 'प्रधानमंत्री राष्ट्रीय पुरस्कार' सुरु केला. सृजनात्मकता, शौर्य, सामाजिक सेवा, क्रीडा, कला व संस्कृती क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ४९ बालकांना यावेळी 'बाल शक्ती' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अथर्व लोहार आणि देवेश भईया या महाराष्ट्रातील बालकांनाही यावेळी गौरविण्यात आले. पुरस्कारप्राप्त बालकांना राजपथावर होणाऱ्या प्रजासत्ताक दिन पथसंचलनात सहभागी होण्याचा बहुमानही मिळला.

# सलाम शौर्याला

**मुंबईच्या** परळ भागातील झेन सदावर्ते आणि औरंगाबाद जिल्ह्यातील आकाश खिल्लारे याला यंदाचा (वर्ष २०१९) राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्कार जाहीर झाला आहे.




राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्काराची घोषणा करण्यात आली. देशाच्या १२ राज्यांतील २२ बालकांना राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे, यामध्ये महाराष्ट्रातील झेन सदावर्ते आणि आकाश खिल्लारे यांचा समावेश आहे. भारतीय बालकल्याण परिषदेच्या अध्यक्ष गीता सिद्धार्थ यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.



# स्वच्छ पर्यावरण, समृद्ध पर्यटन

**मंत्री श्री. आदित्य ठाकरे यांच्या दैनंदिन कामकाजात तरुणांच्या विविध संकल्पना, नवकल्पना, देश – विदेशातील दौऱ्यांमध्ये केलेली निरीक्षणे यांचा प्रभाव दिसत आहे. या संकल्पना काय असतील याचा उलगडा त्यांनी माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयास नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत स्पष्ट केला. भविष्यातील आपल्या वाटचालीचा रोडमॅप काय असेल हे त्यांनी या मुलाखतीत विस्तृतपणे सांगितले. या मुलाखतीचा हा संपादित भाग.**

पर्यटन, पर्यावरण आणि राजशिष्टाचार ही खाती सहसा कुणी मागत नाहीत. पण या तिन्ही खात्यांमध्ये काम करण्यासाठी खूप मोठी संधी आहे. हे स्पष्ट करताना ते म्हणाले की, आपल्या पिढीला पुढची ५०-६० वर्षे निरोगी जगायचे असेल तर पर्यावरण खात्यात मोठे काम करणे गरजेचे आहे. विश्वात दुसरी पृथ्वी कुठेही नाही. त्यामुळे आपण आपली पृथ्वी उद्ध्वस्त करून चालणार नाही. आपली पृथ्वी आपल्यालाच वाचवावी लागेल. आपल्याकडे ४ वर्षे दुष्काळ होता, मग अतिवृष्टी झाली, आता नुकताच अवकाळी पाऊस झाला. ग्रामीण, शहरी अशा दोन्ही भागात वातावरण बदलाचे परिणाम दिसू लागले आहेत. जगात काही ठिकाणी तापमान वजा ६० अंशापर्यंत खाली जात आहे, तर अनेक ठिकाणी तापमानात कमालीची वाढ होत आहे. हवेचे प्रदूषण कमालीचे वाढत आहे. पुढच्या काळात आपल्याला वायफायच्या हॉटस्पॉटसारखे प्राणवायूचे हॉटस्पॉट करावे लागतात की, काय अशी भीती निर्माण झाली आहे. पृथ्वीची जबाबदारी आपणा सगळ्यांवर असून सर्वजण आपला परिसर स्वच्छ ठेवून पर्यावरण रक्षणाची जबाबदारी पार पाडू शकतो. त्यामुळेच पर्यावरण रक्षणाच्या कामाला लोकचळवळीचे स्वरूप देण्याचा माझा मानस आहे. यासाठीच हे खाते मी आवर्जून मागून घेतले.



या चळवळीत पर्यावरण विभाग कसे काम करेल, या प्रश्नावर उत्तर देताना ते म्हणाले की, 'पर्यावरण विभाग हा आतापर्यंत बहुदा फक्त नियामक (रेग्युलेटरी) म्हणून काम करीत राहिला. हे खाते लोकांपासून थोडेसे दूर राहिले. या खात्याला मला लोकांशी जोडायचे आहे. पर्यावरण म्हणजे फक्त रेग्युलेशन हे मोडून पर्यावरण जपायचं असेल तर आपल्याला स्वत:हून यात पावलं उचलावी लागतील. यासाठी पुढील काळात पर्यावरण रक्षणाच्या कामात विद्यार्थी, तरुण, महिला यांच्यासह लोकचळवळ उभी केली जाईल. शाळांमध्ये जनजागृती, महाविद्यालयांमध्ये चळवळ, वेगवेगळ्या कार्यालयांमध्ये पर्यावरण रक्षणाचे विविध प्रयोग आदींपासून सुरुवात केली जाईल. नुकतीच आम्ही शाळांमध्ये पर्यावरण रक्षणाची शपथ घेण्याचा कार्यक्रम घडवून आणला. याला चांगला प्रतिसाद मिळाला. आता या शपथेची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

## हे घर आणि शहरही माझं

प्रत्येकाने आपल्या आजुबाजूचा १० फूट परिसर स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त ठेवला तरी पर्यावरण रक्षणाचे मोठे काम होऊ शकते. मी माझ्या आजूबाजूचा १० फूट परिसर बदलून दाखवेन हा ध्यास प्रत्येकाला घ्यावा लागेल. ज्येष्ठ चित्रपट अभिनेते अमिताभ बच्चन यांनीही याबाबत लोकांना आवाहन केले आहे. 'हे घर माझं आहे, तसेच हे शहरही माझं आहे' असं प्रत्येकाला आपल्या गावाविषयी, शहराविषयी वाटलं पाहिजे. पर्यावरण रक्षणाच्या चळवळीत आपल्या गाव आणि शहराविषयी हे 'माझंपण' फार महत्त्वाचं आहे. 'मी कचरा करणार नाही आणि इतर कुणी कचरा करत असेल तर त्याला थांबवेन', प्रत्येकामध्ये ही भावना रुजली तर सव्वाशे कोटी लोकसंख्येचा आपला देश फार मोठी क्रांती करू शकेल.

## सर्व काही होऊ शकते

पर्यावरण रक्षण अवघड वाटत असले तरी सगळे काही शक्य आहे, असे म्हणत आदित्य ठाकरे यांनी मुंबईत राबवण्यात आलेल्या कचरा वर्गीकरणाच्या यशस्वी अंमलबजावणीचे उदाहरण दिले. सप्टेंबर २०१७ मध्ये मुंबईत प्रतिदिन सुमारे १० हजार मेट्रिक टन इतका कचरा जमा व्हायचा. त्या वेळी २०१९ पर्यंत मुंबईत प्रतिदिन कचरा संकलन साधारण १४ हजार मेट्रिक टन होईल, असा अंदाज होता. त्यावेळी मुंबईत कचऱ्याचे ओला आणि सुका असे वर्गीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला. गृहनिर्माण सोसायट्यांना यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. घनकचऱ्याचे व्यवस्थापन करणाऱ्या प्रकल्पांना एफएसआयमध्ये सूट देण्याचा निर्णय घेण्यात आला. याचा सकारात्मक परिणाम झाला. २०१९ मध्ये अंदाजित १४ हजार मेट्रिक टनचे कचरा संकलन प्रत्यक्षात मात्र ६ हजार ५०० मेट्रिक टनवर आले. सुका कचरा वेगळा करण्यात आला. ठरवले तर सर्व काही होऊ शकते. कचरा व्यवस्थापनाच्या अशा प्रयोगांसाठी आता इतर स्थानिक स्वराज्य संस्थांनी पुढे येणे गरजेचे आहे.

## प्लास्टिकपासून मुक्ती

प्लास्टिकबंदीचा मुद्दा आता कळीचा झाला आहे. या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना श्री. ठाकरे म्हणाले, प्रत्येक प्लास्टिकची वस्तू ही काही वाईट नसते. आपण प्लास्टिकच्या खुर्च्या वापरतो, त्या आवश्यकच आहेत. त्यामुळे आपण लाकडी खुर्च्यांचा वापर कमी केला, लाकडाची गरज कमी झाली. वृक्षतोड वाचली. पण सिंगल यूज प्लास्टिक हे पर्यावरणासाठी धोकादायक आहे. ऑगस्ट २०१७ मध्ये मुंबईत झालेल्या मुसळधार पावसावेळी मी पाहत होतो की, प्लास्टिकच्या कॅरीबॅगा नाल्यांमध्ये अडकल्याने नाले तुंबले होते, पाण्याचा निचरा होत नव्हता. याचप्रमाणे 'यूज ॲण्ड थ्रो'मधील प्रत्येक प्लास्टिकची वस्तू जसे की, प्लास्टिकची ताटे, चमचे, वाट्या, स्ट्रॉ, कॅरीबॅग्ज हे पर्यावरणासाठी घातक आहेत. यांचा वापर संपूर्णत; बंद करणे गरजेचे आहे. जे लोक कापडी पिशव्या वापरतील त्यांना प्रोत्साहन देणे, प्रसंगी त्यांना सन्मानित करणे असे उपक्रम आपल्याला राबवावे लागतील. प्लास्टिक निर्बंधासाठी ३ वर्षांपूर्वी शासनाने कायदा केला. आता दुकाने, रेस्टॉरंटमध्ये कॅरीबॅग दिसत नाही. कागदी वेष्टणे किंवा कापडी पिशव्या वापरण्याकडे लोक पुन्हा वळू लागले आहेत. यापुढील काळातही याची

### इंग्लंडमधील शेक्सपिअरचे घर

इंग्लंडमधील शेक्सपिअरच्या स्ट्रॅटफोर्ड-अपॉन-व्हन या गावाला दिलेल्या भेटीचा अनुभव सांगताना श्री. आदित्य ठाकरे म्हणाले की, या गावात शेक्सपिअर यांचे घर आहे. या एका घरावर त्या गावात प्रतिदिन लाखो पर्यटक येतात. या पर्यटकांमुळे परिसरातील रेस्टॉरंट्स्, कॅफे, सोव्हेनिअर शॉप्स, चित्रपटगृहे, बसगाड्या, टॅक्सी ओसंडून वाहतात. या सर्व व्यवसायांच्या माध्यमातून स्थानिकांना रोजगार मिळतो. त्या परिसराच्या, राज्याच्या आणि देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळते. परकीय चलन मिळते, एवढी कमाल एका पर्यटनातून घडू शकते. आपल्याकडेही अशी अनेक ठिकाणे आहेत. त्या ठिकाणांकडे जगभरातील पर्यटक आले तर कायापालट होऊ शकतो. एका पर्यटनस्थळामुळे त्या संपूर्ण परिसराचा विकास होऊ शकतो.



व्याप्ती वाढवून सिंगल युज प्लास्टिकपासून आपल्याला संपूर्ण मुक्ती मिळवावी लागेल.

तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी असलेल्या नद्यांच्या प्रदूषणाबाबत बोलताना ते म्हणाले की, ही तीर्थक्षेत्रे आणि तेथील नद्या या भावनिकदृष्ट्या महत्त्वाच्या आहेत, पण या तीर्थस्थळांवरील नद्यांचे संवर्धन करणे हेही पर्यावरणाच्या दृष्टीने गरजेचे आहे. राज्यातील इतर सर्वच नद्यांचे पर्यावरण रक्षण करणे काळाची गरज झाली आहे. पिण्याच्या पाण्याचे सर्व स्रोत स्वच्छ राखणे आवश्यक आहेत. त्या दृष्टीने नद्यांच्या प्रदूषण मुक्ततेसाठी सविस्तर आराखडा बनवण्याच्या सूचना मी विभागाला दिल्या आहेत. यात नगरविकास, ग्रामविकास, पर्यावरण, उद्योग, पाणीपुरवठा आणि स्वच्छता अशा विविध विभागांचा सहभाग घ्यावा लागेल. सर्व विभागांच्या समन्वयातून राज्यातील नद्या शाश्वत आणि स्वच्छ राखण्यासाठी लवकरच उपाययोजना करू. पण या कामातही फक्त शासन स्तरावर कार्यवाही होऊन चालणार नाही, यामध्ये लोकांचा सहभाग आणि त्यांची इच्छा महत्त्वाची ठरणार आहे.

पूर्वी आपण निसर्गपूजक होतो. अग्नी, वायू, जल आणि आकाश यांना आपण देव मानायचो. पण नंतर त्यांना देवत्व बहाल करून आपण त्यांची घाण करायला लागलो. हे थांबले पाहिजे. निसर्गाला आणि त्यातील हवा, पाणी, माती, झाडे, प्राणी, पक्षी, फुले या प्रत्येकाला आपल्याला जपावे लागेल.

हवेचे प्रदूषण कमी करण्यासाठी भविष्यात इलेक्ट्रिक वाहनांवर जास्त भर द्यावा लागेल. याशिवाय अपारंपरिक ऊर्जेचा वापर गरजेचा आहे. भविष्यात आपण शंभर टक्के इलेक्ट्रिक मोबिलिटी करू शकलो तर हवेचं प्रदूषण मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकेल. तसेच उद्योगांना पर्यावरणाचे विविध नियम पाळण्यास बाध्य करणे, त्यांच्याकडून नियमानुसार ग्रीन झोनची निर्मिती करून घेणे, सांडपाणी आणि घनकचऱ्याच्या व्यवस्थापनास त्यांना बाध्य करणे यावर भर द्यावा लागेल.

## वारीचा सोहळा

पंढरपूरच्या वारीची मोठी परंपरा आपल्याकडे आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे साहेबांनी या वारीची जेव्हा एरियल फोटोग्राफी केली तेव्हा त्या हेलिकॉप्टरमध्ये मीही होतो. पण मी कॅमेरा बाजूला ठेवून थक्क होऊन खालची वारी पाहत होतो. लाखो लोक एका भावनेने प्रेरित होऊन वारीमध्ये सहभागी होतात, एकमेकांसोबत राहतात, आशीर्वाद देतात-घेतात आणि हा भक्तिसोहळा साजरा करून निघून जातात. हा सोहळा थक्क करणारा असतो. हे आपल्याला जगाला दाखवता येईल. आपला गणेशोत्सवही असाच आहे. जपान, स्पेनमध्येही असे मोठे महोत्सव साजरे केले जातात. तिथे लाखो परदेशी पर्यटक येतात. आपल्या उत्सवांकडेही आपल्याला जगभरातील पर्यटकांना आकर्षित करता येईल.



## राजशिष्टाचार आणि पर्यटन

पर्यटन हा आपला आवडता विभाग असल्याचे नमूद करून या विभागामार्फत राज्यात देश-विदेशातील पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी काय काय करायचे याची सविस्तर माहिती श्री. ठाकरे यांनी या मुलाखतीत दिली.

आपल्या देशात जिथे बेरोजगारी वाढतेय, देशाचा जीडीपी कमी होतोय तिथे सेवा क्षेत्रावर भर देणे गरजेचे आहे. पर्यटन विकासातून हे साध्य करता येईल. महाराष्ट्र हे नावाप्रमाणेच महान राज्य आहे. जगभरातील लोकांना हे राज्य दाखवले पाहिजे. शिवरायांच्या गडकिल्ल्यांशी लोक भावनिकदृष्ट्या जोडलेले असतात. पण त्याबरोबरच या किल्ल्यांचे स्थापत्य, ट्रेकिंगसाठी तिथे असलेला वाव, या किल्ल्यांचा इतिहास हेही जगापर्यंत पोहोचवावे लागेल. राज्यात सुमारे ३५० किल्ले आहेत. हे किल्ले पर्यटनाच्या आंतरराष्ट्रीय नकाशावर न्यायचे आहेत. यासाठी या किल्ल्यांची डागडुजी, त्यांचे सौंदर्यीकरण याबरोबरच तिथे पोहोचण्यासाठी रस्ते, मूलभूत सुविधांचा विकास असे सर्व काही आपल्याला करावे लागेल.

राजशिष्टाचार विभाग आपल्याकडे घेण्यामागेही राज्याच्या पर्यटन विकासाला चालना देण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. राजशिष्टाचार विभागाच्या माध्यमातून देश-विदेशाचे कौन्सुलेट जनरल, विदेशी पाहुणे, उच्चायुक्त आदींशी जोडता येते. त्यांच्या माध्यमातून महाराष्ट्र जगाला दाखवण्याची तसेच जगाला महाराष्ट्राकडे आणण्याची संधी प्राप्त होते. जगाला आपल्याकडे आणायचे असेल तर सगळ्या देशांबरोबर ही सगळी नाती आपल्याला जपावी लागतील. पर्यटन आणि राजशिष्टाचार या दोन विभागांमार्फत पर्यटनाला मोठी चालना देण्यात येईल. ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, स्वित्झर्लंड, इंग्लंड यांसारख्या अनेक देशांची अर्थव्यवस्था ही पर्यटनावर तरलेली आहे. अनेक देशात बारा महिने पर्यटक असतात. ऋतुमानाप्रमाणे पर्यटकांना आकर्षित केले जाते. आपल्यालाही

## 'मुंबई २४ तास'

'मुंबई २४ तास'च्या मुद्द्यावर श्री. ठाकरे म्हणाले, मुंबई हे आंतरराष्ट्रीय शहर आहे. न्यूयॉर्क, लंडन, सिंगापूर, हाँगकाँगसारखी शहरं २४ तास सुरू असतात. एकट्या लंडनची नाइट इकॉनॉमी ही ५ बिलियन पाऊंडची आहे. मुंबईत देश-विदेशातील पर्यटक, उद्योजक, उच्चायुक्त, सेलेब्रिटी, परदेशी पाहुणे मोठ्या प्रमाणात येत असतात. त्यांच्यासाठी २४ तास सोयी-सुविधा उपलब्ध असणं गरजेचं आहे. शिवाय मुंबईतील चाकरमानीही दिवसभर कामातून थकून-भागून रात्री घरी जातो, त्यालाही आनंद साजरा करण्यासाठी, चित्रपट पाहण्यासाठी, हॉटेल-रेस्टॉरंट-कॅफेमध्ये जाऊन काहीतरी खाण्यासाठी मुंबई २४ तास उघडी राहीली तर त्याचा निश्चितच फायदा होईल. शिवाय हा उपक्रम आपण बिगरनिवासी भागात सुरू करत आहोत. त्यामुळे रहिवाशांना त्याचा काहीही त्रास होणार नाही. ज्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था, सीसीटीव्ही, विविध प्रकारचे परवाने, पार्किंग, अन्न सुरक्षा, अग्नि सुरक्षा आदींची अंमलबजावणी होते अशा आस्थापनांनाच परवानगी देण्यात आली आहे. मॉल्स, गेटेड मील्स अशा ठिकाणी ही संकल्पना राबवली जात आहे.

मुंबई २४ तास संकल्पनेचा विचार हा रोजगार वाढ आणि अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या अनुषंगाने करणे गरजेचे आहे. सध्या मुंबईमध्ये सेवा क्षेत्रात जवळपास ५ लाख रोजगार आहेत. हे एका शिफ्टमधील रोजगार आहेत. मुंबई २४ तास सुरू राहिली तर ३ शिफ्ट सुरू होऊन सेवा क्षेत्राच्या रोजगारात १५ लाखांपर्यंत वाढ होऊ शकते. शिवाय महसूल वाढेल, व्यापार वाढेल, रस्त्यावरचे रिक्षा, टॅक्सी यांचा व्यवसाय वाढेल, सप्लाय चैन अधिक मजबूत होईल, अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. मुंबईत पर्यटक किंवा उद्योजक आल्यास ते येथे सरासरी ३६ तास थांबतात. पण मुंबईमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध झाल्यास ते २ ते ३ दिवसांपर्यंत थांबू शकतील. पर्यटक शहरात थांबले तर ते रस्त्यावर जातात, टॅक्सीत बसतात, शॉपिंग करतात, हॉटेलमध्ये जेवतात. यातून हॉटेल, रेस्टॉरंट, कॅफे, थिएटर्स, रिक्षा, टॅक्सी, शॉपिंग अशा सर्वच व्यवसायांना चालना मिळेल. या आस्थापनांमध्ये नवे रोजगार निर्माण होतील. या व्यवसायांवर आधारीत भाजीपाल्यापासून पेट्रोल पंपासारख्या विविध सप्लाय चैनच्या व्यवसायाचाही विकास होईल. मुंबई २४ तास संकल्पनेला गृह



निर्माणाच्या अनुषंगाने पाहिले तर आपण काही क्षेत्रामध्ये एफएसआय दुप्पट केल्यासारखाच हा प्रकार आहे. कारण २४ तास वापर केल्याने एकच जागा आपण दोन वेळा वापरू शकणार आहोत. ही संकल्पना इंदोरमधून आली. तिथे एका ठिकाणी दिवसा सराफा बाजार भरतो, तर रात्री त्याच ठिकाणी खाऊ गल्ली सुरू असते.

या सर्व गोष्टी कराव्या लागतील.

## एआर-व्हीआर तंत्रज्ञानाचा वापर

महाराष्ट्र जगला तर राष्ट्र जगेल. देशाच्या जीडीपीमध्ये सर्वात मोठा वाटा महाराष्ट्राचा आहे. महाराष्ट्रातील काही गोष्टी आवर्जून जगाकडे न्याव्या लागतील. गडकिल्ले, मंदिरे, वारीसारखी परंपरा, सणउत्सव, कोकण किनारपट्टी, ईको टुरिझम, फॉरेस्ट टुरिझम, हेरिटेज टुरिझम, ॲग्री टुरिझम, स्पिरिच्युअल टुरिझम असे पर्यटनातील वैविध्य आपल्याकडे आहे. या सगळ्या गोष्टी जगाला दाखवता येतील.

राज्यात युनेस्कोने जाहीर केलेल्या काही वर्ल्ड हेरिटेज साईटस् आहेत. एआर-व्हीआर (ऑगमेंटेड रिॲलिटी - व्हर्च्युअल रिलिटी) सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून या पर्यटनस्थळांची माहिती प्रभावीपणे पर्यटकांपर्यंत पोहोचवता येईल. हे सर्व आव्हान म्हणून नाही तर संधी म्हणून मी बघतो.

## गावासारखे हॉटेल

आपल्याला कोकणात पर्यटकांसाठी सोयी-सुविधा निर्माण कराव्या लागतील, पण हे करताना कोकणाचे सौंदर्य बाधित होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. गावे जशीच्या तशी ठेवून तिथल्या संस्कृतीला साजेशी हॉटेल्स, रेस्टॉरंट्स सुरू करता येतील. हॉटेल आधुनिक सुविधांनी युक्त असायला हवीत, पण त्यांचे रूप त्या गावासारखेच असायला हवे.

पर्यावरण, पर्यटन आणि राजशिष्टाचार हे तिन्ही विभाग एकमेकांशी निगडित आहेत. या तिन्ही विभागांची सांगड घालून राज्याच्या हितासाठी काहीतरी भरीव असे निश्चितच करण्याचा माझा मानस आहे.

**शब्दांकन : इर्शाद बागवान,**
विभागीय संपर्क अधिकारी

# सरखेल,
# महाराष्ट्राला तुमचा अभिमान आहे...



ज्यांचे अश्वदल त्यांची पृथ्वी अन् ज्यांचे आरमार त्यांचा समुद्र हे लक्षात घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यासाठी प्रथम आरमार उभारले. गुराब, गलबते, तरांडे, तारु, शिबाड, मचवा, पगार, वाघोर अशा विविध समुद्र वाहनांची निर्मिती केली. छत्रपती संभाजी राजे यांनीही सिद्दी, डच,पोर्तुगीज यांना शह देण्यासाठी आरमाराचा विस्तार केला. छत्रपतींच्या या आरमार उभारणीत अनेक वीरांनी योगदान दिले त्यापैकी एक म्हणजे कान्होजी आंग्रे. २६ जानेवारीला शिवाजी पार्कवर सादर झालेल्या या चित्ररथातून स्वराज्याची सेवा करतांना कान्होजींच्या नेतृत्वाखाली सागरामध्ये स्वराज्याचे भगवे तोरण कसे दिमाखाने चढले, फडकू लागले, त्यांनी इंग्रज, डच आणि फ्रेंच यांच्यावर समुद्रावरून कसे नियंत्रण ठेवले, याची शौर्यगाथा उलगडून दाखवली. कुलाबा, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, या ठिकाणी सुधारित जहाज बांधणी, शस्त्रनिर्मितीची भरीव कामगिरी केली. कान्होजींच्या परवानगीशिवाय समुद्रावर कोणीही कोणतीही हालचाल करू शकत नसे. सागरी व्यापाऱ्यांवरही त्यांचे नियंत्रण होते. 'लाटेवर स्वार होऊन, तुफानाचा वारा पिऊन, घडले हे आरमार शिवबाचे, हातावर शिर घेऊन, स्वराज्याचे लेणं लेऊन, लढले हे सरदार दर्याचे', असं ज्यांच्या कर्तृत्वाचे वर्णन केले जाते त्या कान्होजी आंग्रे यांच्या कार्याला त्रिवार मानाचा मुजरा करणाऱ्या या चित्ररथाची बांधणी सुप्रसिद्ध कला दिग्दर्शक नितीन चंद्रकांत देसाई यांनी केली आहे.

जहाजावर छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा उभा करण्यात आला असून कान्होजी आंग्रे यांच्या कार्याची माहिती देणारा जिवंत देखावा या निमित्ताने सादर करण्यात आला. संचलनात ६० कलावंत सहभागी झाले.



**मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मराठवाडा दौऱ्यात अनेक विषयांबाबत धोरणात्मक निर्णय घेतले. मराठवाड्यात उद्योगांना चालना मिळावी, यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. शेतीपूरक व्यवसाय उभारणीवर भर देण्यात येणार असल्याचे सांगितले. शेतकरी कष्टकरी आणि युवक यांचा विकास हाच आपल्या शासनाचा केंद्रबिंदू असल्याचे त्यांनी सांगितले.**



मराठवाडा दौऱ्यात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी विविध विकास कामांची पाहणी करून त्याच्या पूर्ततेसाठी आवश्यक सूचना दिल्या. सोबत उद्योगमंत्री श्री. सुभाष देसाई

# आम्ही करणारच...

संजीवनी जाधव-पाटील

*देखणी ती पाऊले जी ध्यासपंथे चालती*
*वाळवंटातूनी सुद्धा स्वस्तिपद्मे रेखिती..*

अशीच काहीशी ओळख मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची करून दिल्यास वावगे ठरणार नाही. सतत कार्यमग्न असणं त्यांचा स्थायीभाव आहे. कुठल्याही समस्येला पर्यायी सुयोग्य उपाययोजना करत असताना संवेदनशीलपणे समस्येला हाताळण्याचे कसब काय असते, याची प्रचिती मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या औरंगाबाद येथील पहिल्याच दौऱ्यात आली.

मराठवाड्यात गेल्या तीन-चार वर्षांपासून दुष्काळाची तीव्रता वाढत आहे. या समस्येचा सामना करत असतानाच २०१९मध्ये अवकाळी पावसाने गंभीर संकट उभे केले. औरंगाबादसह मराठवाड्यातील उस्मानाबाद, बीड, लातूर या जिल्ह्यांमध्ये दोन तालुक्यात पाऊस तर चार तालुके कोरेडेठाक अशी परिस्थिती होती, त्यातून कसाबसा मार्ग काढण्याच्या प्रयत्नात प्रशासन आणि शेतकरी असतानाच दिवाळीच्या सुमारास मराठवाड्याला अवकाळी पावसाने अक्षरश: झोडपून काढले. जो शेतकरी पावसाच्या पाण्याची आतुरतेने वाट पाहत होता, त्याच्या शेतात महिना-दीड महिना साचून राहिलेल्या पाण्यामुळे शेतकऱ्यांचे डोळे पाणावले. हातातोंडाशी आलेले पीक नासले. ही परिस्थिती ठाकरे यांनी मुख्यमंत्री बनण्यापूर्वी या भागात भेट देताना पाहिली होती, अनुभवली होती.

या सगळ्या पार्श्वभूमीवर श्री. ठाकरे यांच्याद्वारे हिवाळी अधिवेशनात शेतकऱ्यांना दिलासा देणारी कर्जमाफी निश्चित मोठा आधार ठरली. मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारल्याबरोबर शासनाने जाहीर केलेला हा निर्णय श्री. ठाकरे यांच्या नेतृत्वगुणाची आणि शेतकऱ्यांप्रति असलेल्या संवेदनशीलतेची झलक दाखवणारा ठरला. या पार्श्वभूमीवर औरंगाबाद येथे लातूर, परभणी, उस्मानाबाद, औरंगाबाद जिल्ह्याच्या आढावा बैठकांसाठी तसेच महाएक्स्पो २०२० औद्योगिक प्रदर्शनाच्या उद्घाटनानिमित्त मुख्यमंत्र्यांचा औरंगाबाद दौरा नुकताच संपन्न झाला.

## उस्मानाबाद जिल्हा विकास

उस्मानाबाद जिल्ह्याच्या विकासाला निधी अपुरा पडू देणार नसल्याची ग्वाही मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी दिली. वीज जोडणीसाठी नोंदणी पोर्टल सातत्याने सुरू ठेवावे, सोलार प्रकल्प पूर्ण होण्यासाठी कंत्राटदारांची संख्या वाढवावी. 'महावितरण आपल्या दारी' ही योजना अधिक प्रभावीपणे राबवावी, जनतेच्या विकासासाठी आणि जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी मिळून अथक प्रयत्न करणे, आपल्या सर्वांची जबाबदारी असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

या बैठकीपूर्वी त्यांच्या हस्ते औरंगाबाद स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत स्मार्ट सिटी बस

व बस थांबा उपक्रमाच्या संकल्पचित्र फलकाचे अनावरण करण्यात आले. औरंगाबाद ग्रामीण भागातील महिला व तरुणींमध्ये कायद्याविषयी जनजागृती करण्यासाठी मराठवाड्यात प्रथमच औरंगाबाद ग्रामीण पोलीस दलाने अद्ययावत शैक्षणिक पोलीस व्हॅन सुरू केली आहे. अडचणीच्या वेळी महिलांना तत्काळ मदत उपलब्ध व्हावी, यासाठी 'पोलीस ॲप' तयार केले या व्हॅनचे श्री. ठाकरे यांनी हिरवी झेंडी दाखवून लोकार्पण केले.

उस्मानाबाद जिल्ह्याच्या बैठकीनंतर औरंगाबाद महानगरपालिकेच्या महत्त्वाच्या पाणी, रस्ता आणि कचरा आदी विषयांसंदर्भात शहरातील लोकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या कचऱ्याच्या समस्या सोडवण्यासाठी लवकरात लवकर निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे सांगितले आणि शहर कचरामुक्त करण्यास शासनाचा प्राधान्याने अग्रक्रम राहील, तसेच शहरातील महत्त्वाचे जे काही प्रलंबित प्रश्न आहेत ते सर्व प्रश्न लवकरात लवकर सोडवण्यात येतील. स्मार्ट शहर उपक्रमासाठी स्वतंत्र अधिकाऱ्यांची नेमणूकदेखील करण्यात येईल, असे श्री. ठाकरे यांनी सांगितले.

## औरंगाबाद जिल्हा

औरंगाबाद जिल्हा आढावा बैठकीत सिंचन, पाणी, रस्ते, आरोग्य, पीक विमा, पर्यटन आणि शिक्षण आदी प्रश्नांबाबत बोलताना श्री. ठाकरे यांनी सिल्लोड येथील पाणी प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी पूर्णा नदीवरील अतिरिक्त बॅरेजेसबाबत सर्वेक्षण करण्यात येईल, असे स्पष्ट केले.

पीक विमा योजनेबाबत, कंपनीच्या प्रतिनिधींसोबत संवाद साधून शेतकऱ्यांना त्यांच्या कार्यालयामध्ये हेलपाटे मारावे लागणार नाहीत, ही बाब श्री. ठाकरे यांनी स्पष्ट केली. मुख्यमंत्र्यांच्या या निर्णयातून पुन्हा शेतकऱ्यांप्रति असलेली त्यांची संवेदनशीलता दिसून आली.

## परभणी जिल्हा

परभणी जिल्हा आढावा बैठकीत श्री. ठाकरे यांनी, परभणी येथे कृषी विभागाचे

मराठवाडा डायरी

## मुक्त संवाद

मराठवाड्यातील जिल्हास्तरीय यंत्रणा व लोकप्रतिनिधी यांचे म्हणणे ऐकणे असे या दौऱ्याचे स्वरूप होते. ९ जानेवारी सकाळी ११ वाजता म्हणजे नियोजित वेळी मुख्यमंत्र्यांचे औरंगाबाद विमानतळावर आगमन झाले. तेथून पुढे मोटारीने औरंगाबाद कलाग्राम, गरवारे संकुल परिसर येथे मराठवाडा असोसिएशन ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर (मसिआ) यांच्याद्वारे आयोजित 'ॲडव्हान्टेज महाराष्ट्र एक्स्पो' या औद्योगिक प्रदर्शनाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. या वेळी केवळ उद्घाटनाची औपचारिकता टाळून येथील प्रदर्शनात उद्योजकांची उत्पादने श्री. ठाकरे यांनी बघितली. विभागवार रचना करण्यात आलेल्या स्टॉलधारकांना उत्पादन घेत असताना येणाऱ्या अडचणींची व उपायांची चर्चा आस्थेवाईकपणे केली. असे करणारी व्यक्ती संवेदनशील असते. ही संवेदनशीलता व साधेपणा वारंवार त्यांच्या दौऱ्यादरम्यान दिसून आली.

या वेळी मुख्यमंत्र्यांनी शेतकरी आणि उद्योजक यांच्या कष्टाला, दुर्दम्य इच्छाशक्तीला, शासनाच्या कृतिशील प्रयत्नाची भक्कम साथ देण्याचा शासनाचा मानस असल्याचे सांगून एक प्रकारे उद्योजकांना आश्वस्त केले. उद्घाटन प्रसंगी बोलताना श्री. ठाकरे म्हणाले की, शेतकऱ्यांना कर्जमुक्त करत असतानाच आता शेतकरी हा चिंतामुक्त करण्याची शासनाची भूमिका आहे. उद्योग विकासाद्वारे येथील शेतकरी, भूमिपुत्रांना रोजगार संधी देण्यास, उद्योजकांना सक्षम करण्यास शासनाचे प्रथम प्राधान्य आहे. उद्योग आणि कृषी विभागांच्या समन्वयातून अन्न प्रक्रिया, तेलबिया प्रक्रिया यांसारख्या शेतमालाशी निगडित अन्नधान्य प्रक्रिया उद्योगांना मोठ्या प्रमाणात चालना देण्यात येईल. बिडकीन येथील ५०० एकर जमिनीवरील अन्न प्रक्रिया केंद्राचे लवकरच भूमिपूजन करून गतीने केंद्र उभारणीचे काम पूर्ण केले जाईल. या ठिकाणी १०० एकर जमीन महिला उद्योजकांसाठी राखीव असेल, अशी घोषणा श्री. ठाकरे यांनी केली.

उद्योग क्षेत्रात भरीव प्रमाणात काम होत आहे, असे सांगून औरंगाबाद येथील उद्योजकांच्या पाठीवर त्यांनी कौतुकाची थाप मारली. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करण्याची क्षमता महाराष्ट्रातील मराठवाड्यातील औद्योगिक क्षेत्रात आहे. पारंपरिक उद्योग व्यवसायाच्या पुढे जात वेगळा आधुनिक प्रयोग करून जगाला 'मेड इन इंडिया' ची ओळख आपण करून देऊ शकतो. हा विश्वास देणारे काम मराठवाड्यात होत आहे. मराठवाड्याची ही औद्योगिक ताकद दाखवणारे हे प्रदर्शन असल्याचे त्यांनी कौतुक केले. या उद्घाटनानंतर अनुक्रमे औरंगाबाद, लातूर, उस्मानाबाद, परभणी जिल्ह्याचा तेथील लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीमध्ये त्यांनी आढावा घेतला.



शेंद्रा-बिडकीन औद्योगिक विकास प्रकल्पाचे संकल्प चित्र

उप विभागीय कार्यालय सुरू करण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठवावा त्यास तत्काळ मंजुरी देण्यात येईल, असे सांगितले. रिक्त पदांच्या बाबतीत आढावा घेऊन ही पदे एक महिन्यात भरावीत, असे निर्देश श्री. ठाकरे यांनी दिले. परभणी जिल्हा क्रीडा संकुलाची अवस्था दयनीय झाली असून या क्रीडा संकुलाच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देणार असल्याचे सांगत या संकुलाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण व्हावेत अशी अपेक्षा श्री. ठाकरे यांनी व्यक्त केली. पाथर्डीचा विकास करण्यासाठी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत निधी उपलब्ध करून देण्यात येईल. वैद्यकीय प्रवेशाबाबत मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी वैद्यकीय प्रवेशाबाबत असलेली झोन पद्धती तपासून त्यात सुधारणा केली जाईल. परभणी बाह्यवळण रस्त्यासाठी भूसंपादनाचा विषय मार्गी लावण्यासाठी केंद्राकडे पाठपुरावा केला जाईल. परभणी शहराच्या पिण्याच्या पाण्यासाठीची वाढती गरज लक्षात घेऊन अतिरिक्त पाईपलाइन, भूमिगत गटार योजना, जिल्ह्यातील बंधाऱ्याची कामे गतीने पूर्ण करण्याचे निर्देश श्री. ठाकरे यांनी संबंधितांना दिले. येलदरी धरणाची गळती दुरुस्त करून धरणापासून सिंचनासाठी डावे व उजवे कालवे निर्माण करून शेतीला मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. उद्योगांना चालना देण्यासाठी नवीन औद्योगिक वसाहत निर्माण करण्यासाठी त्वरित जागा उपलब्ध करणे तसेच शहरातील झोपडपट्टीधारकांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आणणे यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी कार्यवाही करण्याच्या सूचना श्री. ठाकरे यांनी दिल्या.

दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी सिडकोतील एमजीएम परिसरातील प्रियदर्शिनी उद्यानामध्ये नियोजित बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारकाच्या ठिकाणी श्री. ठाकरे यांनी भेट दिली. या वेळी त्यांनी या परिसरात असणारे एकही झाड न तोडता उलट त्यात प्रामुख्याने पक्ष्यांचा अधिवास राहील अशी जांभूळ, चाफा ही झाडे लावण्यात येतील, अशी ग्वाही देऊन श्री. ठाकरे यांनी आपण पर्यावरणप्रेमी असल्याचे दाखवून दिले.




## लातूर जिल्हा

लातूर जिल्हा आढावा बैठकीच्या वेळी, दुष्काळग्रस्त लातूर जिल्ह्यातील पाणी प्रश्न प्राधान्याने सोडवला जाईल. उपलब्ध पाणीसाठा वापराबरोबरच गरजे एवढ्या पाण्याचा योग्य पद्धतीने उपयोग करण्याबरोबरच विविध पाणीविषयक योजनांचा समन्वय करून पाण्याचे नियोजन करण्यात येईल, अशी ग्वाही श्री. ठाकरे यांनी दिली. वर्षानुवर्षे जिल्ह्यांना भेडसावणाऱ्या समस्या तेथेच तत्काळ वेळेत सोडवण्यात याव्यात, अशा सूचना संबंधित विभागप्रमुखांना दिल्या. पीक विमा संदर्भात वेळ पडल्यास विमा कंपन्यासोबत शासनस्तरावर समन्वय साधून तत्परतेने पीक विम्याचे पैसे शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येतील. शेतकऱ्यांच्या हिताच्या दूरगामी परिणाम करणाऱ्या योजना शासनस्तरावर आखण्यात येत असून, यासाठी लवकरच बैठकीचे आयोजन करण्यात येईल. गायरान जमिनीचा वापर एमआयडीसीसाठी करण्यात येईल. मराठवाड्यातील या चार जिल्ह्यांप्रमाणेच अन्य उर्वरित चार जिल्ह्यांचा आढाव्यासाठी आपण पुन्हा येऊ, असेही त्यांनी सांगितले. मराठवाड्यातील प्रश्न काय आहे, प्रश्नांची तीव्रता किती आहे आणि या प्रश्नांवरील तातडीचे तसेच दीर्घकालीन उपाय कोणते आहेत, या उपायांची अंमलबाजावणी कशी होते आहे, स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन उपाययोजनेत कोणत्या सुधारणा आवश्यक आहेत, या सर्व बाबींच्या दृष्टीने हा दौरा महत्त्वाचा आणि उदाहरण घालून देणारा ठरला. मराठवाड्यातील विविध समस्या सोडवण्यासाठी सरकार सज्ज आहे, हा दिलासा मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्याने दिला हे नक्की.

## स्वतंत्र मुख्यमंत्री कक्ष

विभागीय आयुक्त कार्यालयात 'मुख्यमंत्री सचिवालय कक्ष' स्थापन करण्यात आला आहे.

**माहिती सहायक,**
**विभागीय माहिती कार्यालय, औरंगाबाद**

## महत्त्वाच्या घोषणा

- मराठवाड्यात ८ हजार ३६० कोटी रुपयांची नवीन गुंतवणूक. बिडकीन येथे ५०० एकर जमिनीवर अन्न प्रक्रिया केंद्र उभारून १०० एकर जमीन महिला उद्योजकांसाठी राखीव.
- शेंद्रा येथे कौशल्य विकास केंद्र.
- लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी दूध संकलनांतर्गत दूध भुकटी प्रकल्प. देवणी गाईचे आंतरराष्ट्रीय पशू संशोधन केंद्रामार्फत दर्जेदार गाईंच्या वाण संवर्धनासाठी जागा.
- उस्मानाबाद जिल्ह्याच्या दृष्टीने महत्त्वाचा कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत मराठवाड्यासाठी देण्यात येणारे पाणी, कृष्णा खोरे आदी संदर्भात कायदेशीर आणि तांत्रिक बाबींचा अभ्यास अहवाल महाराष्ट्र जल परिषदेकडे पाठवणार.
- परभणी येथे कृषी विभागाचे उपविभागीय कार्यालय सुरू करण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठवण्यास मंजुरी.
- परभणी जिल्ह्यात औद्योगिक वसाहत निर्माण करण्यासाठी जागा.

## जानेवारी २०२० मधील महत्त्वाच्या घडामोडींचा आढावा...

### मुंबई पारबंदर प्रकल्प

देशातील समुद्रावरील सर्वात जास्त लांबी असणाऱ्या मुंबई - पारबंदर प्रकल्पाच्या (मुंबई ट्रान्स हार्बर लिंक) पुलाच्या पहिल्या गाळा उभारणी कामाचा शुभारंभ मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते झाला.

या प्रकल्पासाठीचा कालावधी ५४ महिन्यांचा असला तरी सध्या त्याचे काम वेगाने सुरू आहे. त्यामुळे मुदतीपूर्वी हा प्रकल्प पूर्ण होईल.

**असा आहे प्रकल्प :** मुंबई शहरातील शिवडी व मुख्य भूमीवरील न्हावा यांना जोडणाऱ्या सुमारे २२ किमी लांबीच्या ६ पदरी (३+३ मार्गिका) पुलाचा अंतर्भाव आहे. या पुलाची समुद्रातील लांबी १६.५ किमी असून जमिनीवरील



**मुंबई – पारबंदर प्रकल्पाच्या (मुंबई ट्रान्स हार्बर लिंक) पुलाच्या पहिल्या गाळा उभारणी कामाचा शुभारंभ मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते झाला. सोबत नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, खासदार अरविंद सावंत, आमदार अजय चौधरी आदी.**

पुलाची एकूण लांबी सुमारे ५.५ किमी इतकी आहे. या पुलाला मुंबई शहरातील शिवडी व मुख्य भूमीवरील शिवाजीनगर व राष्ट्रीय महामार्ग-४ब वर चिर्ले गावाजवळ आंतरबदल (Interchanges) आहेत. हा भारतातील सर्वात जास्त लांबीचा समुद्रावरील पूल ठरणार आहे.

**प्रकल्पाची सद्यःस्थिती :** ● हा प्रकल्प जपान आंतरराष्ट्रीय सहकार संस्थेच्या (Japan International Cooperation Agency - JICA) कर्ज साहाय्याने राबवण्यात येईल. ● प्रकल्पाचे बांधकाम हे ३ स्थापत्य कंत्राटद्वारे व १ इंटेलिजंट ट्रान्सपोर्ट सिस्टिम कंत्राटाद्वारे करण्यात येईल. प्रकल्पाच्या ३ पॅकेजेसच्या कंत्राटदारांना २३ मार्च २०१८ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.● प्रकल्पाची डिसेंबर २०१९ अखेर सुमारे १९ टक्के इतकी आर्थिक प्रगती झाली आहे. पुलाच्या पायाचे व स्तंभांच्या उभारणीचे काम प्रगतिपथावर आहे. त्याचप्रमाणे सेगमेंट कास्टिंग आणि तात्पुरत्या पुलाच्या उभारणीचे काम प्रगतिपथावर आहे.● प्रकल्पाचा बांधकाम कालावधी सुमारे साडेचार वर्षे आहे. त्यानुसार प्रकल्प सप्टेंबर, २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

### शिवभोजन थाळीचा शुभारंभ



प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून राज्यात शिवभोजन योजनेचा शुभारंभ करण्यात आला. राज्यात पहिल्याच दिवशी ११ हजार ४१७ लोकांनी या भोजनाचा लाभ घेतला.

राज्यातील गरीब आणि गरजू जनतेला सवलतीच्या दरात जेवण उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या पुढाकारातून शिवभोजन योजनेची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. आतापर्यंत राज्यात १२२ शिवभोजन केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. या केंद्राच्या माध्यमातून गरीब जनतेला १० रुपयात जेवण उपलब्ध करून देण्यात येत आहे. शिवभोजन ही शासनाची प्रमुख योजना असून तिची राज्यात काटेकोर आणि व्यवस्थित अंमलबजावणी व्हावी यासाठी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाला सूचना देण्यात आले आहेत. शिवभोजन योजनेत अकोला जिल्ह्यात २, अमरावती ३, बुलडाणा ३, वाशिम २, औरंगाबाद ४, बीड १, हिंगोली १, जालना २, लातूर १, नांदेड ४, उस्मानाबाद ३, परभणी २, पालघर ३, रायगड ४, रत्नागिरी ३, सिंधुदुर्ग २, परळ ३, अंधेरी ३, वडाळा २, ठाणे ७, कांदिवली २, भंडारा २, चंद्रपूर ३, गडचिरोली १, गोंदिया २, नागपूर ७, वर्धा २, अहमदनगर ५, धुळे ४, जळगाव ७, नंदूरबार २, नाशिक ४, कोल्हापूर ४, पुणे १०, सांगली ३, सातारा ४, सोलापूर ५ अशी केंद्रे सुरू झालेली आहेत. संबंधित जिल्ह्यांच्या पालकमंत्री महोदयांच्या हस्ते शिवभोजन योजनेचा शुभारंभ करण्यात आला.

खानावळ, स्वंयसेवी संस्था, महिला बचतगट, भोजनालये, रेस्टॉरंट, मेसच्या माध्यमातून शिवभोजन योजना राबवली जात आहे. म्हणजेच ज्या केंद्रांना योजनेची अंमलबजावणी करण्याची मान्यता देण्यात आली आहे त्या केंद्रातून योजनेंतर्गत दुपारी १२ ते २ यावेळेत जेवण उपलब्ध करून दिले जाते. लाभार्थींच्या १० रुपयांच्या रकमेव्यतिरिक्तची उर्वरित रक्कम अन्न आणि नागरी पुरवठा विभागाकडून अनुदान म्हणून केंद्र चालकांना उपलब्ध करून दिली जाणार आहे.

### केमोथेरपी सुविधा

केमोथेरपीच्या सुविधेचा विस्तार राज्यातील सर्व जिल्हा रुग्णालयात करण्याची घोषणा आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी केली. मंत्रालयात विभागाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर विभागाची आढावा बैठक घेऊन त्यांनी

ही सुविधा राज्यभर सुरू करण्याचा निर्णय घेतला. राज्यात सध्या ११ जिल्हा रुग्णालयांमध्ये केमोथेरपीची सुविधा उपलब्ध असून कर्करोगाचे वाढते प्रमाण लक्षात घेता रुग्णांना दिलासा देण्याकरिता सर्वच जिल्हा रुग्णालयांमध्ये ही सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी टाटा रुग्णालयाच्या सहकार्याने आवश्यक त्या तांत्रिक बाबी पूर्ण करण्याच्या सूचना विभागाला या वेळी देण्यात आल्या.

आरोग्यसंस्थांचे जाळे राज्यभर पसरले असून त्यांचे बळकटीकरण, स्वच्छता, वैद्यकीय अधिकाऱ्यांची उपलब्धता या बाबींवर भर देण्यात येईल. उपलब्ध सुविधेच्या माध्यमातून नागरिकांना अधिक चांगल्या पद्धतीने सेवा देऊन नागरिकांचा आरोग्य यंत्रणेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. बदलत्या जीवनशैलीमुळे रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार यासारख्या आजाराचे प्रमाण वाढत असून याविषयी नागरिकांमध्ये अधिक जाणीवजागृती करणे आवश्यक आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरताना ग्रामीण भागातील रुग्णालयांमध्ये औषधांचा साठा मुबलक राहील याची दक्षता आरोग्य यंत्रणेने घ्यावी, असे निर्देश आरोग्यमंत्र्यांनी दिले आहेत.

## आरक्षणाला मुदतवाढ; संविधान सुधारणा

महाराष्ट्र विधानसभेच्या व विधानपरिषदेच्या झालेल्या एक दिवसीय विशेष बैठकीमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांच्यासाठी लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभेमध्ये राखीव जागा ठेवण्यास तसेच अँग्लो इंडियन समाजास नामनिर्देशनाद्वारे प्रतिनिधित्व देण्यास पुढील १० वर्षांसाठी मुदतवाढ देणारे संसदेने मंजूर केलेले संविधान (१२६वी सुधारणा) विधेयक, २०१९ या विधेयकाच्या अनुसमर्थनाचा ठराव एकमताने संमत करण्यात आला.

## प्रत्येक तालुक्यात एक रुग्णालय

सामान्यांना वैद्यकीय उपचारांसाठी साहाय्यभूत ठरणाऱ्या महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजनेची व्याप्ती वाढवण्यात येणार आहे. आता प्रत्येक तालुक्यात एक रुग्णालय योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. सहभागी रुग्णालयांची संख्या दुप्पट करून सुमारे एक हजार रुग्णालयांचा समावेश योजनेंतर्गत केला जाईल. त्यामुळे

## ६५०० आरोग्यवर्धिनी केंद्र

आरोग्यविषयी प्रतिबंधात्मक आणि प्रबोधनात्मक सेवा लोकांपर्यंत पोहोचवण्याकरिता सर्व उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांचे टप्प्याटप्प्याने आरोग्यवर्धिनी केंद्रांमध्ये रूपांतर केले जात आहेत. मार्च अखेर एकूण सुमारे ६५०० आरोग्यवर्धिनी केंद्रे राज्यात कार्यान्वित होतील, अशी माहिती आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी दिली.

गडचिरोली, वाशिम, उस्मानाबाद व नंदुरबार हे राज्यातील चार आकांक्षित जिल्हे तसेच भंडारा, चंद्रपूर, वर्धा, सातारा, पालघर, नाशिक, लातूर, पुणे, अहमदनगर, नांदेड, हिंगोली, गोंदिया, अमरावती, सिंधुदुर्ग, जळगांव असे १९ जिल्ह्यातील एकूण ११६९ आरोग्य उपकेंद्रांचे व सर्व जिल्ह्यातील १५०१ (ग्रामीण भागातील) व ४१३ (शहरी भागातील) प्राथमिक आरोग्य केंद्रे असे एकूण ३०८३ आरोग्यकेंद्रांचे आरोग्यवर्धिनी केंद्रांमध्ये रूपांतर करण्यात आले आहे.

दुसऱ्या टप्प्यामध्ये जालना, बीड, परभणी या सारख्या मराठवाड्यातील जिल्ह्यांसह उर्वरित जिल्ह्यात ही केंद्रे सुरू होतील. या केंद्रांमध्ये समुदाय आरोग्य अधिकारी या पदावर आयुर्वेद, युनानी, नर्सिंग पदवीधारक नियुक्त केले जाणार आहेत. आरोग्य सेविका, बहुउद्देशीय आरोग्य सेवक, आशा कार्यकर्ती यांच्या माध्यमातून आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये व त्याअंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये प्राथमिक आरोग्य सुविधेचे बळकटीकरण केले जाईल. निवड झालेल्या समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांना सहा महिन्याचे प्रशिक्षण देण्यात येते. २०१९-२० मध्ये पूर्व परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या ३६९६ (आयुर्वेदिक २३८८, युनानी २३३ व बी.एस्सी नर्सिंग १०७५) समुदाय आरोग्य अधिकारी यांचे प्रशिक्षण ऑगस्ट २०१९ पासून सुरू करण्यात आले आहे. प्रशिक्षित समुदाय आरोग्य अधिकारी हे निकास परीक्षा उत्तीर्ण होऊन फेब्रुवारी २०२० पासून आरोग्य उपकेंद्रांवर कार्यरत होतील. मार्चपासून अजून ३५०० आरोग्यवर्धिनी केंद्र कार्यान्वित होतील.



**राजेश टोपे**
आरोग्य मंत्री

आधुनिक जीवनशैलीमुळे असंसर्गजन्य रोगांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे सध्या दिल्या जाणाऱ्या माता बालसंगोपन आरोग्य सेवांमध्ये वाढ करून असंसर्गजन्य आजार तपासणीसाठी आरोग्य सेवा आरोग्यवर्धिनी केंद्राच्या माध्यमातून पुरवण्याचे उद्दिष्ट आहे.

**आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये १३ सेवा :**

● प्रसूतीपूर्व व प्रसूती सेवा ● नवजात अर्भक व नवजात बालकांना दिल्या जाणाऱ्या सेवा ● बाल्य व किशोरवयीन आजार व लसीकरण सेवा ● कुटुंब नियोजन, गर्भनिरोधक व आवश्यक आरोग्य सेवा ● संसर्गजन्य रोग नियोजन व सामान्य रोगांची बाह्य रुग्ण सेवा ● संसर्गजन्य रोग नियोजन व तपासणी ● असंसर्गजन्य रोग नियोजन व तपासणी ● मानसिक आरोग्य नियोजन व तपासणी ● नाक, कान, घसा व डोळे सामान्य आजारासंबंधी सेवा ● दंत व मुखरोग आरोग्य सेवा ● वाढत्या वयातील आजार व परिहारक उपचार ● प्राथमिक उपचार व आपत्कालीन सेवा ● आयुष व योग

अधिकाधिक रुग्णांना त्याचा फायदा होऊन दिलासा मिळेल, असा विश्वास आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी व्यक्त केला.

जनआरोग्य योजनेच्या माध्यमातून सामान्य नागरिकांना खर्चीक वैद्यकीय उपचाराची सुविधा मिळत आहे. या योजनेमध्ये सहभागी रुग्णालयांची संख्या वाढवण्याबाबत मागणी केली जात होती. त्यानुसार जास्तीत जास्त नागरिकांना या योजनेतून फायदा मिळावा, यासाठी आता रुग्णालयांची संख्या वाढवण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे.

**सहभागी रुग्णालयांची संख्या दुप्पट** : सध्या जनआरोग्य योजनेमध्ये राज्यात ४९२ रुग्णालये सहभागी आहेत. ३५५ तालुक्यांपैकी १०० तालुके यामध्ये अंतर्भूत होत असून उर्वरित तालुक्यातील रुग्णांना योजनेमधून उपचार करून घेण्यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी अथवा लगतच्या तालुक्यामध्ये जावे लागते. रुग्णांना प्रवास करावा लागू नये, त्यांना त्यांच्याच तालुक्यामध्ये उपचाराची सोय मिळावी यासाठी यापुढे प्रत्येक तालुक्यामध्ये योजनेंतर्गत एका रुग्णालयाचा समावेश व्हावा यासाठी निर्णय घेण्यात आला. त्यामुळे आता या योजनेंतर्गत एक हजार रुग्णालयांना सहभागी करण्यात येईल.

## संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन

भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे राज्यातील सर्व ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदांमध्ये प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन, स्वातंत्र्य दिन या राष्ट्रीय दिनी सामूहिक वाचन होणार आहे. येत्या २६ जानेवारीपासून राज्यात संविधानविषयक जनजागृतीसाठी हा उपक्रम सुरू करण्यात येत असल्याची माहिती ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली.

प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन, स्वातंत्र्य दिन या दिवशी ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदांमध्ये हा उपक्रम राबविला जाईल. या संस्थांचे पदाधिकारी आणि नागरिक हे संविधानातील उद्देशिकेचे वाचन करतील. नागरिकांमध्ये संविधानाविषयी जागृती व्हावी, हक्क आणि कर्तव्याविषयी त्यांना माहिती व्हावी तसेच लोकशाही अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम सुरू करण्यात येत आहे. येत्या २६ जानेवारीपासून राज्यातील २७ हजार ८७४ ग्रामपंचायती, ३५१ पंचायत समित्या आणि ३४ जिल्हा परिषदांमध्ये हा उपक्रम सुरू करण्यात येत आहे.

## ५०० शेतकरी सन्मान, मार्गदर्शक कक्ष

शेतकरी बांधवांना अडचणी मांडण्यासाठी, विविध योजनांची माहिती मिळावी याकरिता हक्काचे व्यासपीठ मिळावे यासाठी तालुका, जिल्हा पातळीवरील कृषी कार्यालयात शेतकरी सन्मान व मार्गदर्शन कक्ष सुरू करण्यात आला आहे. या मोहिमेचा शुभारंभ रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथून कृषिमंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते करण्यात आला. राज्यभर सुमारे ५०० कार्यालयांमध्ये अशी केंद्रे सुरू करण्यात आली आहेत.

कृषिमंत्र्यांनी शेतकरी सन्मान व मार्गदर्शन कक्ष सुरू करणे तसेच तालुकास्तरावर शेतकरी समन्वय समिती स्थापन करण्याचा निर्णय जाहीर केला होता. त्याची अंमलबजावणी करत राज्यभर अशी मार्गदर्शक केंद्रे सुरू करण्यासाठी कृषी विभाग सज्ज झाला असल्याचे कृषिमंत्री श्री.भुसे यांनी सांगितले. यासंदर्भात विभागामार्फत शासन निर्णयदेखील जाहीर करण्यात आला असून त्यामध्ये मार्गदर्शन कक्ष व समितीबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

## शासकीय व्यवहारांना पॅन अनिवार्य



**अजित पवार**
उपमुख्यमंत्री

राज्य सरकारशी संबंधित आर्थिक व्यवहारांसाठी यापुढे पॅन क्रमांक अनिवार्य करण्यात आला आहे. महसूलचोरीला आळा घालण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

विकासयोजना आणि पायाभूत प्रकल्पांना गती देण्यासाठी राज्याची आर्थिक स्थिती सुधारण्यावर वित्तमंत्री या नात्याने श्री. पवार यांनी लक्ष केंद्रित केले आहे. विविध विभागांचा महसूलवाढीच्या अनुषंगाने आढावा घेण्यात येत आहे. महसूलवाढ करताना प्रामुख्याने महसूलचोरीला आळा घालण्यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत. ऑनलाइन लॉटरीद्वारे होणारी महसूलचोरी मोठी असून येणाऱ्या काळात राज्यात ऑनलाइन लॉटरीवर बंदी घालून केवळ पेपर लॉटरी सुरू ठेवण्याबाबत निर्णय घेण्यात आला. हॉटेलमध्ये विकल्या जाणाऱ्या मद्यावर दोन प्रकारचे कर आकारले जातात, त्यामुळे हॉटेलमधून विक्री होणाऱ्या मद्यावरील कर रद्द करून मद्यनिर्मितीवरचा कर सरसकट वाढवण्यात येईल. यामुळे राज्याच्या महसुलात वाढ अपेक्षित आहे.

शेतमालाची उत्पादकता व उत्पन्नात सातत्य ठेवण्यासाठी शासनाच्या विविध विभागामार्फत शेतकऱ्यांसाठी ज्या योजना राबवल्या जातात. त्यांच्या अंमलबजावणीमध्ये समन्वय साधण्याकरिता तालुकास्तरीय समिती महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या शेतकऱ्यांना चिंतामुक्त करण्याच्या उद्दिष्टपूर्तीसाठी कृषी विभागामार्फत शेतकरी केंद्रबिंदू ठेऊन योजना राबवण्यात येत आहे. त्या दृष्टीने शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी तालुकास्तरीय समितीची दर तीन महिन्यांनी बैठक होईल. त्यामध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा केली जाईल. हवामान, पीक परिस्थिती, विपणन, निविष्ठांचा पुरवठा, पीककर्ज, शेतीपूरक जोडव्यवसाय, वीज जोडण्या, शेतकरी कर्जप्रकरणे आदीबाबत या समितीच्या बैठकीत चर्चा होईल.

## डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या नावे जलभूषण पुरस्कार

जलसंपदा, जलसंधारण व पाणीपुरवठा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना माजी मुख्यमंत्री स्व.डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या नावे जलभूषण पुरस्कार देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

महाराष्ट्र राज्याच्या जडणघडणीत मोलाचा वाटा असलेले जलसंस्कृतीचे जनक माजी मुख्यमंत्री स्व.डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त हा निर्णय घेण्यात आला. त्यांनी 'पाणी अडवा पाणी जिरवा' ही घोषणा देऊन राज्य दुष्काळमुक्त करण्यासाठी जलसंस्कृती आणली. राज्यातील अनेक सिंचन प्रकल्प त्यांच्या प्रयत्नांमुळे मार्गी लागले. दुष्काळमुक्तीसाठी त्यांचे विचार आजच्या पिढीपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. त्यांचे कार्य व संकल्पनांचा प्रचार व प्रसार करण्याचे निर्देश राज्य शासनाने दिले असून, त्याचाच एक भाग म्हणून जलभूषण पुरस्कार दिले जाणार आहेत. याशिवाय जलक्रांतीविषयक विचारांना चालना देण्यासाठी राज्य शासनाच्यावतीने संदर्भ ग्रंथ व लोकराज्यच्या विशेषांकाचे प्रकाशन केले जाईल.

नांदेड शहरातील विष्णुपुरी प्रकल्पाजवळ माजी मुख्यमंत्री स्व. डॉ. चव्हाण यांचे स्मारक उभारण्याचा आणि नांदेड जिल्ह्यातील भोकर येथे पोलीस प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. नांदेड शहरात ग्रंथालय, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व मुला-मुलींचे वसतिगृह उभारणे आदी कामेदेखील प्रस्तावित करण्यात आली आहेत. या कामांच्या निधीसाठी संबंधित विभागांना आवश्यक ती तरतूद करण्याचे निर्देशही शासनाने दिले आहेत.

डॉ. शंकरराव चव्हाण यांचा जन्म १४ जुलै १९२० रोजी झाला. १५ जुलै २०१९ पासून १४ जुलै २०२० पर्यंत त्यांचे जन्मशताब्दी वर्ष असून, यानिमित्त राज्यशासनाने हे निर्णय घेतले आहेत. विधिमंडळाच्या आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधान परिषद व विधानसभा या दोन्ही सभागृहात स्व.डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या कार्याचा गौरव करणारा प्रस्ताव मांडण्याची घोषणादेखील यापूर्वीच झाली आहे.

## महाराष्ट्रातील ५४ पोलिसांना राष्ट्रपती पोलीस पदक



उल्लेखनीय कामगिरीसाठी दिले जाणारे राष्ट्रपती पोलीस पदक केंद्रीय गृहमंत्रालयाने जाहीर केले आहेत. देशातील १०४० पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना राष्ट्रपती पोलीस पदक जाहीर झाले असून यामध्ये महाराष्ट्रातील ५४ पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

## सक्षम अभियान

पेट्रोलियम पदार्थांच्या संरक्षणाबाबत जनजागृती करण्यासाठी पेट्रोलियम संवर्धन संशोधन संघटनेद्वारे आयोजित 'सक्षम अभियान २०२०'(संरक्षण क्षमता महोत्सव) कार्यक्रमाचे उद्घाटन अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे झाले.

विकासाकडे वेगाने वाटचाल करणाऱ्या आपल्या देशाची व राज्याची ऊर्जेची वाढती गरज भागवण्यासाठी पेट्रोलियम पदार्थांच्या आयातीवर अवलंबून राहावे लागते. अशा परिस्थितीत ऊर्जा साधनांचा काटकसरीने वापर देशाच्या व राज्याच्या शाश्वत विकास आणि पर्यावरण संवर्धनासाठी महत्वाचे पाऊल ठरते. राज्य सरकार पेट्रोलियम पदार्थांना पर्याय म्हणून अपारंपरिक ऊर्जेचा व इतर साधनांचा वापर करण्यासाठी उपाययोजना करीत आहेत. 'सक्षम अभियान २०२०' (संरक्षण क्षमता महोत्सव) हे अभियान दि. १६ जानेवारी ते १५ फेब्रुवारी २०२० या कालावधीत सुरू राहणार असून या अभियानाचे 'इंधन अधिक ना खपाए, आओ पर्यावरण बचाए' हे घोषवाक्य आहे.



**सक्षम अभियान २०२०च्या उद्घाटनप्रसंगी प्रतिज्ञा घेताना अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ. सोबत अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाचे प्रधान सचिव महेश पाठक, इंडियन ऑईल कॉर्पोरेशनचे प्रादेशिक समन्वयक सुजीत रॉय.**

**परिवहन संस्था पुरस्कार :** राष्ट्रीय स्तरावरील दुसरा उत्कृष्ट राज्य परिवहन संस्था पुरस्कार बेस्टचे मुख्य प्रबंधक श्री. लाड यांना आणि बेस्टच्या बांद्रा डेपोला उत्कृष्ट डेपो पुरस्कार देण्यात आला. राज्यस्तरावरील उत्कृष्ट परिवहन पुरस्कार मुरुड (रायगड), पंचवटी (नाशिक), यवतमाळ, श्रीवर्धन (रायगड), पेण (रायगड), परभणी, पीएमपीएमएल पुणेच्या बालेवाडी या डेपोंना उत्कृष्ट डेपो पुरस्कार देण्यात आले. पीसीआरएच्या सक्षम-संरक्षण क्षमता महोत्सव या व्हॅनचे उद्घाटन करण्यात आले.

राज्याच्या हिताच्या अनेक योजनांना मंत्रिमंडळात मान्यता दिली जाते.
अशा काही निर्णयांचा विस्तृत आढावा..

# मंत्रिमंडळात ठरले...

## इंदू मिल येथील स्मारक

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या इंदू मिल येथे होणाऱ्या स्मारकामधील पुतळ्याची उंची ३५० फूट इतकी करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. यापूर्वी या पुतळ्याची उंची २५० फूट इतकी निश्चित करण्यात आली होती. या निर्णयामुळे या स्मारकाचा चबुतरा १०० फूट व पुतळा ३५० फूट अशी स्मारकाची एकूण उंची जमिनीपासून ४५० फूट इतकी होईल.

या प्रकल्पासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सुधारित संकल्पानुसार सादर केलेल्या अंदाजित खर्चास मान्यता देण्यात आली. हा खर्च प्राधिकरणामार्फत करण्यात येणार असून त्याची प्रतिपूर्ती शासन करणार आहे. हा प्रकल्प तीन वर्षात होणे अपेक्षित आहे. यासाठी ९ फेब्रुवारी २०१८ रोजी कार्यादेश देण्यात आले असून सर्व संरचनात्मक आराखड्यांचे १०० टक्के काम पूर्ण होऊन आवश्यक परवानग्या प्राप्त झाल्या आहेत. पुतळ्याची उंची वाढवण्याच्या निर्णयामुळे आवश्यक परवानग्या तत्काळ घेण्यात याव्यात असेदेखील निर्देश देण्यात आले.

पुतळ्याची उंची वाढल्यामुळे लागणारे ब्राँझचे व लोखंडाचे प्रमाण वाढेल तसेच पुतळ्याच्या पायातदेखील वाढ होईल. या स्मारकामध्ये बौद्ध वास्तुरचना शैलीतील घुमट, संग्रहालय व प्रदर्शन भरवण्याची सोय असेल. तसेच पादपीठामध्ये ६ मीटर रुंदीचे चक्राकार मार्ग असतील. या स्मारकामध्ये ६८ टक्के जागेत खुली हरित जागा असेल. या ठिकाणी ४००



इंदू मिल येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रस्तावित स्मारकाच्या संकल्प चित्राची पाहणी करताना ज्येष्ठ नेते शरद पवार, सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे.

## पीक विमा योजना

रब्बी हंगाम २०१९ साठी विमा कंपनीची नेमणूक न होऊ शकलेल्या १० जिल्ह्यांत व्यावहारिक धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत उपाययोजना करण्यासाठी मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. ही समिती खरीप हंगाम २०२० मध्ये अशीच स्थिती उद्‌भवल्यास पीक विमा व फळ पीक विमा योजनेच्या संदर्भात आवश्यक उपाययोजना सुचवून निर्णय घेईल, तसेच सद्य:स्थितीत योजनेतील विविध त्रूटी दूर करण्यासाठी उपाययोजना सुचवणार आहे.



अनिश्चित हवामानाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्नाची हमी मिळण्याच्या दृष्टीने क्षेत्र हा घटक धरून राष्ट्रीय कृषी विमा योजना राबवण्यात येत होती. या योजनेत सुधारणा करून राज्यात २०१६ पासून प्रधानमंत्री कृषी विमा योजनेची अंमलबजावणी करण्यात येत होती.

ई-निविदा पद्धतीने जिल्हास्तरावर योजना अंमलबजावणी यंत्रणेची निवड केंद्र शासनाने निश्चित केलेल्या १८ विमा कंपन्यांमधून केली जाते. आयसीआयसीआय लोंबार्ड इन्शुरन्स, टाटा एआयजी जनरल इन्शुरन्स, चोलामंडलम जनरल इन्शुरन्स आणि श्रीराम जनरल इन्शुरन्स या चार विमा कंपन्यांनी योजनेत राष्ट्रीय स्तरावर सहभाग थांबवला आहे.

योजनेच्या अंमलबजावणीतील अडचणींमुळे विमा कंपनीचा निविदा प्रक्रियेस प्रतिसाद प्रत्येक हंगामात कमी होत आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेत शेतकऱ्यांचा सहभाग वाढत आहे. विमा हप्ता अनुदानात वाढ होत आहे. अशा स्थितीत शेतकऱ्यांना पीक विमा मिळत नसल्याबाबतच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात प्राप्त होत आहेत. रब्बी हंगाम २०१९ करिता विमा कंपन्यांकडून प्रतिसाद प्राप्त न झाल्यामुळे १० जिल्ह्यांमध्ये अद्यापपर्यंत योजना लागू करणे शक्य झाले नाही. फेरनिविदा काढल्यानंतर विमा कंपनीकडून प्रतिसाद प्राप्त झाला नाही. त्यामुळे या १० जिल्ह्यात पीक जोखीम व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. पुढील खरीप हंगामात अशीच स्थिती उद्‌भवल्यास योग्य उपाययोजना करणे आवश्यक असल्याने मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला.

लोकांची आसनक्षमता असलेले व्याख्यान वर्ग व कार्यशाळा घेण्याची सोय असलेले ध्यानगृह असेल. १००० लोकांची आसनक्षमता असलेले अत्याधुनिक प्रेक्षागृह असेल.

## तज्ज्ञ संचालकांच्या नियुक्त्या रद्द

कृषी उत्पन्न बाजार समित्यांवर करण्यात आलेल्या विशेष निमंत्रितांच्या (तज्ज्ञ संचालक) नियुक्त्या रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. तज्ज्ञ संचालक नियुक्त करण्यासाठीची महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील या संदर्भातील तरतुदी देखील वगळण्यात येणार आहे.

या अधिनियमानुसार १३ जून २०१५ पासून तज्ज्ञ संचालकांच्या नियुक्त्यांसाठी तरतूद करण्यात आली होती. ही तरतूद रद्द करण्याबाबत अध्यादेश काढण्याचा प्रस्ताव राज्यपालांकडे पाठवण्यास मान्यता देण्यात आली. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेला निर्णय लक्षात घेऊन आतापर्यंत केलेल्या नियुक्त्या प्रकरणपरत्वे रद्द करण्याबाबतचा निर्णय घेण्यास मान्यता देण्यात आली.

## एकसदस्यीय प्रभाग पद्धत

नगरपरिषदांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीऐवजी एकसदस्यीय प्रभाग पद्धतीचा अवलंब करण्यासाठी अधिनियम सुधारण्यासाठी अध्यादेश काढण्यास मान्यता देण्यात आली.

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम १०(२) मध्ये नगरपरिषद निवडणुकांकरिता प्रभाग पद्धती व सदस्य संख्या याबाबतच्या तरतुदी आहेत. २०१७ मध्ये केलेल्या सुधारणेनुसार सद्य:स्थितीत नगरपरिषद क्षेत्रात बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीचा अवलंब करण्यात येतो. या तरतुदीनुसार प्रभागात शक्य असेल तिथे २ परंतु ३ पेक्षा अधिक नाहीत इतके परिषद सदस्य निवडून येतात. नगर परिषद क्षेत्राचा प्रभागातील विकास गतिमान करण्यासाठी एक सदस्यीय पद्धत लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीची केलेली तरतूद प्रस्तावित महाराष्ट्र नगरपरिषद (सुधारणा) अधिनियम २०१९ च्या सुरुवातीच्या निवडणुकांपुरतीच लागू असेल. या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी विधी व न्याय विभागाच्या सल्ल्यानुसार आवश्यक सुधारणांसह अध्यादेश मसुदा निश्चित करण्यात येईल.

## स्मार्ट प्रकल्प

कृषी व कृषिपूरक व्यवसायाशी निगडित सर्व घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी जागतिक बँकेच्या साहाय्याने महाराष्ट्र राज्य कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात मंत्रिमंडळाच्या बैठकीत सादरीकरण

करण्यात आले.

या प्रकल्पासाठी जागतिक बँकेच्या साहाय्याने सुमारे २१०० कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाईल. यामध्ये जागतिक बँकेच्या कर्जाचा हिस्सा १४७० कोटी रुपये, राज्य शासनाचा हिस्सा ५६० कोटी रुपये आणि सीएसआरमधून ७० कोटी रुपये राहील. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा कालावधी सात वर्षे इतका ठरवण्यात आला आहे.

स्मार्ट प्रकल्पांतर्गत कृषी मालाच्या पणनविषयक पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर विशेष भर देण्यात येईल. यामध्ये शेतमाल बाजार प्रवेशाच्या नोंदी, प्रतवारी, गुणवत्ता तपासणी, संगणकीकृत शेतमाल लिलाव पद्धती, साठवणूक सुविधा, निर्यात सुविधा निर्मिती, अस्तित्वातील सुविधांचे आधुनिकीकरण व बळकटीकरण तसेच कृषी उत्पन्न बाजार समित्या व खासगी बाजार समित्यांना ई-ट्रेडिंग प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून एकीकृत बाजार नेटवर्कद्वारे जोडण्याची सुविधा यांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे शेतकरी उत्पादक गटांची निर्मिती व त्यांच्या सक्रिय सहभागातून शेतकऱ्यांना बाजारपेठेशी जोडणे, शेतमालाचे काढणीपश्चात व्यवस्थापन व प्राथमिक प्रक्रियेद्वारे मूल्यवृद्धी, ग्राहकांसाठी सुरक्षित खाद्य (Safe Food) उत्पादित करण्यास मदत आणि या सर्व उपक्रमांद्वारे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करून त्यांच्यासाठी उपजीविकेच्या स्रोतांची निर्मिती या प्रकल्पाचे प्रमुख उद्देश आहेत.

प्रकल्पाच्या माध्यमातून स्वयंसाहाय्यता समूह, ग्राम संघ, प्रभाग संघ, शेतकरी उत्पादक कंपन्या, साधारण स्वारस्य गट, शेतकरी स्वारस्य गट यांची स्थापना करण्यासह त्यांचे बळकटीकरण आणि कौशल्य विकास करण्यात येणार आहे. याअंतर्गत स्थापित संस्थांची वार्षिक उलाढाल वाढवणे व त्यांची जोडणी प्रस्थापित खासगी व्यावसायिकांशी करण्यासाठी साहाय्यभूत ठरणारी मूल्यवर्धित साखळी निर्माण करण्यात येणार आहे. शेतकरी उत्पादक संस्था, उत्पादक समूह व इतर संबंधित संस्थांचा विकास व्यापार केंद्र म्हणून केला जाईल. तसेच विभागनिहाय बाजार सुलभता केंद्रांची स्थापना केली जाईल. या बाजार केंद्रात कृषी उत्पन्न बाजार समित्या, शेतकरी उत्पादक संस्था, ग्रामीण बाजार, वखार महामंडळ, खासगी बाजार इत्यादींचा समावेश असेल. ग्रामीण बाजारांतून वितरण केंद्रांची स्थापना आणि धान्य व

## नाग नदीचे प्रदूषण रोखणार

नाग नदी प्रदूषण रोखण्याच्या प्रकल्पासाठी आवश्यक निधीच्या कर्ज फेडीसाठी शासनाच्या हिश्श्याच्या रकमेस हमी देण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रकल्पाच्या अंमलबजावणी आणि सनियंत्रणासाठी समन्वय समिती नियुक्त करण्यात येणार आहे.

केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयामार्फत राष्ट्रीय नदी कृती योजनांतर्गत नदी काठावरील शहरांच्या सांडपाण्यापासून नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्यानुसार राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालय, केंद्रीय जलशक्ती मंत्रालय यांनी राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेंतर्गत नाग नदी प्रदूषण रोखण्याच्या २४१२.६४ कोटी रुपयांच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे. प्रकल्पाची अंमलबजावणी नागपूर महानगरपालिका करणार आहे. नदीत येणारे सांडपाणी अडवणे/वळवणे, प्रक्रिया करणे, सांडपाणी प्रक्रिया केंद्र (एसटीपी) बांधणे, सुलभ शौचालये अशी कामे या प्रकल्पाद्वारे करण्यात येतील.




प्रकल्पात केंद्र शासन, राज्य शासन व नागपूर महानगरपालिकेचा अनुक्रमे ६०:२५:१५ या प्रमाणात हिस्सा असणार आहे. तो प्रत्येकी अनुक्रमे १४४७.५९ कोटी रुपये, ६०३.१६ कोटी व ३६१.८९ कोटी इतका आहे. योजनेसाठी केंद्र शासन जायका या संस्थेकडून १८६४.३ कोटी रुपये इतके कर्ज घेणार आहे.

या कर्जाच्या परतफेडीमध्ये केंद्र शासनाचा हिस्सा १४६०.४ कोटी (कर्जाच्या रकमेच्या ७८.३४ टक्के) व राज्य शासनाचा हिस्सा रु. ४०३.९ कोटी (कर्जाच्या रकमेच्या २१.६६ टक्के) इतका असेल. राज्य शासनाच्या हिश्श्याच्या ६०३.१६ कोटी (२५ टक्के) रकमेपैकी ४०३.९ कोटी रुपये केंद्र शासन जायका या संस्थेकडून घेणार आहे. या कर्जाची परतफेड (एकूण कर्जाच्या २१.७७ टक्के) तसेच राज्य शासनाच्या हिश्श्यातील उर्वरित १९९.२६ कोटी इतकी अतिरिक्त रकमेची हमी केंद्रीय जलशक्ती मंत्रालयास देण्याचा निर्णय घेण्यात आला. या प्रकल्पाच्या अंमलबजावणी आणि संनियंत्रणासाठी नागपूरचे पालकमंत्री तथा ऊर्जा मंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय समिती नियुक्त करण्यात येईल. या समितीत गृहमंत्री अनिल देशमुख, क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनील केदार, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांचा समावेश करण्यात आला आहे. नागपूर महापालिका आयुक्त समितीचे सदस्य सचिव असतील.

## अध्यापकांसाठी प्रशिक्षण संस्था

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर होत असलेल्या आधुनिक शिक्षण पद्धतीतील बदल लक्षात घेऊन उच्च व तंत्र शिक्षण विभागातील अधीनस्थ अध्यापकांच्या व प्राचार्यांच्या प्रशिक्षणासाठी कंपनी कायद्यान्वये अध्यापक विकास संस्था स्थापन करण्याच्या इतिवृत्तास काही सुधारणांसह मान्यता देण्यात आली. या संस्थेस स्वायत्तता मिळण्याच्या अनुषंगाने कंपनी कायद्याखाली ही संस्था स्थापन करण्यात येईल. यामध्ये शासनाचा सहभाग ४० टक्के, राज्य तंत्रशिक्षण मंडळाचा हिस्सा ५ टक्के, सर्व विद्यापीठांचा हिस्सा ४० टक्के, शैक्षणिक संस्था व उद्योग यांचा हिस्सा ५ टक्के तसेच स्वयंसेवी संस्था व व्यवसाय संस्था यांचा हिस्सा १० टक्के एवढा राहील.



विद्यापीठे तसेच महाविद्यालये, संस्था यांच्याकडून सदस्यत्व शुल्क घेण्यात येणार असून कार्पोरेट व बिझनेस हाऊस यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या निधीचा कॉर्पस फंड तयार करण्यात येईल. या प्रशिक्षण संस्थेचे कामकाज चालविण्यासाठी प्रशासकीय समिती स्थापन करण्यात येईल व मुख्य सचिव हे त्याचे अध्यक्ष असतील.

**संस्थेची उद्दिष्टे :-**

- उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमधील शिक्षकांना उद्योग/व्यवसाय व त्यांच्या संबंधीत क्षेत्राचे अद्ययावत ज्ञान, शैक्षणिक पद्धती/तंत्रज्ञान यांनी समृद्ध करणे.
- विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेमध्ये झालेल्या बदलांच्या आधारे प्रशिक्षणाची परिणामकारकता तपासून प्रशिक्षण पद्धतीमध्ये गरजेनुरूप बदल करणे.
- उद्योग क्षेत्रांमध्ये उपलब्ध असलेल्या/होणाऱ्या रोजगार संधीच्या आधारे नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम विकसित करून तसे बदल अभ्यासक्रमामध्ये करण्यासाठी शैक्षणिक संस्थांना मार्गदर्शन करणे.
- शिक्षणाच्या गुणवत्ता वाढीसाठी प्रभावी शिकणे-शिकविण्याची पद्धती स्थापित करणे व शैक्षणिक क्षेत्रामध्ये संशोधनास प्रोत्साहित करणे.
- शैक्षणिकदृष्ट्या प्रगत राष्ट्रांमधील व इतर राज्यांतील शैक्षणिक पद्धतींचा अभ्यास करून अद्ययावत तंत्रज्ञानाधिष्ठित व रोजगाराभिमुख अभ्यास पद्धतींबाबत शासनास शिफारस करणे/सल्ला देणे.
- पायाभूत/उजळणी/अभिमूख/नियतकालिक प्रशिक्षण आयोजित करणे.
- संस्थेमध्ये अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्र, अत्याधुनिक तंत्रज्ञान, नेतृत्व विकास, बहु-अनुशासनात्मक अध्यापक समूह व सर्वसमावेशक शिक्षण अशी ५ उत्कृष्टता केंद्रे प्रस्तावित असून याद्वारे सर्वसमावेशक असे प्रशिक्षण देणे त्याचप्रमाणे दुर्बल घटक, महिला व दिव्यांग यांच्या शिक्षणाच्या अनुषंगाने संवेदशीलता निर्माण करणे.

फळे-भाज्या बाजार समूहाची स्थापना केली जाईल.


## पदांची निर्मिती

इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागासप्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग कल्याण या प्रवर्गासाठी सहसचिव तसेच उपसचिव ही पदे निर्माण करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

सह सचिव संवर्गातील एक पद तसेच उप सचिव संवर्गातील एक पद यामुळे निर्माण होईल. या विभागाकडे एकूण ५२ पदांचा आकृतिबंध आहे. या विभागासाठी नव्याने ३७ पदे नियमित आणि दोन पदे बाह्य स्रोताद्वारे उपलब्ध करून घेण्यास यापूर्वीच मान्यता देण्यात आली आहे.

## सरपंचाची निवड

सरपंचांची निवड लोकांमधून थेट निवडणुकीऐवजी आता निवडून आलेल्या सदस्यांमधूनच करण्याचा निर्णय घेण्यात आला. खर्चाच्या विवरणाच्या संदर्भात सुधारीत वेळापत्रकात बदल करण्यास मंजुरी देण्यात आली. संबंधित कायद्यामध्ये सुधारणा करण्यासाठी अध्यादेश काढण्यात येईल.



## नगराध्यक्षाची निवड

नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या नगराध्यक्षांची निवड, निर्वाचित नगरसेवकांमधून करण्यात येणार आहे. यासाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. सध्या नगराध्यक्षांची निवड थेट जनतेमधून करण्यात येते.

अधिनियमात प्रस्तावित सुधारणा करण्यासाठी अध्यादेश प्रख्यापित करण्याची राज्यपालांना विनंती करण्यास आणि विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने अध्यादेशाचा मसुदा अंतिम करण्यास मान्यता देण्यात आली.

## अधिव्याख्यात्यांना वेतनवाढ

राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील ज्या अधिव्याख्यात्यांनी १ जानेवारी १९९६ पूर्वी पीएच.डी पूर्ण केली आहे, त्यांना २७ जुलै १९९८ ऐवजी १ जानेवारी १९९६ पासून दोन आगाऊ वेतनवाढी देण्यासाठी घेतलेल्या निर्णयाच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. राज्यातील पीएच.डी. अर्हताप्राप्त अधिव्याख्यात्यांना दोन वेतनवाढी मंजूर करण्यात आल्या होत्या. मात्र या वेतनवाढी १९९६ पासून करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्यानुसार हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. यासाठीच्या खर्चास मान्यता देण्यात आली.

## सुधारित वेतनश्रेणी

अखिल भारतीय तंत्रज्ञान परिषदेने शिफारस केल्यानुसार शासकीय व अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्था, रसायन तंत्रज्ञान संस्था, शासन मालकीचे अभिमत विद्यापीठ, मांटुगा तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे येथील शिक्षक व समकक्ष पदांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात येणार आहे. या संदर्भात मंत्रिमंडळाच्या यापूर्वी झालेल्या बैठकीतील इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.

## वस्तू व सेवा कर सुधारणा

महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) अधिनियम, २०१९ मध्ये आनुषांगिक सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) अधिनियम, २०१९ मधील कलम २, कलम ७, कलम १०, कलम




१३ व कलम १४ ते २० यातील तरतुदींची अंमलबजावणी वस्तू व सेवा कर परिषद शिफारस करेल त्या दिनांकापासून करण्यासाठी मान्यता देण्यात आली.

या प्रस्तावाच्या अंमलबजावणीसाठी अध्यादेश काढण्यासाठीची परवानगी देण्यात आली.

## कृषी उत्पन्न बाजार समिती

कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणुकीत पात्र शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार देण्यासाठी २०१७ मध्ये केलेली सुधारणा रद्द करून पूर्वीप्रमाणेच विविध कार्यकारी सेवा संस्थांमधून सदस्य निवड करण्यास व त्या दृष्टीने अध्यादेश प्रख्यापित करण्यास मान्यता देण्यात आली.



कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुका घेण्यासाठी शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार आहे. यामुळे मतदारांच्या संख्येत वाढ झाली असून बाजार समित्यांच्या निवडणुकीचा खर्च वाढला आहे. या समित्यांना शासनातर्फे कोणतेही अनुदान दिले जात नाही. केवळ बाजार शुल्कामधून या समित्या आपला खर्च भागवतात. काही बाजार समित्यांच्या निवडणुका वेळीच न घेतल्याने उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलेल्या मतदानाच्या अधिकाराबाबत पुनर्विचार करण्याचा निर्णय घेण्यात आला. आता पूर्वीप्रमाणेच विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या व बहुउद्देशीय सहकारी संस्थांच्या व्यवस्थापन समितीच्या सदस्यांमधून निवडलेले-११, ग्रामपंचायत सदस्यांमधून-४, अशा एकूण १५ शेतकरी प्रतिनिधींची निवड करण्याची तरतूद कायम ठेवण्यात येईल. २०१७ मध्ये बाजार क्षेत्रात राहणाऱ्या किमान १० आर इतकी जमीन धारण करणाऱ्या आणि बाजार समितीमध्ये कृषी उत्पन्नाची विक्री करणाऱ्या शेतकऱ्याला मतदानाचा अधिकार देण्याची सुधारणा करण्यात आली होती. ती या अध्यादेशाद्वारे रद्द करण्यात येईल.



जलसंधारणाच्या कामामुळे पावसाचे पाणी अशा रितीने साठवून ठेवता येऊ लागले आहे.

**जालना येथील पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये पडणारा पाऊस याच परिसरात अडवण्याची क्षमता निर्माण करण्यात यश मिळाले. जुने ३ पाणी साठे, नवीन १६ साठे, एक नवीन विहीर निर्माण करून लाखो-करोडो लीटर पाण्याचा साठा प्रशिक्षण केंद्राच्या हद्दीत तयार करून, झाडाची पूर्ण १०० टक्के गरज भागवणे शक्य झाले.**

# पाणीटंचाई संपली

**नामदेव ज्ञानदेव चव्हाण**

जागतिक तापमान वाढीचा विपरीत परिणाम निसर्ग व मानवावर होत आहे. त्यामुळे दिवसेंदिवस नैसर्गिक संपत्तीचा ऱ्हास होत आहे. याचे दुष्परिणाम रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करणे गरजेचे झाले असल्याने, यासाठी राज्य व केंद्र शासनाकडून व सेवाभावी संस्था यांच्याकडून विविध प्रकल्प राबवले जात आहेत. यासाठी निधीदेखील उपलब्ध करून दिला जातो. राज्यातील पोलिसांनी आपला सहभाग नोंदवला आहे. पोलीस प्रशिक्षण केंद्राच्या कार्यक्षेत्रातील शासकीय, निमशासकीय व खाजगी संस्थाशी समन्वय साधत नावीन्यपूर्ण संकल्पना राबवण्यात आल्या. परिणामी पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना येथील प्रशिक्षण केंद्रातील सर्व बाह्यवर्ग, आंतरवर्गाचे अधिकारी, प्रशिक्षक व त्यांची टीम आणि प्रशिक्षण केंद्रातील स्वेच्छेने श्रमदान करणारे सर्व प्रशिक्षणार्थी यांच्या एकत्रित सहकार्याने या श्रमनिर्मित जलस्वराज्य प्रकल्पाचा प्रारंभ करण्यात आला.

## पाणीटंचाईवर मात

जालना शहरात कमी प्रमाणात पाऊस झाल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. पोलीस प्रशिक्षण केंद्र येथे असलेल्या पाण्याच्या विहिरी व बोअरवेल कोरड्या पडल्या होत्या. परिसरातील झाडांना प्रशिक्षणार्थींना दिवसासाठी किमान आठ टँकर पाणी बाहेरून आणून पुरवठा करावा लागला. पाणी नसल्याने या प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या नवप्रविष्ट पोलीस शिपाई, कारागृह प्रशिक्षणार्थी, महाराष्ट्र सुरक्षा बल प्रशिक्षणार्थी (एकूण ९२६) यांना इतरत्र पाठवावे लागणार होते. वारंवार भेडसावलेल्या दुष्काळाच्या समस्येवर उपाय करण्याचा ध्यास घेत पुढील सप्तसूत्री कार्यक्रमाची आखणी केली.

- गुरे चरण्यास बंदी, त्या कामी प्रशिक्षण केंद्रसीमेवर खोल चरीयुक्त कुंपण निर्मिती.
- पाणलोट क्षेत्रातील पाणी जागेवर अडवण्याकामी- कंटुर चरी.
- कंटुर चरीमधील ओसंडणारे पाणी अडविण्याकामी छोटे माती बंधारे त्यानंतर मोठे /मध्यम माती बंधारे.
- माती बंधाऱ्यामधील पाणी अडवण्यासाठी नाला खोलीकरण.
- परिसरातील पाण्याचे नाल्यात हार्वेस्टिंग, इमारतीवरील पाण्याचे रेन वॉटर हार्वेस्टिंग व परिसरातील बोअरवेल पुनर्भरण.
- संपूर्ण पाणलोट क्षेत्रात, नाल्याचे दुतर्फा, प्रशिक्षण केंद्रामध्येच तयार केलेली कडुलिंब व करंजीची ३५००० झाडे अटल घन वन प्रकल्पांतर्गत ६०,००० झाडे लावण्यात आली. एकूण ९५००० वृक्षलागवड व संगोपन करण्यात आली

आहे.

- नाल्याच्या बाजूला असलेल्या चार विहिरी या ४० इंच व्यासाच्या ८० इंच खोलीच्या करणे.

वरील सर्व कार्यक्रम टप्प्याटप्प्याने राबवण्यास सुरुवात केली. त्या कामी श्रमदान अत्यंत मोलाचे ठरले. या माध्यमातून दिलेल्या ९५ टक्के प्रकल्प सिद्धीस गेला.

## वृक्षारोपण

शासनाच्या वृक्षलागवड योजनेंतर्गत पोलीस प्रशिक्षण केंद्रास दिलेल्या उद्दिष्टांप्रमाणे प्रशिक्षण केंद्र परिसरात १०,००० करंज, सिसम, चिंच, कडुलिंब, बांबू या वृक्षांची लागवड करण्यात आली. पोलीस प्रशिक्षण केंद्रातील प्रशासकीय इमारतीच्या पाठीमागील परिसरात हिरवी जाळी (ग्रीन नेट) लावून संकल्प नर्सरीची निर्मिती केली गेली. खानावळीच्या दुधाच्या रिकाम्या पिशव्या एकत्रित केल्या. त्या पिशव्यांमध्ये काळीमाती व खत टाकून विविध प्रकारचे बांबू, कडुलिंब, करंज, यांची ३५००० रोपे तयार केली गेली. विभागीय वन अधिकारी, सामाजिक वन विभाग, जालना यांच्या मदतीने पोलीस प्रशिक्षण केंद्र परिसरातील २ हेक्टर जमिनीवर 'अटल आनंदवन घन वन' प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्यात किमान १८ स्थानिक, देशी प्रजातीचे ६०,००० वृक्ष लावण्यात आले. या वर्षी प्रशिक्षण केंद्र, जालना येथील परिसरात ९५,००० वृक्षांचे रोपण व संगोपन सुरू आहे.

## जलसाठ्यांमध्ये वाढ

दुसऱ्या टप्प्यात औद्योगिक वसाहतीच्या बाजूचा चालण्याचा रस्ता उंच केला, ५२० मीटर लांब, ६० मीटर रुंद व २.५ मीटर खोलीचा तलाव तयार केला. त्याच्या पाणलोट क्षेत्रात छोटे बंधारे कंटुर, चरी, वृक्षारोपण करून शेजारील वनविभागाच्या हद्दीमधून येणाऱ्या नाल्याचे पूर्ण पाणी आत, याच बंधाऱ्यात घेऊन, ते साठवण्याची क्षमता असणारा तलाव निर्माण करण्यात आला. प्रशिक्षण केंद्राच्या गेट १ व २ च्यामधील अपार्टमेंटच्या पाठीमागे छोट्या नाल्यावर अतिरिक्त ६ मध्यम माती बंधारे करून पाणी साठा करण्याची व्यवस्था करण्यात आली. अशा पद्धतीने या हद्दीत सर्व नवीन २५ पाणी साठे अस्तित्वात आले. ते सर्व आज पाण्याने भरलेले आहेत.

कंटुर, चऱ्या, बंधारे नालाखोलीकरणाचे काम तसेच रोपवाटिका व कलम करणे याबद्दलची विस्तृत माहिती कर्मचाऱ्यांना देऊन ते काम करून घेतले. प्रशिक्षण क्षेत्राचा परिसर विस्तृत आहे. या क्षेत्राच्या शिवारातील पाणी संचयन योजना, कर्मचारी व अधिकारी यांनी स्वतः श्रमदान करून छोटे, मध्यम व मोठे जलाशय तयार केले आहेत.

परतीच्या पावसाच्या काळात जालना शहरात अपेक्षेपेक्षा जास्त पर्जन्यवृष्टी झाली. या पावसामुळे टप्प्याटप्प्याने कंटुरचर, तलाव, छोटे बांध, मोठे बांध, व खोलीकरण केलेला नाला हे पाण्याने भरले. प्रशिक्षण केंद्रातील ज्या बोअर, विहिरी पाण्याअभावी बंद पडल्या होत्या, त्यांना पुन्हा पाणी लागले.

## स्वयंसेवी संस्थांची मदत

पोलीस प्रशिक्षण केंद्रात जलसंधारणाची झालेली वरीलप्रमाणे कामे पाहून जालना शहरामधील आनंदगरी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थाचे कार्यकर्ते, पदाधिकारी आमच्याकडे आले. त्यांनी त्यांच्याकडील पोकलँड मशीन अल्पदरात एक महिन्याच्या कालावधीकरिता पोलीस प्रशिक्षण केंद्रास पुरवले. सुरुवातीला देवगिरी व वेरूळ या वसतिगृहास लागून असलेल्या नाल्याचे जेसीबीद्वारे रुंदीकरण व खोलीकरण करण्यात आले. प्रशिक्षण केंद्राच्या बाहेर परिसरात वाहून जाणारे पाणी अडवण्यात आले.

प्रशिक्षण केंद्रामध्ये पडणारा पाऊस पूर्णपणे प्रशिक्षण केंद्राच्या परिसरातच अडवण्याची क्षमता या प्रकल्पात आहे. जुने ३ पाणीसाठे, नवीन १६ साठे, एक नवीन विहीर निर्माण करून लाखो-करोडो लीटर पाण्याचा साठा प्रशिक्षण केंद्राचे हद्दीत तयार केल्याने प्रशिक्षण केंद्राची व झाडांची पूर्ण १०० टक्के गरज आपल्याला यातून भागवता येत आहे.



**प्रशिक्षण केंद्रात पडलेला पाऊस अडवून त्याद्वारे जलसाठा निर्माण करण्यात आला आहे.**

प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र , जालना






**इस्रायल हे अतिशय मोक्याच्या ठिकाणी, आफ्रिका व आशिया या दोन खंडांच्या मध्ये वसलेलं आहे. त्यामुळेच नैसर्गिक सौंदर्य, विविध संस्कृतींचा संगम आणि अफलातून हवामान यांची देणगी इस्रायलला मिळाली आहे. इस्रायलमध्ये अनेक पर्यटन स्थळं आहेत. त्यामुळेच देश-विदेशातील पर्यटकांचे लक्ष इस्रायलने कायमच वेधले आहे. अत्यंत विपरीत परिस्थितीत इस्रायलने साधलेला विकास, तिथलं आधुनिक तंत्रज्ञान आणि तेथील पर्यटन स्थळं यामुळे इस्रायल फार झपाट्याने पर्यटनाच्या जागतिक नकाशावर स्थिर होऊ पाहतो आहे.**

# छोटा देश, मोठी झेप

**अनय जोगळेकर**

इस्रायलचा विकासाचा दृष्टिकोन आणि विकासाच्या दृष्टीने त्यांच्या प्राधान्यक्रमावर असलेले विषय याबाबत बोलताना इस्रायलचे कौन्सिल जनरल श्री. याकोव फिंकलश्टाइन म्हणाले की इस्रायलने कायम सर्व राष्ट्रांसाठी प्रकाशदूत बनण्याची आकांक्षा बाळगली आहे. (कदाचित हे कुणाला खोटं वाटेल) इस्रायल याकडे एक आव्हान आणि जबाबदारी म्हणून बघतो. सतत नावीन्याचा ध्यास घेऊन हे संपूर्ण जग सुंदर बनवण्याची या देशाची इच्छा व धडपड असते. त्यामुळेच पाणी, शेती, ऊर्जा, आरोग्य अशा क्षेत्रातील विविध समस्यांवर अतिशय नावीन्यपूर्ण तोडगे काढून ते केवळ स्वतःपुरते न ठेवता ते जगभरातील देण्याचे या देशाचे धोरण आहे. त्याचबरोबर संरक्षण, शारीरिक सुरक्षा ते सायबर सुरक्षा यासारख्या विविध विषयांवर अत्याधुनिक तंत्रज्ञान विकसित करण्याला प्राधान्य दिलं आहे.

इस्रायलची ओळखच पायाभूत, स्वतंत्र, नावीन्यपूर्ण विचार आणि उद्यमशीलता यामुळे असल्याने या देशाला 'द स्टार्ट अप नेशन'चं बिरुद मिळालं आहे. त्या दृष्टिकोनातून अनेक जण असं म्हणतात की इस्रायली 'आऊट ऑफ द बॉक्स' विचार करतात. या देशाला याबाबत इस्रायलचे कौन्सिल जनरल श्री. याकोव फिंकलश्टाइन असे म्हणतात की,

मी त्याकडे असं बघतो की आम्ही बॉक्स बघतच नाही. त्यामुळेच इस्रायल आज मध्यपूर्वेत नावीन्यता, अत्याधुनिक संशोधन व विकास, सायबर सुरक्षा, स्मार्ट सिटी आणि स्वयंचलित तंत्रज्ञान यासाठीची ‘सिलिकॉन वाडी’ उद्याचं तंत्रज्ञान मिळवण्याची इच्छा असलेल्या बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी एक प्रमुख केंद्र बनलं आहे.

## अनोखी परंपरा

१९४८ साली आमच्या पूर्वजांनी स्वातंत्र्याचा जाहीरनामा घोषित करताना ज्या लोकशाही राज्याची कल्पना केली होती, ती साकार करण्यासाठी आम्ही आमच्या अनोखा परंपरांचा लोकशाही मूल्यांशी संगम साधतो.

इस्रायलचे सरकार त्याच्या सर्व रहिवाशांच्या फायद्यासाठी विकासाला गती देईल. हे सरकार इस्रायलच्या प्रेषितांच्या संकल्पनेतील राष्ट्र अस्तित्वात आणण्यासाठी स्वातंत्र्य, न्याय आणि शांततेची कास धरेल. धर्म, जात, लिंग यापैकी कशाच्याच आधारावर भेद न करता ते आपल्या सर्व रहिवाशांना समान सामाजिक व राजकीय हक्क मिळतील याची खात्री करेल, असं या जाहीरनाम्यात म्हटलं होतं.

आपल्या शेजारील राष्ट्रांबरोबर शांततेत राहण्याची इस्रायलची धडपड असते. मध्यपूर्वेत शांतता प्रस्थापित करण्यासाठी आर्थिक विकास आणि आधुनिकता यांचा शिक्षण व संवाद यांच्याशी संगम होणं आवश्यक आहे. तीच मध्यपूर्वेतील शांततेची गुरुकिल्ली आहे अशी इस्रायलची धारणा आहे. आम्ही पाहतो आहोत की इजिप्तमध्ये सुरू झालेली ही बदलाची प्रक्रिया आता अरब व अन्य मुस्लीम देशांमध्ये पसरत असून ते इस्रायली तंत्रज्ञान, क्रीडा आणि आमच्यासोबत द्विपक्षीय संबंध राखण्यासाठी उत्सुकता दाखवत आहेत. त्यामुळे आमच्या विभागाच्या भविष्याबाबत मी खूप आशावादी आहे

## विविध संस्कृतींचा संगम

इस्रायलमध्ये अनेक पर्यटन स्थळं आहेत. त्यामुळेच देश-विदेशातील पर्यटकांचे लक्ष इस्रायलने कायम वेधले आहे. अत्यंत विपरीत परिस्थितीत इस्रायलने साधलेला विकास, तिथलं आधुनिक तंत्रज्ञान आणि तेथील पर्यटन स्थळं यामुळे इस्रायल फार झपाट्याने पर्यटनाच्या जागतिक नकाशावर स्थिर होऊ पाहतो आहे. या पार्श्वभूमीवर इस्रायलचा पर्यटन व्यवसाय आणि तेथील पर्यटनविषयक संधी याबाबत विचारले असता इस्रायलचे कौन्सल जनरल म्हणाले, इस्रायल हे अतिशय मोक्याच्या ठिकाणी, आफ्रिका व आशिया या दोन खंडांच्या मध्ये वसलेलं आहे. त्यामुळेच नैसर्गिक सौंदर्य, विविध संस्कृतींचा संगम आणि अफलातून हवामान यांची देणगी इस्रायलला मिळालेली आहे. आमचा प्रदेश छोटा आहे. फक्त बावीस हजार चौरस किलोमीटर म्हणजे साधारणतः भारतातील मणिपूर राज्याएवढं आमचं चिमुकलं राष्ट्र आहे. एक ते दोन तासाच्या ड्राईव्हने माणूस आरामात तेल अविवच्या चमचमत्या समुद्रकिनाऱ्यांपासून व तेथील झगमगत्या नाईट लाईफपासून निघून जेरुसलेम च्या ऐतिहासिक स्थळांपाशी किंवा तेथील नजर बांधून ठेवतील अशा भिंतीपाशी पोहोचू शकतो. तिथे जाऊन विविध क्रीडा प्रकार किंवा वाळवंटातील बेदाऊ आतिथ्य किंवा गॅलीली पर्वतराजीतील गिर्यारोहण किंवा आईला इलियॅटमधील स्कुबा डायविंग किंवा या पृथ्वीचं सगळ्यात खालचं टोक असलेल्या मृत समुद्रामध्ये अद्भूत स्पाचा आनंद घेऊ शकतो

या सर्व ठिकाणांदरम्यान असणारी सुखद प्रवासाची सुविधा आणि या वेगवेगळ्या आकर्षण स्थळांची निकटता यामुळे वाढत्या संख्येने पर्यटक इस्रायलकडे आकर्षित होत आहेत. गेल्या वर्षी चाळीस लाख पर्यटकांनी इस्रायलला भेट दिली. त्यात बिझिनेस आणि आराम या दोन्ही दृष्टींनी इस्रायलला भेट देणाऱ्या भारतीयांची संख्या खूप मोठी आहे. खूप पूर्वीपासून मुंबईवरून थेट विमानसेवा उपलब्ध होती. मात्र त्याच्या जोडीने आता नवी दिल्ली, गोवा आणि कोचीहूनही इस्रायलला




विमानसेवा सुरू झाल्याने आता इस्रायलला भेट देणे भारतीयांसाठी सोपे व स्वस्त झाले आहे. मुंबईत आमचे पर्यटन कार्यालय असून तो विभाग सतत पर्यटकांसाठी आकर्षक योजना आखत असतो. त्याचे परिणाम अगदी स्पष्ट आहेत. २०१८ मध्ये इस्रायलला येणाऱ्या भारतीय पर्यटकांच्या संख्येत २१ टक्क्यांनी वाढ झाली. जानेवारी ते डिसेंबर २०१८ या दरम्यान ७०,८०० भारतीय पर्यटकांनी इस्रायलला भेट दिली त्यामुळे इस्रायलला भेट देणाऱ्या पर्यटकांच्या संख्येनुसार भारत आता बाराव्या क्रमांकावर पोहोचला आहे. २०१९-२०२० साली हा आकडा आणखीच मोठा असेल याची आम्हाला खात्री आहे.

## सामंजस्य करार

श्री. याकोव फिंकलश्टाइन हे इस्रायलचे कौन्सिल जनरल म्हणून मुंबईत आल्यावर त्यांनी दोन्ही राष्ट्रातील मैत्री संबंध वाढवण्याच्या दृष्टीने तसेच व्यवसाय वाढीच्या दृष्टीनेही अनेक विधायक पावले उचलली. त्यांची माहिती देताना ते म्हणाले, ‘जानेवारी २०१८ मध्ये आमचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी भारताला दिलेल्या भेटीदरम्यान मी मुंबईत कामाला होतो हे मी माझे भाग्य समजतो. ही ऐतिहासिक भेट होती, कारण इस्रायलचे पंतप्रधान पहिल्यांदाच मुंबईला भेट देत होते. भारताच्या पश्चिम राज्यांतील आमच्या सहकार्याच्या धोरणाला या भेटीमुळे गती आली. ही राज्यं व इस्रायलच्या दरम्यान आर्थिक, सांस्कृतिक तसेच तंत्रज्ञानविषयक सहकार्याला त्याने खूप मोठी गती दिली. या भेटीनंतर

लगेचच महाराष्ट्र सरकार आणि इस्रायलमधील नॅशनल वॉटर कंपनी यांच्यामध्ये मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाबाबत मास्टर प्लॅन तयार करण्याच्या दृष्टीने सामंजस्य करार झाला यानुसार इस्रायलने विकसित केलेले तंत्रज्ञान वापरून मराठवाड्यातील ११ धरणांना जोडण्यात येणार असून त्यामुळे मराठवाडा कायमचा दुष्काळमुक्त होईल. आमच्या पंतप्रधानांच्या या भेटीदरम्यान बॉलिवूडमधील अनेक दिग्गज उदाहरणार्थ अमिताभ बच्चन, करण जोहर, ऐश्वर्या राय आणि सारा अली खान हे 'शालॉम् बॉलिवूड' या सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत आमच्या पंतप्रधानांच्या स्वागतासाठी एकत्र आले होते. त्या वेळी पंतप्रधान नेत्यानाहू यांनी बॉलिवूडला इस्रायलला येण्याचे व तेथे चित्रपटांचे चित्रीकरण करण्याचे आमंत्रण दिले. त्या दृष्टीने आता पावले पडायला लागली असून 'ड्राईव्ह' या सिनेमासाठी जॅकलीन फर्नांडिस आणि सुशांत सिंग राजपूत यांच्यावर चित्रित केलेला एक छोटा सीन 'नेटफ्लीक्स'वर जारी करण्यात आला आहे . स्मार्ट सिटी, स्मार्ट मोबिलिटी, सायबर, उच्च शिक्षण आणि स्टार्ट अप इकोसिस्टिम या विषयात सहकार्य वाढवण्यासाठी आम्ही राज्य सरकारी व खासगी क्षेत्रांशी हातमिळवणी करून काम करत आहोत.



## प्रामाणिक लोकशाही व्यवस्था

सततच्या रक्तरंजित संघर्षाचा, अनिश्चित परिस्थितीचा सामना करत इस्रायल विकासाच्या वाटेवर राहिला आहे. त्याची या पुढची वाटचाल कशी असेल, पुढच्या दहा वर्षांत इस्रायल राजकीय, सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या कसा विकसित होईल हे इस्रायलच्या कौन्सिल जनरलकडूनच जाणून घेणे आवश्यक होते. त्यांना याबाबत विचारले असता ते म्हणाले, 'आम्हाला अभिमान वाटतो की इस्रायल ही फार झपाट्याने विकसित होत असलेली अर्थव्यवस्था आणि अत्यंत प्रामाणिक अशी लोकशाही व्यवस्था आहे. मुक्त पत्रकारिता आणि आवाजी राजकीय वादविवाद ही आमची वैशिष्ट्यं आहेत. स्वातंत्र्य मिळाले तेव्हा आमची लोकसंख्या सहा लाख होती. आज आम्ही ९० लाखाच्या पुढे गेलो आहोत आणि २०२४ सालापर्यंत पर्यंत आमची लोकसंख्या १ कोटीपर्यंत वाढेल, असा आमचा अंदाज आहे. बंजर जमीन, अत्यंत कमी पाऊस, सुपीक जमिनीचा अभाव आणि सुरक्षात्मक आव्हानं असलेला आमचा देश आज प्रगतिपथावर इतक्या पुढे आला आहे व विकासाची नवनवीन शिखरे सर करतो आहे हे कोणत्याही चमत्कारापेक्षा कमी नाही. आमची संस्कृती चैतन्यमयी आहे, कारण इस्रायलमधील ज्यू लोक हे तब्बल ७० देशांतून आले आहेत आणि येथे येताना, ते त्या त्या देशातील खाद्यसंस्कृती, संगीत आणि सांस्कृतिक प्रभाव घेऊन आले आहेत. त्यांचा येथील मूळ संस्कृतीशी अतिशय सहज मिलाप झाला आहे. ते त्यांच्यात मिसळून गेले आहेत. भविष्यात अत्याधुनिक संशोधन व तंत्रज्ञान आणि जागतिक समस्या यांच्या तोडग्यासाठी इस्रायल हे एक प्रमुख केंद्र बनेल हे निश्चित आहे. इस्रायल नामक हा चमत्कार तुम्ही प्रत्यक्ष येऊन बघा, असे मी तुम्हांला आमंत्रण देतो. तुम्ही नक्की खूश व्हाल..

## हळवा कोपरा

आज फार मोठ्या संख्येने भारतीय असलेला ज्यूवंशीय समाज इस्रायलला स्थलांतरित झाला आहे. त्यामुळेच इस्रायलसाठी सर्वच भारतीयांच्या मनात कायम एक हळवा कोपरा असतो. त्यासंदर्भात भारत व इस्रायल यांच्यातील द्विपक्षीय संबंध कसे आहेत असे विचारले असता काऊन्सिल जनरल श्री. याकोव फिंकलश्टाइन म्हणाले, 'भारतीय पंतप्रधान मोदी आणि इस्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू यांनी एकमेकांच्या देशांना भेट दिल्यानंतर दोन्ही देशांतील धोरणात्मक संबंध आज सर्वोच्च पातळीवर आहेत. पण आपले संबंध नवीन नाहीत. ज्यू व भारतीय यांच्यातील ऐतिहासिक संबंध आहेत. तब्बल दोन हजार वर्षांपासून भारतात राहत असलेल्या ज्यू समाजामुळे यासंबंधांचा पाया मजबूत बनला आहे. २९ जानेवारी १९९२ ला दोन्ही देशांमध्ये पूर्ण राजनैतिक संबंध प्रस्थापित होईपर्यंत हे संबंध सतत विकसित होत राहिले. हे सहकार्य किंवा हे संबंध तिहेरी आहेत. ते दोन सरकारांमध्ये म्हणजे 'गव्हर्मेंट टू गव्हर्मेंट' जसे आहेत, तसेच दोन्ही देशातील व्यवसायांमध्ये म्हणजेच 'बिझनेस टू बिझनेस' असेही आहेत आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे दोन्ही देशांतील नागरिकांमध्ये म्हणजेच 'पीपल टू पीपल' स्तरावरही आहेत. दोन्ही देशांतील व्यापार १९९२ मध्ये दोनशे मिलियन डॉलर होता तो २०१८ मध्ये वाढून ५.८ बिलियन डॉलर्सवर जाऊन पोहोचला आहे. आज अनेक भारतीय कंपन्या विशेषतः माहिती तंत्रज्ञान, सायबर सिक्युरिटी, स्मार्ट मोबिलिटी, शेती, जलव्यवस्थापन आणि स्मार्ट सिटी या क्षेत्रात इस्रायली तंत्रज्ञान तसेच संशोधन व विकास प्रणालीमध्ये गुंतवणूक करायला लागल्या आहेत. इस्रायली विद्यापीठांतील भारतीय विद्यार्थ्यांची संख्या वाढते आहे. आज इस्रायलमध्ये शिकणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांपैकी सगळ्यात जास्त विद्यार्थी भारतातील आहेत. पर्यटन तसेच सांस्कृतिक आदानप्रदानही वाढले आहे.

शिवशाहीमध्ये तब्बल २५ वर्षे स्वराज्याच्या राजधानीचा मान अभिमानाने मिरविणारा राजगड हा शिवप्रेमी आणि दुर्गप्रेमींचा आवडता गड आहे. शिवकालातील अनेक ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार, बेलाग, चिलखती बांधणी आणि छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊसाहेबांचा लाभलेला सहवास अशा अनेक गोष्टी आपल्याला गडाकडे खेचून नेतात. उन्हाळ्यात आपला कणखरपणा दाखविणारा, पावसाळ्यात हिरवाईने नटणारा आणि हिवाळ्यात धुक्यामध्ये हरवणारा हा राजगड. गडावरून तोरणा, प्रतापगड, रायगड, लिंगाणा, सिंहगड, पुरंदर, वज्रगड, मल्हारगड, रोहिडा, रायरेश्वर आणि लोहगड, विसापूर हे किल्ले दिसतात. त्यामुळे स्वराज्याचे दर्शन घेण्यासाठी राजगडावर येणे क्रमप्राप्त आहे.



# गडांचा राजा : राजगड

**सारंग खानापूरकर**

तोरणा घेऊन शिवरायांनी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. या तोरण्यावरच त्यांना सापडलेल्या धनसंपत्तीचा धोरणीपणाने वापर करत शिवरायांनी मुरुंबदेवाच्या डोंगरावर बुलंद असा राजगड बांधला. अत्यंत उंच, तीन बळकट भुजा आणि मध्यभागी उंचच उंच कातळ असे नैसर्गिक संरक्षण लाभलेल्या डोंगरावर शिवरायांनी भक्कम तटबंदी, माच्या आणि बालेकिल्ला उभारत त्याला अभेद्यपणा आणला. स्वराज्याच्या पहिल्या राजधानीचा मान मिळाल्यानंतर या गडाने अनेक आनंदाचे, दु:खाचे आणि तणावाचे प्रसंग पाहिले.




राजाराम महाराजांचा जन्म पाहणाऱ्या या गडाने शिवाजी महाराजांच्या पत्नी सईबाईंच्या निधनाचे दु:ख सोसले आहे. अफझलखानाच्या वधासाठी महाराज याच गडावरून प्रतापगडावर गेले. आग्र्यातून सुटका झाल्यावर त्यांनी पहिले पाऊल राजगडावरच टाकले. याच गडावरून कारभार पाहत शिवरायांनी स्वराज्य वाढवले. इसवी सन १६४८ ते १६७२ अशी २५ वर्षे महाराजांनी इथे वास्तव्य केले. नंतर राजधानी रायगडावर हलवली.

## पद्मावती माची

गडावरील सर्वाधिक सपाटी याच माचीवर आहे. त्यामुळेच येथे शिवरायांचा वाडा, शिबंदीच्या खोल्या, सदर, सईबाईंची समाधी, पद्मावतीचे मंदिर, पद्मावती तलाव, धान्याची व दारूची कोठारे आहेत. माचीच्या खालील भागात पद्मावती तलाव आणि चोर दरवाजा आहे. मधल्या भागात विश्रामगृह, शंकर मंदिर आणि पद्मावती आईचे मंदिर आहे. मंदिरासमोरच सईबाईंची समाधी आहे.

## संजीवनी माची

पद्मावती माचीच्या पश्चिमेकडे संजीवनी माची आहे. तीन टप्प्यांत उतरणारी संजीवनी माची अडीच किलोमीटर लांब

पसरली आहे. या टप्प्यात तब्बल १९ बुरूज येतात. राजगडावरील सुवेळा आणि संजीवनी माचीच्या या तटांना बाहेरून आणखी एक चिलखत चढवले आहे. या एकात एक असलेल्या बुरुजांमध्ये येण्या-जाण्यासाठी मार्ग आहेत. दुहेरी तटबंदी हे राजगडाचे वैशिष्ट्यच आहे. या माचीवर अनेक पाण्याची टाकी आहेत. संजीवनी माचीवर आळू दरवाजानेसुद्धा येता येते. इंग्रजी एस' आकाराप्रमाणे येथील तटबंदी वक्राकार असल्याने आळू दरवाज्याचा बाहेरचा दरवाजा आतून दिसत नाही तर बाहेरून आतला दरवाजा दिसत नाही.

## सुवेळा माची

पूर्वेच्या दिशेला असल्याने या माचीला सुवेळा असे नाव आहे. पद्मावती तळ्याच्या बाजूने वर गेले की, रामेश्वर मंदिर आणि पद्मावती मंदिर आहे. पुढे गेल्यावर एक रस्ता बालेकिल्ल्याकडे, एक डावीकडून सुवेळा माचीकडे आणि तिसरा उजवीकडे संजीवनी माचीला जातो. सुवेळा माचीवरून जाताना वाट निमुळती होत जाते आणि पुढे एक टेकडी लागते. तिला डुबा म्हणतात. डुब्याला वळसा घालून झुंजार बुरुजापाशी येता येते. हा बुरुज माचीचे दोन भाग करतो. सुवेळा माचीच्या मधोमध एक कातळ उभा ठाकला आहे. समोरून त्याचा आकार एखाद्या हत्तीसारखा वाटतो. या कातळाच्या पोटात नेढे आहे. याला कोणी वाघाचा डोळा असेही म्हणतात. कड्याच्या बाजूला मधाची पोळी आहेत. या मधमाशांची खोड काढण्याचा प्रयत्न करणारे पस्तावल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळे जास्त आरडाओरडा करू नका. सुवेळा माचीच्या शेवटच्या टप्प्यात वाघजाईचे शिल्प आहे.

## गडाची रचना

राजगडाला पद्मावती, सुवेळा आणि संजीवनी अशा तीन माच्या आहेत. गडाच्या मधोमध उंच कातळावर बालेकिल्ला आहे. प्रत्येक माचीला स्वतंत्र दरवाजा आहे. पद्मावती माचीवर येण्यासाठी पाली दरवाजा, संजीवनी माचीसाठी अळू दरवाजा तर सुवेळा माचीवर येण्यासाठी गुंजवणे दरवाजा आहे. शिवाय प्रत्येक ठिकाणी चोर दरवाजे आहेतच. या गडावर येणाऱ्या बहुतेक प्रमुख वाटा पद्मावती माचीवर आणून सोडतात. पाली दरवाजा हा राजमार्ग असल्याने पालखी येऊ शकेल इतका तो रुंद आणि उंच आहे. महादरवाजावर असणाऱ्या बुरुजावर जाण्यासाठी पायऱ्या आहेत. खालचा आणि वरचा असे दोन मुख्य दरवाजे आहेत. वरच्या दरवाज्याच्या बुरुजावरुन खालील संपूर्ण मार्ग नजरेच्या टप्प्यात येतो. प्रवेशद्वारांचे संरक्षण बुलंद बुरुजांनी केलेले आहे. दरवाजातून आत शिरल्यावर दोन्ही बाजूस पहारेकऱ्यांच्या देवड्या आहेत. या दरवाजाने गडावर आल्यावर आपण पद्मावती माचीवर पोहोचतो.

## पाहण्यासारखी इतर ठिकाणे :

- **पद्मावती तलाव :** पद्मावती माचीवर आल्यावर सुबक बांधणीचा विस्तीर्ण असा तलाव आढळतो. तलावाच्या भिंती शाबूत आहेत. तलावात जाण्यासाठी त्याच्या भिंतीतच एक कमान तयार केलेली आहे.
- **गुंजवणे दरवाजा :** हा दरवाजा म्हणजे तीन प्रवेशद्वारांची एक मालिका आहे. पहिला दरवाजा साधा असला तरी भक्कम आहे. दुसऱ्या प्रवेशद्वाराला वैशिष्ट्यपूर्ण कमान आहे. येथील नक्षी पाहण्यासारखी आहे. या प्रवेशद्वारातून आत आल्यावर पद्मावती माची लागते.
- **आळू दरवाजा :** संजीवनी माचीवर येण्यासाठी हा मार्ग होता. तोरण्यावरून राजगडावर याच मार्गावरून येता येत असे.



## गडावर कसे पोहचाल ?

**पुण्यापासून अंतर :** ४८ कि.मी. **समुद्रसपाटीपासूनची उंची :** १३९४ फूट

पुणे-सातारा मार्गावर नसरापूर फाट्यापासून आत गेल्यावर पुढे राजगडाकडे जाण्याचा मार्ग आहे. कर्जत, पाली, पुणे, गुंजवणे या बसस्थानकांवरून जाणाऱ्या महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या एसटी गाड्या आहेत.

## गडावर जाण्यासाठी मार्ग

**गुप्त दरवाजा :** वाजेघर या गावी उतरून राजगडावर येता येते. बाबुदा झापापासून एक तासाच्या अंतरावर रेलिंग आहेत. रेलिंगच्या साह्याने राजगडावर जाता येते.

**पाली दरवाजा :** पुणे-वेल्हे एस.टी.ने वेल्हेमार्गे पाबे या गावी उतरावे. कानद नदी पार करून पाली दरवाजा गाठावा. ही वाट पायऱ्यांची आणि म्हणूनच सर्वांत सोपी आहे. या वाटेने गडावर जाण्यास तीन तास लागतात.

**गुंजवणे दरवाजा :** पुणे-वेल्हे या हमरस्त्यावरील मार्गासनी या गावी उतरून साखरमार्गे गुंजवणे या गावात जाता येते. ही वाट जरा अवघड आहे. त्यामुळे माहीतगार बरोबर असल्याशिवाय ही वाट धरू नये.

**राहण्याची सोय :** गडावरील पद्मावती मंदिरात राहता येते. शिवाय पर्यटक निवासाच्या खोल्या आहेत. जेवणाची सोय आपण आपलीच करावी. गडावर पाण्याचे टाके असल्याने बारमाही पाणी असते.

### बालेकिल्ला

हा राजगडाच्या सर्वात उंच भाग. या बालेकिल्ल्याकडे जाणारा रस्ता कठीण आणि अरुंद आहे. चढण संपल्यानंतर बालेकिल्ल्याचा महादरवाजा लागतो. सहा मीटर उंचीच्या या प्रवेशद्वारावर कमळ, स्वस्तिक ही चिन्हे कोरलेली आहेत. बालेकिल्ल्याला तटबंदी बांधलेली असून विशिष्ट अंतरावर बुरुजही आहेत. दरवाज्यातून आत गेल्यावर जननीमंदिर, चंद्रतळे लागते. तळ्याच्या समोर उत्तर बुरूज आहे. या भागातून संपूर्ण राजगडाचा विस्तार दिसतो. या उत्तर बुरुजाच्या बाजूला ब्रह्मर्षी ऋषींचे मंदिर आहे. बालेकिल्ल्यावर काही भग्न अवस्थेतील इमारती चौथरे, वाड्यांचे अवशेष आढळतात.

### गड पाहताना...

राजगड हा अत्यंत देखणा गड आहे. या गडाने मोठा इतिहास पाहिला आहे. त्यामुळे गडावर जाताना आजूबाजूला निरीक्षण करत जावे. गडाची रचना अत्यंत देखणी आणि व्यूहात्मक आहे. त्यातून शिवाजी महाराजांचा दूरदृष्टी दिसून येते. शत्रूकडील अनेक जणांनी राजगडाचे वर्णन अत्यंत अवघड आणि अजिंक्य' असे करून ठेवले आहे. राजगडावरील तटबंदी हा अनेकांच्या कौतुकाचा विषय आहे. गडाचा घेर प्रचंड मोठा असल्याने गडाला वेढा घालणे शत्रूला अशक्य होते. त्यातच अवघड वाट, दाट जंगल, उंचच उंच कडे, चिलखती तटबंदी आणि शत्रूला नामोहरम करणारी दुर्गरचना यामुळे हा गडांचा राजा होता, यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही.

**लेखक दै. सकाळमध्ये पत्रकार आहेत.**

**यशाच्या मार्गात असंख्य अडचणी आणि अडथळे असतात. मात्र इच्छाशक्ती असली की या अडथळ्यांवर मात करण्याची प्रेरणा मिळते. पालघर या आदिवासीबहुल जिल्ह्यातील सफाळे हे गाव. येथील एका युवकाने वडिलांचा कांदे, बटाटे होलसेल विक्रीचा व्यवसाय सांभाळून यूपीएससीची परीक्षा ४९२ गुणांसह उत्तीर्ण होत यशाला गवसणी घातली. सागर शहा हे या युवकाचे नाव. परीक्षेच्या तयारीपासून यशापर्यंत असंख्य अडचणींचा सामना करावा लागतो. सागरही त्याला अपवाद नव्हता. मात्र त्याने जिद्दीने अडचणींवर मात करत यशाची पायरी चढली.**

# शिखर गाठले...



**सागर शहा**
रँक ४९२, वर्ष २०१७

प्रत्येकाच्या जीवनात अडथळ्यांची शर्यत चालू असते. त्याला कुणीही अपवाद नसतो. फरक एवढाच असतो की अडथळे आणि अडचणींचे स्वरूप वेगवेगळे असते. त्यामुळे आपण त्याकडे समस्या म्हणून न बघता संधी म्हणून पाहायला हवे. मी ऐरोस्पेसमध्ये बी.टेक केलं. मात्र २०१२ मध्ये वडिलांचे छत्र हरवले. आमचा होलसेल कांदा/बटाटा विक्रीचा व्यवसाय आहे. आमचे बहुतेक नातलग व्यावसायिक आहेत. त्यामुळे स्पर्धा परीक्षेची वाट निवडणारा आमच्यापैकी मी एकटाच. वडील गेल्यानंतर तीन वर्षे त्यांचा व्यवसाय सांभाळला. मात्र स्पर्धा परीक्षेत यश मिळवायचे आणि प्रशासनात यायचे हा चंग मी मनाशी केव्हाच बांधला होता. मनात जिद्द होतीच. मात्र व्यवसाय सांभाळून अभ्यासाकडे पूर्ण लक्ष देणे शक्य होत नसल्याने मग काही दिवस हा व्यवसाय भाडेतत्त्वावर इतरांकडे सोपवला. दरम्यान मला आई व भावाची मोठी साथ लाभली.

### यशाचा प्रवास

मार्गदर्शन मिळवण्यासाठी मुंबई ते पालघर असा वेळखाऊ लोकल प्रवासही मला करावा लागला. मात्र हा वेळ मी वाया न जाऊ देता अडथळ्यांमध्ये संधी शोधत गेलो. गर्दीच्या वेळी मोबाइलवर अथवा छोट्या पुस्तिकांच्या माध्यमातून मी चालू घडामोडींचा अभ्यास करत असे. गर्दी नसताना अभ्यासक्रमातील इतर साहित्याचे वाचन करायचो. स्वत:ला वचन दिले होते. काही झाले तरी यश मिळवायचेच. पहिले दोन प्रयत्न अयशस्वी झाले मात्र यात काय काय चुका आपल्याकडून झाल्या, परीक्षेच्या तयारीत आपण कोठे कमी पडलो याचे चिंतन करून तिसऱ्या प्रयत्नात मात्र २०१७ च्या परीक्षेत ४९२ गुणांकासह यशाला गवसणी घालण्यात मी यशस्वी झालो.

### इंटरनेटचा प्रभावी वापर

शिकवणी वर्ग लावण्यापेक्षा मात्र घरीच अभ्यास करणे पसंद केले. कारण घर आणि शहरातील अंतर खूप होते. आणि मला माझ्या क्षमतांवर विश्वास होता. या यशात मला अविनाश धर्माधिकारी यांचे मार्गदर्शन लाभले. इंटरनेटचा वापर मी या तयारी दरम्यान केला. 'इन्साइट्स ऑन इंडिया', 'फोरम आएएस' आदी संकेतस्थळांचा उपयोग करून घेतला. यूपीएससीच्या तयारीदरम्यान इंटरनेटचा प्रभावी वापर केल्यास तयारी सुकर होते. इंटरनेट हे माहितीचे महाजाल आहे. त्याचा चपखल वापर आपल्याला करता यायला हवा. अनेक संदर्भ, साहित्य एका क्लिकवर उपलब्ध होते. अनेक प्रवाह माहीत

प्रेरणा

### यशाची सूत्रे

■ चिकित्सक दृष्टिकोन ठेऊन वाचन करा. ■ आकलनक्षमता विकसित करा. ■ परीक्षेत उत्तरे लिहिताना वाक्ये साधी असावी. ■ इंटनेटचा प्रभावी वापर करा. समाजमाध्यमांचा केवळ परीक्षेच्या तयारीच्या दृष्टीने उपयोग करा. ■ शांत चित्ताने परीक्षेला सामोरे जा. ■ खूप मेहनत करा, जास्तीत जास्त तयारीवर भर द्या. ■ स्वत:ला वचन द्या, निर्धार करा आणि त्या निर्धारावर ठाम राहून जिद्दीने तयारी करा. ■ कठीण काळ असला तरी याच वेळी निर्णय घ्या, यातच संधी दडलेली असते.



पडतात. इतिहासाची चिकित्सा करणाऱ्या विविध ट्विटर हॅण्डलला मी फॉलो करत होतो. इंटरनेटवर असंख्य उपयुक्त लेख वाचायला मिळाले. या परीक्षेची तयारी करणाऱ्या आम्ही काही मित्रांनी व्हाट्सअप ग्रुप तयार करून अभ्याससंबंधी माहिती, नियोजन आम्ही त्यावर शेअर करायचो. सांगायचा उद्देश एवढाच की स्पर्धा परीक्षेच्या तयारीदरम्यान सोशल मीडियाचा आपण सकारात्मक वापर करू शकतो. ग्रामीण भागातील उमेदवारांना इंटरनेटचा वापर करून तयारी करणे सहज शक्य आहे.

### सातत्य

यूपीएससीच्या तयारीदम्यान सातत्य खूप महत्त्वाचे असते. मी अगदी बारा बारा तास अभ्यास नाही केला. दिवसातील सहा-सात तास अभ्यास केला मात्र, तो मन लावून केला. पहिल्या दोन प्रयत्नांमध्ये मी ऑप्शनल व उत्तरे लिहिण्यावर भर दिला होता. त्याचा तिसऱ्या प्रयत्नात मला फायदा झाला.

### संयमाची परीक्षा

मुख्य परीक्षेत यश मिळाल्यानंतर मुलाखतीचा टप्पाही तेवढाच महत्त्वाचा आणि दडपण आणणारा असतो. मात्र मुलाखत ही एक सहज प्रक्रिया आहे. यामध्ये आपण स्वत:शी प्रामाणिक राहून प्रश्नांना सामोरे जायचे असते. ही संयमाची परीक्षा असते. येथे आपण किती संयमी आहोत, एखादा प्रश्न, ताण आपण कसा हाताळतो हे पाहिले जाते. प्रामाणिकपणाशी येथे तडजोड नाही.

मुलाखतीत आपले व्यक्तिमत्त्व तपासले जाते. आपली देहबोली, भाषा, आवाजाची पातळी, आत्मविश्वास, संवादकौशल्य, उत्तरातील नेमकेपणा आदी बाबींचा यात समावेश होतो. त्यामुळे या परीक्षेच्या तयारीदरम्यान व्यक्तीमत्त्व विकासावर भर द्यायला हवा. मुलाखत मातृभाषेत द्यावी की इंग्रजी भाषेत असे द्वंद मुलाखतीस पात्र अनेक उमेदवारांच्या मनात सुरू असते. पण खरंतर इंग्रजीत मुलाखत द्यावीच असे नाही. मात्र चांगला संवाद व्हायचा असेल तर इंग्रजी भाषा ठीक आहे. कारण पॅनल आणि आपल्यामध्ये दुभाषा राहत नाही आणि आपल्याला जे म्हणायचे आहे ते थेट पॅनलला कळते. त्याचा परिणाम अधिक होतो.




### करिअरचे नियोजन

स्पर्धा परीक्षेचा पॅटर्न वेळोवेळी बदलत असतो. यूपीएससी परीक्षेच्या अभ्यासक्रमाची व्याप्ती व यशस्वी होण्याचे प्रमाण बघता करिअरचा प्लॅन-बी आपल्याकडे तयार असावा. किमान तशी मानसिक तयारी असावी. कारण या परीक्षेत दुर्दैवाने यश न मिळाल्यास नैराश्यापासून दूर राहता यावे यासाठी करिअरच्या दुसऱ्या मार्गाचाही विचार आपण करून ठेवायला हवा. केंद्र व राज्य शासनाच्या असंख्य सेवा आहेत. त्यामध्ये आपली निवड होऊ शकते. दोन प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर मला नैराश्य येत होते. मात्र, माझ्या भावाने ते माझ्या आसपाही भटकू दिले नाही. तो सदैव मला खेळाडूंचे प्रेरणादायी व्हिडिओ दाखवून नव्या दमाने तयारी करण्याची ऊर्जा देत असे.

### वाचन व आकलनक्षमता विकास

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) परीक्षेची तयारी म्हणजे केवळ अभ्यास एके अभ्यास नसतो. तर ज्ञान व व्यक्तीमत्त्व विकासाचा कस लावणारी ही परीक्षा असते. आपल्या सर्व क्षमता या परीक्षेत पणाला लावयाच्या असतात. त्यामुळे आपल्या विशिष्ट क्षमतांचा विकास करणे ओघानेच आले. वाचन व आकलनक्षमतेत वाढ करणे आवश्यक ठरते. या परीक्षेची व्याप्ती मोठी असल्याने अभ्यास व संदर्भ साहित्याचा वापर मोठ्या प्रमाणावर करावा लागतो. अशा वेळी एखादी घटना, साहित्य वाचताना/अभ्यासताना त्या साहित्याचे मर्म, मथितार्थ आणि त्याच्या विविध छटा आपल्या लक्षात यायला हव्यात. कुठलेही साहित्य वाचताना आपला दृष्टिकोन चिकित्सक असेल तर त्याचे अधिक आकलन होते. लेखी परीक्षा यशाच्या टप्प्यात खूप महत्त्वाची ठरत असल्याने आपण प्रभावी लेखनक्षमता विकसित करायला हवी. आपली उत्तरे तितकीच सहज, सोपी व ओघवत्या भाषेत असावी.

**शब्दांकन : राजाराम देवकर,**
उपसंपादक, माहिती व जनसंपर्क

**लोककल्याणकारी योजना आणि विकास कामे यासाठी निधीची आवश्यकता असते, वेगवेगळ्या प्रकारच्या करांमधून शासनाला हा निधी प्राप्त होतो. त्यामुळे आपणाकडून देय असणारा कर योग्यरीत्या व वेळेवर भरणे हे प्रत्येक सुजाण नागरिकाचे कर्तव्य असते. मुद्रांक शुल्क हादेखील कर असून तो दस्तऐवजांना देय असतो. आपण सही करीत असलेल्या दस्तऐवजाला मुद्रांक अधिनियमान्वये मुद्रांक शुल्क देय होत असेल, तर तसे ते भरल्याची खात्री करणे ही प्रत्येक नागरिकांची जबाबदारी असते.**

# अभय मिळवा

**नयना बोदार्डे – गुरव**

## योग्य मुद्रांकित

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमासोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये नमूद प्रकारापैकी एखादा दस्त (किंवा संलेख) आपण करणार असू तर त्या दस्ताला, त्या परिशिष्टामध्ये दिलेल्या दरांनुसार मुद्रांक द्यावे लागते. काही दस्त प्रकारांसाठी निश्चित दर (जसे की, प्रतिज्ञापत्राला १००/-) आहे, तर काही दस्त प्रकारांसाठी, दस्तात नमूद मूल्यावर काही टक्के दर (जसे की, गहाणखताला, कर्जाच्या रकमेच्या ०.५टक्के) आहे.

## मुद्रांक शुल्क भरणा

आपणाला आपल्या दस्ताला देय होणाऱ्या मुद्रांक शुल्काची रक्कम समजली तरी ती कशी भरावयाची, केंव्हा भरावयाची हे समजून घेणे आवश्यक असते. जर मुद्रांकांची रक्कम ५००/- रुपयांपेक्षा जास्त नसेल तर स्टॅम्प पेपर रु.५०००/- पेक्षा जास्त नसेल तर फ्रँकिंग हे पर्याय उपलब्ध आहेत. शिवाय महाराष्ट्र शासनाच्या GRAS प्रणालीद्वारे ई-चलन किंवा काही निवडक बँकामध्ये मिळणारा ई-एसबीटीआर हे दोन पर्याय सध्या जास्त वापरात आहेत. याबद्दलची सविस्तर माहिती स्वतंत्र लेखामध्ये घेवूयात. मुद्रांक अधिनियमातील तरतुदीनुसार, मुद्रांक हा दस्तातील कोणत्यातरी पक्षकाराच्या नावाने खरेदी करणे आवश्यक असते.

## मुद्रांकचा वैधता कालावधी

एखादा मुद्रांक अगोदर खरेदी केला असेल तर खरेदीच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत, त्यावर दस्त लिहून सही करता येते. जर अगोदर दस्त लिहून मग मुद्रांक लावायचा असेल, तर सही केलेल्या दिवसापासून कामकाजाच्या दुसऱ्या दिवशीपर्यंत तो लावला पाहिजे. थोडक्यात, जर दस्ताला अधिनियमातील दराप्रमाणे येणाऱ्या मूल्याचा मुद्रांक विहित माध्यमाद्वारे योग्य मुदतीत लावला असेल तर तो दस्त 'योग्य मुद्रांकित' ठरतो.

नोंदणी व मुद्रांकशुल्क

## मुद्रांकाची अवैधता

जर एखादा दस्त वरीलप्रमाणे 'योग्य मुद्रांकित' नसेल तर भविष्यात वाद उद्भवल्यास, कोणतेही न्यायालय तो दस्त पुरावा म्हणून स्वीकारणार नाही. कोणत्याही शासकीय कार्यालयात किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये एखाद्या कामादरम्यान सादर केल्यास, तेथील अधिकारी त्या दस्ताच्या आधारे काम करू शकणार नाहीत. म्हणजेच जर दस्ताला योग्य मुद्रांक दिले नसेल तर त्या दस्ताद्वारे अपेक्षित परिणाम साधण्यात अडचणी येतील व संबंधित पक्षकारांचे हितसंबंध धोक्यात येतील.

दुसरे असे की, असा अपुऱ्या मुद्रांकित दस्तऐवजास कमी पडलेले मुद्रांक शुल्क भरण्यासाठी पक्षकाराने संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर केल्यास किंवा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कार्यवाही दरम्यान असा दस्त निदर्शनास आल्यास, कमी पडलेल्या मुद्रांक शुल्काबरोबरच दंडदेखील भरावा लागतो.



हा दंड मुद्रांक शुल्क फरकाच्या दरमहा २% दराने, दस्तावर सही केल्यापासून ते वसुलीच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीकरिता आकारला जातो. मुद्रांक शुल्क फरक व दंडाची रक्कम न भरल्यास, संबंधित मिळकत जप्त करण्याचे अधिकार विभागास आहेत.

याचा सारांश असा की, दस्तऐवजाला जर योग्य मुद्रांक दिला नाही तर आपल्या हक्कांना बाधा येऊ शकते. म्हणून यापूर्वी आपण केलेले दस्तऐवज योग्य मुद्रांकित

असल्याची खात्री करावी व मुद्रांक शुल्क कमी दिले असेल तर लगोलग जिल्ह्याच्या मुद्रांक जिल्हाधिकाऱ्यांकडे दाखल करून कमी पडलेले मुद्रांक शुल्क दंडासह शासनजमा करून आपला दस्त योग्य मुद्रांकित करून घ्यावा.

### अभय योजना/दंड सवलत योजना

कमी मुद्रांक लावलेल्या दस्तऐवजांचे बाबतीत वर उल्लेख केल्याप्रमाणे दंडाची तरतूद असली तरी शासनाने नागरिकांच्या विशेषत: अल्प व मध्यम उत्पन्न गटातील नागरिकांच्या कल्याणासाठी 'दंड सवलत योजना' नुकतीच लागू केली आहे.

**या योजनेची काही वैशिष्ट्ये:**

१) ही योजना सरसकट सर्व प्रकारच्या दस्तऐवजांकरिता लागू नसून पुढील प्रकारच्या दस्तांसाठीच आहे.

प्रकार १ - निवासी मिळकतींमधील भाडेदारी हक्क हस्तांतरित करण्यासंबंधीचे करार.

**प्रकार २ -** म्हाडा किंवा सिडको यांनी निवासी किंवा अनिवासी घटक किंवा युनिटांबाबतीत दिलेली वाटपपत्रे इ.

**प्रकार ३ -** झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत झोपडपट्टीधारकाला वाटप झालेल्या निवासी किंवा अनिवासी घटक किंवा युनिट वाटपाचे अभिहस्तांतरणपत्र किंवा त्यानंतरची हस्तांतरणे.

**प्रकार ४ -** मोफा ॲक्टप्रमाणे, मानीव अभिहस्तांतरणाकरिता पात्र असलेल्या किंवा मानीव अभिहस्तांतरण प्रलंबित असलेल्या नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील निवासी घटकांच्या वाटपाचे किंवा हस्तांतरणाचे किंवा विक्रीचे दस्त.

२) या प्रकारच्या दस्तांना कमी पडलेले मुद्रांक शुल्क असताना, अधिनियमाप्रमाणे जेवढा दंड (दरमहा २ टक्के दराने, दस्ताच्या दिनांकापासून वसुलीच्या दिनांकापर्यंत कालावधीकरिता) देय होईल, त्याच्या केवळ १० टक्के दंड आकारला जाईल, उर्वरित ९० टक्के दंड माफ होईल, अशी ही योजना आहे.

३) ही सवलत मिळण्याकरिता आपली मिळकत ज्या जिल्ह्यामध्ये आहे, त्या जिल्ह्याच्या मुद्रांक जिल्हाधिकारी यांच्याकडे विहित नमुन्यात अर्ज करून आपला मूळ दस्त दाखल करणे आवश्यक राहील.

४) वर क्र.१ मध्ये नमूद प्रकारचा दस्त आपण मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडे यापूर्वी दाखल केला असल्यास किंवा मुद्रांक जिल्हाधिकारी यांच्याकडून वसुलीची कार्यवाही सुरू असल्यास, त्या दस्ताबाबतीत ही सवलत मिळण्यासाठी आपण अर्ज करू शकता.

या योजनेची सर्वसाधारण माहिती आहे. सविस्तर माहितीसाठी igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावरील प्रकाशने / परिपत्रके / मुद्रांक / अभय योजना / अभय योजना २०१९, येथे उपलब्ध असलेली अधिसूचना आपणास पाहता येईल.

सर्वसामान्यांना दस्तास कमी दिलेले मुद्रांक शुल्क नाममात्र दंडासह भरण्याची ही लोककल्याणकारी योजना राज्य शासन राबवते. संबंधितांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन नोंदणी व मुद्रांक विभागातर्फे करण्यात आले आहे.

**सह नोंदणी महानिरीक्षक तथा मुद्रांक अधीक्षक (मुख्यालय), पुणे.**

**सायबर गुन्हेगारीचे एक नवीन तंत्र म्हणून ओटीपी एसएमएस बॉम्बिंगचा प्रकार अमलात आणून सायबर गुन्हेगार वेगळाच आनंद शोधू लागले आहेत. या प्रकारामध्ये टार्गेट केल्या गेलेल्या व्यक्तीच्या मोबाइल फोनवर एकत्रितच अक्षरश: शंभर ते हजार एसएमएस येऊन धडकतात. या सर्व एसएमएसचे स्रोत फ्लिपकार्ट, उबर, ओला, झोमॅटो, रेडबस यांसारख्या विविध एसएमएस गेटवेमध्ये असते. यामुळे अनेकांना नाहक त्रास होतो तर काहीजण सायबर गुन्ह्यांना बळी पडतात. तर काही वेळा फोन फॉरमॅट करण्याची वेळ येते.**

# एसएमएसचा बॉम्बगोळा

**ॲड. प्रशांत माळी**



एसएमएस बॉम्बिंगच्या माध्यमातून असंख्य मेसेज साधारणपणे फॉरगॉट पासवर्ड, म्हणजेच पासवर्ड विसरण्याचा पर्याय उपलब्ध असलेल्या संकेतस्थळामार्फत पाठवले जातात. एसएमएस बॉम्बिंग या प्रकाराचा एक तंत्र म्हणून जरी मी उल्लेख केला असला तरी हा सायबर गुन्हा आहे, हे विसरता कामा नये. यापूर्वी या गुन्ह्यातील मातब्बर पासवर्ड विसरण्याचा पर्याय असलेल्या ६-७ वेबसाईट्सच्या युआरएलची स्क्रिप्ट वापरून एसएमएस बॉम्बिंगचा प्रकार घडवून आणत. यामध्ये एसएमएस गेटवे एपीआय असलेले एक स्क्रिप्ट वापरले जात असे. हे स्क्रिप्ट निरनिराळ्या एसएमएस गेटवेसाठी वापरण्यात येई. एसएमएस गेटवे प्रोव्हायडर, मोबाइलवर येणाऱ्या मॅसेजेससंबंधी फॉरवर्डिंग, राऊटिंग आणि स्टोरिंग असे विविध पर्याय देतात.

एसएमएस बॉम्बिंगमध्ये विविध टूल्सचा वापर केला जातो. असे करताना त्या सॉफ्टवेअर स्क्रिप्टमध्ये केवळ एक मोबाइल नंबर टाकून फॉरगॉट पासवर्डचा पर्याय अवलंबवून एकसारखा तोच नंबर जास्तीत जास्त वेळा वापरला जातो. जास्तीत जास्त म्हणजे निदान १० वेळा तरी 'फॉरगॉट पासवर्ड' पर्याय अवलंबवला जातो. त्यामुळे त्या विशिष्ट मोबाइल धारकाला फॉरगॉट पासवर्डची लिंक वापरून सतत तोच मोबाइल नंबर टाकल्यामुळे कंपनीतर्फे १० ओटीपी मेसेजेस येतात.

सायबर महागुरू

## बॉम्बिंग थांबवणारे ॲप्स

ऑनलाइन माध्यमात हजारो ॲप्लिकेशन्स उपलब्ध आहेत, जे एसएमएस बॉम्बिंग रोखू शकतात. काही एसएमएस बॉम्बिंग ॲप्लिकेशन्स तुमचा मोबाइल नंबर एसएमएस बॉम्बिंग प्रकारापासून लपविण्यासाठी बऱ्यापैकी वेळ घेतात आणि काही ॲप्लिकेशन्स बॉम्बिंग मेसेजेस पाठवणाऱ्यांना ब्लॅकलिस्टमध्ये वर्गीकृत करतात, जेणेकरून तुमच्या मोबाइल नंबरवर फेक किंवा खोटे मेसेजेस पाठवले जाणार नाहीत. असेच एक ॲप्लिकेशन म्हणजे ॲंटी एसएमएस बॉम्बर. ही एक साधारण ॲंड्रॉइड युटिलिटी म्हणता येईल,



ज्याद्वारे नकोसे एसएमएस तुम्ही तुमच्या ॲंड्रॉइड डिव्हाइसवर ब्लॉक करू शकता. याशिवाय, ॲंटी एसएमएस बॉम्बर प्रो हे एक मोफत उपलब्ध असलेले ॲप्लिकेशन असून ते जवळपास ९६.४७ एमबी इतक्या साइजचे असून इंटरनेटद्वारे डाऊनलोड करता येते.

याचे विशिष्ट गुणधर्म म्हणजे एसएमएस बॉम्बिंगचा घेराव घातला गेला की या ॲप्लिकेशनद्वारे पूर्वसूचना दिली जाते, काही उघड एसएमएस प्रेषकांकरवी (म्हणजेच, एक्सप्लिसिट सेंडर) आलेले एसएमएस ब्लॉक केले जातात, एसएमएस बॉम्बिंगचे लॉग्स ऑनलाइन बघता येतात, इतकेच नव्हे तर कोणत्याही एसएमएस सेंडरच्या आयडीद्वारे नकली एसएमएस ब्लॉक केले जाऊ शकतात.

## एसएमएस शील्ड

'एसएमएस शील्ड' नावाचे ॲप तुमच्या ॲंड्रॉइड डिव्हाइसमध्ये 'इनबाऊंड एसएमएस'ला चॅनेल्स वाटून देण्यासाठी ब्लॅकलिस्ट आणि व्हाईट रनडाऊन मेनू देतात. हा मेनू ब्लॅकलिस्टप्रमाणेच कार्य करतो आणि याव्यतिरिक्त या ॲप्लिकेशनमध्ये कंट्रोल मेनू समाविष्ट केलेला असतो, जेणेकरून तुम्ही हे ॲप्लिकेशन सुरू किंवा बंद करू शकता. 'प्रायव्हसी गार्ड कॉल आणि एसएमएस ब्लॉक' याद्वारे तुम्ही तुमच्या ॲंड्रॉइड फोनवर एसएमएस सेंडर्सना ब्लॅकलिस्ट करू शकता. अशाच प्रकारे, 'एसएमएस ब्लॉकर' नावाचे अप्लिकेशन ब्लॉकिंग एसएमएस सेंडर्सची ब्लॅकलिस्ट पुरविते आणि स्पॅम एसएमएस सेंडर्सना तुमच्या ॲंड्रॉइड डिव्हाईसमध्ये ब्लॉक करते.

आजकाल ब्लॅक-हॅट डेव्हलपर्स निरनिराळे बॉम्बिंग ॲप्स, उदा. 'बॉम्ब-इट-अप' मोफत उपलब्ध करून देऊ लागले आहेत. या ॲप्सचे कार्य सॉफ्टवेअर स्क्रिप्टप्रमाणेच चालते, परंतु स्मार्ट ग्राफिकल युझर इंटरफेस वापरून आपोआप होते. यामध्ये गुन्हेगार फक्त मोबाइल नंबर टाकून किती एसएमएस पाठविले जावेत, ती संख्या टाकून सेंड या एकमेव पर्यायावर क्लिक करतो आणि त्याचे काम फत्ते... हे ॲप्लिकेशन्स जरी गुगल प्ले स्टोअर किंवा आयओएस ॲप स्टोरवर उघडपणे उपलब्ध नसले तरी त्यांच्या ए.पी.के. फाईल्स वेबसाइट्सच्या माध्यमातून सहजपणे डाऊनलोड करण्याजोग्या आहेत.

## एसएमएस बॉम्बिंगचे परिणाम

कधी कधी लोकांना हजारो ते लाखोंच्या प्रमाणात हे एसएमएस येतात आणि त्यांच्या फोनमधील जागा अपुरी पडू लागते, फोन हॅंग-अप होऊ लागतात आणि ते अशा काही प्रकारे हॅंग होऊ लागतात की मेसेजचे ॲपच काम करत नाही. मग त्या मोबाइल धारकाजवळ त्याच्या मोबाइल फोनला पूर्णतः रिसेट करण्याखेरीज काहीच पर्याय राहत नाही.

## कायद्याचा आधार

आता हा एसएमएस बॉम्बिंगचा प्रकार इतक्या जास्त प्रमाणात घडवून आणून सायबर गुन्हेगार वेगळाच असुरी आनंद मिळवितात.

मात्र, तुमच्या आमच्या सारखी सामान्य जनता नाहक या मनस्तापाला बळी पडते. रोखण्यासाठी किंवा निदान या असुरी आनंदावर अंकुश ठेवण्यासाठी आपल्या कायद्यामध्ये दिलेल्या तरतुदींचा आधार आपण नक्कीच घेऊ शकतो.

यासंबंधीतील गुन्हा माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० अंतर्गत कलम ४३-इ सह ६६ तसेच भारतीय दंड विधान अंतर्गत कलम ४२५ अन्वये दखलपात्र आहे. या गुन्ह्यामध्ये ३ वर्षांच्या कारावासाची किंवा रुपये ५ लाखांपर्यंतच्या दंडाची शिक्षा होऊ शकते. या गुन्ह्यामध्ये पोलीस गुन्हेगारास वॉरंटशिवाय अटक करू शकतात.

## उपाय

वरील तरतुदींचा वापर करून आपण काही अंशी का होईना बॉम्बिंगचा गुन्हा आटोक्यात आणूच शकतो. याउपर, मी असे म्हणेन की सतर्क नागरिक म्हणून आपण स्वतः देखील काही उपायात्मक गोष्टी करणे आवश्यक आहे. जसे की, जेव्हा तुम्हाला समजेल की तुमच्या फोनवर एसएमएस बॉम्बिंगचा अटॅक झाला आहे, तेव्हा लागलीच सर्व एसएमएस गेटवे ब्लॉक करावेत. साधारणपणे हे एसएमएस गेटवेझ जास्तीत जास्त १५-२० असतात, त्यामुळे ते सर्व सहज ब्लॉक केले जाऊ शकतात. मग दुसऱ्या दिवशी तुम्हाला ते गेटवे अनब्लॉक करणे आवश्यक आहे, जेणेकरून तुम्हाला खरे ओटीपी, पिन आणि एसएमएस तुमच्या फोनवर येतील आणि तुम्ही सायबर गुन्हेगारांपासून सुरक्षित राहू शकाल.

सायबर कायदा आणि सुरक्षा तज्ज्ञ

| मंत्री | विभाग | कार्यालयीन पत्ता | पालकमंत्री |
|---|---|---|---|
| श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे, मुख्यमंत्री | सामान्य प्रशासन, माहिती तंत्रज्ञान, माहिती व जनसंपर्क, विधी व न्याय आणि इतर कोणत्याही मंत्र्यांना विवक्षितपणे नेमून न दिलेले विभाग किंवा विषय | मंत्रालय मुख्य इमारत, सहावा मजला दालन क्र. ६०१ | -- |
| श्री. अजित अनंतराव पवार, उप मुख्यमंत्री | वित्त, नियोजन | मंत्रालय मुख्य इमारत, सहावा मजला (उत्तर बाजू) | पुणे |
| श्री. सुभाष राजाराम देसाई | उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा | मंत्रालय मुख्य इमारत, पाचवा मजला (मध्य बाजू) दालन क्र. ५०२ | औरंगाबाद |
| श्री. अशोक शंकरराव चव्हाण | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) | मंत्रालय विस्तार इमारत, दुसरा मजला, दालन क्र.२०५ ते २०७ | नांदेड |
| श्री. छगन चंद्रकांत भुजबळ | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण | मंत्रालय मुख्य इमारत, दुसरा मजला (मध्य बाजू) दालन क्र. २०२ | नाशिक |
| श्री. दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील | कामगार, राज्य उत्पादन शुल्क | मंत्रालय विस्तार इमारत, पाचवा मजला, दालन क्र. ५०७ | सोलापूर |
| श्री. जयंत राजाराम पाटील | जलसंपदा व लाभक्षेत्र विकास | मंत्रालय विस्तार इमारत, सहावा मजला, दालन क्र. ६०७ | सांगली |
| श्री. अनिल वसंतराव देशमुख | गृह | मंत्रालय मुख्य इमारत, पहिला मजला, दालन क्र. १०१ | गोंदिया |
| श्री. विजय उर्फ बाळासाहेब भाऊसाहेब थोरात | महसूल | मंत्रालय विस्तार इमारत, पहिला मजला, दालन क्र. १०८ | -- |
| डॉ. राजेंद्र भास्करराव शिंगणे | अन्न व औषध प्रशासन | मंत्रालय मुख्य इमारत, पहिला मजला, दालन क्र. १०३ | बुलडाणा |
| श्री. राजेश अंकुशराव टोपे | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण | मंत्रालय मुख्य इमारत, चौथा मजला, दालन क्र. ४०३ | जालना |
| श्री. नवाब मोहम्मद इस्लाम मलिक | अल्पसंख्याक विकास व औकाफ, कौशल्य विकास व उद्योजकता | मंत्रालय मुख्य इमारत, दुसरा मजला, दालन क्र. २०३ | परभणी |
| श्री. हसन मियालाल मुश्रीफ | ग्रामविकास | मंत्रालय मुख्य इमारत, तिसरा मजला, दालन क्र. ३०२ | अहमदनगर |
| डॉ. नितीन काशिनाथ राऊत | ऊर्जा | मंत्रालय मुख्य इमारत, चौथा मजला, (मध्य बाजू) दालन क्र. ४०२ | नागपूर |
| श्रीमती वर्षा एकनाथ गायकवाड | शालेय शिक्षण | मंत्रालय मुख्य इमारत, तिसरा मजला, दालन क्र. ३०३ | हिंगोली |
| डॉ. जितेंद्र सतीश आव्हाड | गृहनिर्माण | मंत्रालय विस्तार इमारत, दुसरा मजला, दालन क्र.२०१, २०२, २१२ | -- |
| श्री. एकनाथ संभाजी शिंदे | नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) | मंत्रालय विस्तार इमारत, तिसरा मजला, दालन क्र.३०२ ते ३०७ | ठाणे आणि गडचिरोली |
| श्री. सुनील छत्रपाल केदार | पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण | मंत्रालय मुख्य इमारत, दुसरा मजला, दालन क्र. २०१ | वर्धा |
| श्री. विजय नामदेवराव वडेट्टीवार | इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन | मंत्रालय मुख्य इमारत, तिसरा मजला, दालन क्र. ३०१ | चंद्रपूर |
| श्री. अमित विलासराव देशमुख | वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य | मंत्रालय मुख्य इमारत, चौथा मजला, दालन क्र. ४०१ | लातूर |
| श्री. उदय रवींद्र सामंत | उच्च व तंत्र शिक्षण | मंत्रालय मुख्य इमारत, पाचवा मजला, दालन क्र. ५०१ | सिंधुदुर्ग |
| श्री. दादाजी दगडू भुसे | कृषी, माजी सैनिक कल्याण | मंत्रालय विस्तार इमारत, चौथा मजला, दालन क्र.४०७ | पालघर |
| श्री. संजय दुलिचंद राठोड | वने, भुकंप पूनर्वसन | मंत्रालय विस्तार इमारत, सहावा मजला, दालन क्र.६०१ | यवतमाळ |
| श्री. गुलाबराव रघुनाथ पाटील | पाणी पुरवठा व स्वच्छता | मंत्रालय मुख्य इमारत, तळमजला (१) | जळगाव |

| मंत्री | विभाग | कार्यालयीन पत्ता | पालकमंत्री |
|---|---|---|---|
| ॲड. के. सी. पाडवी | आदिवासी विकास | मंत्रालय विस्तार इमारत, पाचवा मजला, दालन क्र. ५०२ | नंदुरबार |
| श्री. संदिपानराव आसाराम भुमरे | रोजगार हमी, फलोत्पादन | मंत्रालय विस्तार इमारत, तिसरा मजला, दालन क्र. ३१६ | -- |
| श्री. शामराव उर्फ बाळासाहेब पांडुरंग पाटील | सहकार, पणन | मंत्रालय विस्तार इमारत, दुसरा मजला, दालन क्र. २४१ | सातारा |
| ॲड. अनिल दत्तात्रय परब | परिवहन, संसदीय कार्ये | मंत्रालय मुख्य इमारत, पाचवा मजला, दालन क्र. ५०३ | रत्नागिरी |
| श्री. अस्लम रमजान अली शेख | वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे विकास | मंत्रालय विस्तार इमारत, चौथा मजला, दालन क्र. ४०२ | मुंबई शहर |
| ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) | महिला व बालविकास | मंत्रालय विस्तार इमारत, पाचवा मजला, दालन क्र. ५४० | अमरावती |
| श्री. शंकरराव यशवंतराव गडाख | मृद् व जलसंधारण | मंत्रालय विस्तार इमारत, पहिला मजला, दालन क्र. ११५, ११७ | उस्मानाबाद |
| श्री. धनंजय पंडितराव मुंडे | सामाजिक न्याय व विशेष साहाय्य | मंत्रालय मुख्य इमारत, पहिला मजला, दालन क्र. १०२ | बीड |
| श्री. आदित्य उद्धव ठाकरे | पर्यटन, पर्यावरण, राजशिष्टाचार | मंत्रालय मुख्य इमारत, सातवा मजला, दालन क्र. ७१७ | मुंबई उपनगर |

| राज्यमंत्री | विभाग | कार्यालयीन पत्ता | पालकमंत्री |
|---|---|---|---|
| श्री. अब्दुल नबी सत्तार | महसूल, ग्रामविकास, बंदरे, खार जमिनी विकास, विशेष साहाय्य | मंत्रालय विस्तार इमारत, तिसरा मजला, दालन क्र. ३४० | धुळे |
| श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील | गृह (शहरे), गृहनिर्माण, परिवहन, माहिती तंत्रज्ञान, संसदीय कार्ये, माजी सैनिक कल्याण | मंत्रालय विस्तार इमारत, पहिला मजला, दालन क्र. १३९ | कोल्हापूर |
| श्री. शंभुराज शिवाजीराव देसाई | गृह (ग्रामीण), वित्त, नियोजन, राज्य उत्पादन शुल्क, कौशल्य विकास व उद्योजकता, पणन | विधान भवन | वाशिम |
| श्री. ओमप्रकाश उर्फ बच्चू बाबाराव कडू | जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, शालेय शिक्षण, महिला व बालविकास, इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण, कामगार | विधान भवन | अकोला |
| श्री. दत्तात्रय विठोबा भरणे | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), मृद् व जलसंधारण, वने, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय, सामान्य प्रशासन | मंत्रालय विस्तार इमारत, सातवा मजला, दालन क्र. ७०० व ७०१ | -- |
| डॉ. विश्वजीत पतंगराव कदम | सहकार, कृषी, सामाजिक न्याय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ, मराठी भाषा | मंत्रालय विस्तार इमारत, सातवा मजला, दालन क्र. ७०३, ७०४ | भंडारा |
| श्री. राजेंद्र शामगोंडा पाटील-यड्रावकर | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, वैद्यकीय शिक्षण, अन्न व औषध प्रशासन, वस्त्रोद्योग, सांस्कृतिक कार्य | विधान भवन | -- |
| श्री. संजय बाबुराव बनसोडे | पर्यावरण, पाणी पुरवठा व स्वच्छता, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), रोजगार हमी, भूकंप पुनर्वसन, संसदीय कार्ये | विधान भवन | -- |
| श्री. प्राजक्त प्रसादराव तनपुरे | नगर विकास, ऊर्जा, आदिवासी विकास, उच्च व तंत्र शिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन | विधान भवन | -- |
| कुमारी आदिती सुनील तटकरे | उद्योग, खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, माहिती व जनसंपर्क | मंत्रालय मुख्य इमारत, तळमजला (२) | रायगड |

संदर्भ : www.maharashtra.gov.in, ४ फेब्रुवारी २०२०

KHELO INDIA
YOUTH GAMES
GUWAHATI, ASSAM, 2020

# मराठी पाऊल पडते पुढे..

युवकांमध्ये खेळाची आवड आणि क्रीडासंस्कृती रुजवण्याच्या उद्देशाने सुरू झालेल्या 'खेलो इंडिया' स्पर्धेत सलग दुसऱ्या वर्षी महाराष्ट्राने सर्वसाधारण विजेतपद पटकावले. २५६ पदकांसह महाराष्ट्राने विजेतेपदावर मोहोर उमटवली. व्यक्तिमत्त्व विकासासाठी खेळ आवश्यक असल्याचे नेहमीच सांगितले जाते. पण, आतापर्यंत शालेय वर्ष संपल्यावर होणाऱ्या उन्हाळी शिबिरापुरतेच खेळ मर्यादित होते. या क्रीडा सोहळ्याने मात्र याची व्याप्ती वाढवली आणि शालेय स्तरापासूनच खेळ विषय किती महत्त्वाचा आहे हे पटवून दिले. राज्यातील क्रीडासंस्कृती रुजविण्याच्या दृष्टीने टाकलेले हे यश नक्कीच महत्त्वाचे ठरेल. महाराष्ट्राने ७८ सुवर्ण, ७७ रौप्य आणि १०१ कांस्यपदकांसह एकूण २५६ पदकांची कमाई करत विजेतपद मिळवले. हरयाणा २०० पदकांसह दुसऱ्या स्थानी तर दिल्ली १२२ पदकांसह तिसऱ्या स्थानी आहे.

ओरिसाच्या गुवाहाटी या शहरात झालेल्या या स्पर्धेत महाराष्ट्राने आपले अव्वल स्थान कायम राखले. नवीनचंद्र बाडरेली स्टेडियममध्ये झालेल्या समारोप सोहळ्यात महाराष्ट्राच्या संघाला सर्वसाधारण विजेतेपदाचा चषक प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्राने यंदा २० क्रीडाप्रकारांपैकी १९ खेळांमध्ये सहभाग नोंदवला होता. त्यापैकी जलतरणात सर्वाधिक ४६ पदकांची कमाई महाराष्ट्राच्या खेळाडूंनी केली. जिम्नॅस्टिक्समध्ये ४०, कुस्तीमध्ये ३१, ॲयथलेटिक्समध्ये २९ आणि वेटलिफ्टिंगमध्ये २५ पदके मिळवत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी आपला दबदबा राखला. गेल्या वर्षी बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात गेल्यावर्षी झालेल्या खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राने २२७ पदकांसह सर्वसाधारण विजेते पद पटकावले होते. यावर्षी त्यात आणखी पदकांची भर घातली. युवा खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित या स्पर्धेत १७ वर्षांखालील आणि २१ वर्षांखालील युवा खेळाडूंना आपले क्रीडानैपुण्याच्या प्रदर्शित करण्याची संधी दिली जाते.



गुवाहाटी येथे झालेल्या खेलो इंडिया स्पर्धेत यशस्वी महाराष्ट्राचा चमू.



*''खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्र सलग दुसऱ्या वर्षीही सर्वसाधारण विजेता ठरला आहे. ही बाब अभिमानास्पद आहे. या युवा खेळाडूंना यापुढेही अशीच चमकदार कामगिरी करता यावी यासाठी सर्वतोपरी पाठबळ दिले जाईल.''*

**- उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री**



*''खेलो इंडिया स्पर्धेतील महाराष्ट्राच्या युवा खेळाडुंनी मिळवलेले यश महाराष्ट्राच्या क्रिडा क्षेत्रातील भविष्याचे शुभसंकेत आहेत. या खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर यशस्वी कामगिरी करावी, यासाठी शासन आवश्यक ती सर्व मदत देईल.''*

**- अजित पवार, उपमुख्यमंत्री**



*''खेलो इंडियास्पर्धेतील महाराष्ट्रातील खेळाडुंचे यश कौतुकास्पद आहे. अशीच कामगिरी यापुढेही खेळाडूंनी करावी यासाठी युवक कल्याण विभागाच्यावतीने विविध उपक्रम आणि सुविधा पुरवण्यात येतील.''*

**- सुनील केदार,**
**क्रीडा व युवक कल्याण मंत्री**



*''खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राच्या युवा खेळाडूंनी मिळवलेले यश उत्साहवर्धक असून महाराष्ट्रात क्रीडा संस्कृती वाढावी, यासाठी क्रीडा व युवक कल्याण मंत्रालयातर्फे विविध कार्यक्रम हाती घेण्यात येतील.''*

**- कुमारी आदिती तटकरे,**
**क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री**

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य


अधिकृत आणि अचूक माहिती

## देशातील सर्वाधिक खपाचे मासिक

'एबीसी'ने उमटवली अधिकृत मोहोर


# लोकराज्य (मराठी)

# ६,२९,७९२










| | |
|---|---|
| अन्नदाता (तेलुगू) | वनिता (मल्याळम) |
| ३,४३,३६६ | ३,४०,९८० |
| गृहलक्ष्मी (हिंदी) | मल्याळम मनोरमा (मल्याळम) |
| ३,०४,२०३ | २,४१,१९३ |

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month




Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

अनिल आलूरकर
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. मुद्रण प्रिंट एन पॅक प्रा.लि., ए-१८०/४, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७०३ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.

मुख्य संपादक: डॉ. दिलीप पांढरपट्टे